GIPE 008

श्री अर्थविद समाज, अहमदनगर
यांचे
आर्थिक विषयांच्या अभ्यासास समर्पित केलेले त्रैमासिक

# अर्थ

एप्रिल १९८८

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे
कार्यकारी संपादक : प्राचार्य खासेराव शितोळे

अत्यंत सुबक, बिनचूक आणि दर्जेदार छपाईसाठी

# न्यू दत्त मुद्रणालय

*मार्केट यार्ड, अहमदनगर*



लग्नपत्रिका व निमंत्रण पत्रिका

आम्ही

एका दिवसात छापून देतो.

– एकवेळ अवश्य भेट द्या.

–प्रोप्रायटर : रघुनाथ दळवी

# श्री अर्थविद समाज, अहमदनगर

द्वारा न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर

एप्रिल १९८८ ★ वर्ष : पहिले ★ अंक : पहिला



★ संपादक : प्रा कमलाकर परचुरे

संपादकीय कार्यालय–
१५, फर्गसन् कॉलेज आवार,
पुणे– ४११००४. दूरध्वनि– ५२७०९.

★ कार्यकारी संपादक : प्राचार्य खासेराव शितोळे

प्रशासकीय कार्यालय–
प्राचार्य निवास, न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर–४१४००१.
दूरध्वनि– कार्यालय ४०२४, निवास ४३८०.

सहसंपादक – सुरेश दमढेरे


★ **वर्गणीदारांना आवाहन :**

अर्थ हे आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे त्रैमासिक आहे. त्याची वार्षिक वर्गणी रुपये ४०।- आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांकरिता वर्गणीचा दर रुपये २०।- आहे. कृपया आपली वर्गणी मा. कार्यकारी संपादक अर्थ या नावे मनिऑर्डरने पाठवावी.

★ **जाहिरातदारांना आवाहन–**

अर्थ त्रैमासिकाचे महाराष्ट्रात शेकडो वर्गणीदार आहेत. आर्थिक व व्यावसायिक क्षेत्रातील विषयांच्या अभ्यासास वाहून घेतलेल्या या नियतकालिकातील जाहिरातीद्वारे आपण असंख्य वाचकांपर्यन्त पोहोचू शकता. अर्थ हे सामाजिक प्रबोधनाचे कार्य करते. अर्थमधील जाहिरात म्हणजे समाजकार्यासाठी आपला उदार आश्रय. कृपया अर्थसाठी जाहिरात देऊन अर्थशास्त्र विषयक समस्यांच्या अभ्यासास हातभार लावा.

**:: अंतरंग ::**


१) आद्य – प्रा. कमलाकर परचुरे
२) देशाच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र.
३) अर्थ संकल्प – १९८८-८९.
४) अर्थसंकल्प विषयक आकडेवारीची कोष्टके.
५) १९८८–८९ या वर्षाच्या केंद्रीय योजना-खर्चाची ठळक वैशिष्ठ्ये.
६) सरकारी तिजोरीचा पंचनामा.
७) शेतकऱ्याच्या वार्षिक खर्च–प्राप्ती आणि भांडवली मालमत्ता व देणी यांचा संशोधनपर अभ्यास.
८) वनपिंप्री येथील अभ्यास पाहणीचा अहवाल.
९) सातव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी अहवाल.
१०) महाराष्ट्राचे अंदाजपत्रक.
११) रेल्वे, पोस्ट, इत्यादींच्या अंदाजपत्रकीय तरतुदी.
१२) भारतीय उद्योगासमोरील आव्हाने.
१३) सरकारिया आयोगाचा अहवाल.
१४) पदव्युत्तर व एम्. फिल् अर्थशास्त्र विद्यार्थ्यांचे निवेदन.
१५) अर्थशास्त्र प्राध्यापक परिवाराचे निवेदन.
१६) अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यासमंडळ यांचे निवेदन.
१७) एम्. फिल्. विद्यार्थ्यांचे निवेदन.
१८) मा. कुलगुरुंचे अभिनंदन.
१९) अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्याचा त्रैवार्षिक अहवाल.
२०) पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार–निवेदन.
२१) श्री अर्थविद समाज, अहमदनगर– निवेदन.
२२) अनन्त–प्राचार्य खासेराव शितोळे.



अभ्यासकांनी आपले लिखाण पाठवावे. त्यास योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल. संपादकांचा निर्णय अंतिम राहील.

● या अंकाच्या लेखातील विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## WITH BEST COMPLIMENTS

FROM

## HASMUKH AUTOMOBILES

DEALERS IN

**ALL TYPES OF AUTOMOBILE SPARES**

QUALITY GOODS AT REASONABLE RATES

**SARJEPURA**

**AHMEDNAGAR**

For Quality Goods Visit

**HASMUKH AUTOMOBILES**

☎-5087 AHMEDNAGAR

आर्थिक विकासास प्राधान्य
देणाऱ्या
' अर्थ '
त्रैमासिकाला
शु भे च्छा !

## ' हनी सेंटर '

आशा टॉकिज जवळ, अहमदनगर
( सर्व प्रकारच्या किराणा मालाचे
विश्वसनीय ठिकाण )

With best Compliments from

## THE RADIO CENTRE

2513, Shahaji Road. Ahmadnagar

Dealers in BUSH & TELEVISTA

Black & White & Colour T. V.

Sales & Service.

Phone No. 5680

# श्री अर्थविद समाज, अहमदनगर यांचे
# " अर्थ "

प्रमुख संपादक-प्रा. कमलाकर परचुरे    कार्यकारी संपादक-प्राचार्य खासेराव शितोळे

## आद्य

गेले जवळ जवळ दीड वर्ष ' अर्थ ' चे प्रकाशन माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे बंद पडले होते. ते प्रकाशन नवीन चैतन्य, नवा उत्साह, नवा निर्धार आणि चिरंतन ध्येयनिष्ठेने पुन्हा जिवंत अवतार घेऊन, अर्थच्या चाहत्यांना उपलब्ध होत आहे याचा आनंद शब्दांनी व्यक्त होणे कठीण.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी बरोबर शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्रात प्रथम आणि कालांतराने भारतभर जे नवीन प्रबोधन युग सुरु केले, तसेच भारतीयांची राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्मिता, त्यांची जाणीव वाढवून प्रफुल्लित केली त्या ध्येयवादाचे एक निष्ठावंत उपासक आणि न्या. रानडे यांचे लेखक व वाचक, त्यांचे पट्टशिष्य प्रा. वामन गोविंद काळे यांनी ती परंपरा जोपासण्याकरिता ' अर्थ ' नियतकालिकाची संस्थापना केली. प्रा. काळे यांचे शिष्य, सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि सहकार चळवळीचे प्रणेते प्रा. द. गो. कर्वे यांनी; तसेच त्यांचे चाहते, विद्वता, आणि प्रत्यक्ष समाजोपयोगी आर्थिक विकासाची दिशा व नेतृत्व देण्याचे सामर्थ्य असलेले भारतीय अर्थशास्त्रज्ञांमधील मेरूमणी डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि त्यांचे समकालीन सहकारी यांनी ' अर्थ ' ची परंपरा अधिक प्रभावशाली केली. १९४५ नंतर प्रा. वा. गो. काळे (फर्ग्युसन कॉलेजचे अर्थशास्त्राचे पहिले प्राध्यापक, नामदार गो. कृ. गोखले यांचे निकटवर्ती ज्येष्ठ सहकारी, भारतीय अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक, महाराष्ट्र बँक, मराठा चेंबर ऑफ् कॉमर्स, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इत्यादींचे प्रवर्तक) यांचे चिरंजीव श्री. वा. काळे यांनी प्रकांड वाचन, सखोल चिंतन आणि व्यावहारिक धाटणीची सोपी व मनाला भिडणारी, विचार करायला लावणाऱ्या अशा त्यांच्या लेखनशैलीत सुमारे ३० वर्षे म्हणजे १९७४ पर्यंत ' अर्थ 'चे संपादन चिकाटीने व उत्कृष्टपणे चालवून ' अर्थ 'च्या पुण्याईत आणि प्रतिष्ठित व चोकस वाचकांकडून मिळालेल्या मान्यतेत भरच घातली.

१९७५ मध्ये अल्पकाळ खंडित झालेल्या त्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य, माझे खास मित्र श्री. सुभाष बर्वे यांच्या उत्तेजन व मदतीमुळे होऊ शकले हा माझ्या आयुष्यातील परमभाग्याचा योग !

१९७५ पासून १९८६ पर्यंत मी स्वत: ' अर्थ ' कसा चालविला ते माझ्या निकटच्या परिचित मित्रांना आणि माझ्यावर लोभ असणाऱ्या अनेक ज्येष्ठ आणि तरुण व्यक्ती तसेच पुण्यातील सेवाभावी आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या संस्था चालकांनाच माहित आहे.

१९८६ नंतर माझ्या शारीरिक श्रम घेण्याच्या कुवतीतील मर्यादा मला जाणवू लागल्या. मनातला उत्साह आणि शरीराची क्षमता यात अंतर पडू लागले. मी थकलो. शरीराने माझ्या आत्म्यावर मात केली. ' अर्थ ' अत्यंत नाईलाजाने व निराशेने मी स्वत: बंद केला.

परंतु ही उज्ज्वल परंपरा बंद पडण्यासारखी नाही हेच खरे. याचे कारण माझ्या मनातील मला

नेहमीच अस्वस्थ करणारी व्यथा मी वाच्यता न करताही, माझे तरुण मित्र व सहकारी प्राचार्य खासेराव शितोळे यांना उमगली आणि त्यांनी 'अर्थ' पुन्हा जिवंत करण्याचा ध्यास घेतला.

आता यापुढे 'अर्थ' च्या भविष्यासंबंधी माझ्या मनात कोणतीच आशंका राहिली नाही. 'अर्थ' चे संचालन करण्याचे सामर्थ्य प्राचार्य शितोळे यांनी सिद्ध करुन दाखविले त्याचे गमक म्हणजे हा अंक !

'अर्थ' पूर्वी समाज प्रबोधन करण्याच्या प्रेरणेने निघाला. माझ्या काळात मी त्याला समाजाजवळ नेले आणि माझे स्वतःचे प्रबोधन करुन घेतले. प्राचार्य शितोळे यांनी सुमारे शंभराच्यावर प्राध्यापक आणि विद्यार्थी यांची संघटना बांधून 'श्री अर्थविद समाज' ही सहकारी तत्वावर चालणारी संस्थाच उभी केली आणि 'अर्थ' आता 'समाजाचा' केला. शेकडो क्रियाशील सहकाऱ्यांची शरीरे व मने मेळवून 'अर्थ'ची चैतन्यशील शक्ती प्रगुणित केली. यापुढे 'अर्थ' कोणा काळ्यांचा नाही. परचुऱ्यांचा नाही. तो आता समाजाचा झाला; या मोठ्या मन्वंतरामुळे 'अर्थ' चे प्रकाशन यापुढे कधीकाळी खंडित होईल अशी भीतीच त्यांनी कायमची दूर केली आहे.

यापुढे 'अर्थ' नियमितपणे आपणास मिळत राहील.

या पुन्हा नवा अवतार घेतलेल्या 'अर्थ' चा प्रकाशन सोहळा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान संशोधक व पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. ग. भिडे, यांच्या शुभाशीर्वादाने आणि मा. पंतप्रधानांचे परराष्ट्र संबंधविषयक सल्लागार श्री. राम साठे यांच्या शुभहस्ते दिनांक २४ मे १९८८ रोजी संपन्न होत आहे. या घटनेमुळे आमच्या सर्व सहकाऱ्यास फार मोठा उत्साह व प्रेरणा मिळाली आहे. त्याबद्दल व्यक्तिशः मी व आमचा श्री अर्थविद समाज त्यांचा ऋणी आहे. अर्थावर मी प्रेम केले हे म्हणण्यापेक्षा आपण सर्वांनी प्रेम केले म्हणून 'अर्थ' चालू राहिला याबद्दल मला धन्यता व कृतार्थता वाटणे हे नैसर्गिक आहे. अर्थावर लोभ असो द्यावा ही विज्ञापना.

–कमलाकर परचुरे

## FORM VI


नियम क्रमांक ८, रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर्स सेंट्रल रुल्स १९५६ अन्वये प्रकाशित.

प्रकाशन स्थळ– प्राचार्य निवास, न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर.

प्रकाशन दिनांक· त्रिमाही / जानेवारी–मार्च, एप्रिल जून, जुलै सप्टेंबर, ऑक्टोबर–डिसेंबर.

मुद्रक– श्री. ज. ता. शिंदे, गुरुप्रसाद मुद्रा मंदीर, शहर पोलीस स्टेशनजवळ, अहमदनगर.

प्रकाशक– प्रा. खा. ह. शितोळे, कार्यकारी संचालक, श्री अर्थविद समाज, अहमदनगर.

राष्ट्रीयत्व– भारतीय, पत्ता न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर.

संपादक– प्रा. कमलाकर परचुरे.

राष्ट्रीयत्व– भारतीय, पत्ता– १९ फर्गसन कॉलेज, आवार, पुणे ४११००४.

मालक– श्री अर्थविद समाज, अहमदनगर द्वारा न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर ४१४००१.

मी खासेराव हणमंतराव शितोळे असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

खासेराव शितोळे (कार्यकारी संपादक–प्रकाशक)

# देशाच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र

प्रा. कमलाकर परचुरे

अर्थ संकल्प सादर करण्यापूर्वी अर्थ मंत्रालयाने तयार केलेल्या अर्थ संकल्प पूर्व आर्थिक सर्वेक्षणाने १९८७–८८ या वर्षातल्या आर्थिक परिस्थीतीचे चित्र स्पष्ट झाले आहे.

देशातील भीषण अवर्षण व दुष्काळ यामुळे जरी कृषि उत्पादन मागील वर्षापेक्षा ७ ते १० टक्यांनी घटले असले तरी शेती क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणीमुळे एकूण विकासाचा दर घसरला. अवर्षणग्रस्त भागांना सहाय्यक अनुदाने द्यावी लागली. त्यामळे देशाच्या तिजोरीवर गंभीर स्वरुपाचा ताण पडला आहे. एकूण आर्थिक मंदिचे सावट निर्माण झाले. राष्ट्रीय उत्पन्नातही घट होण्याची परिस्थिती निर्माण झाली.

या भीषण दुष्काळामुळे पाणी वाटपाचे नियोजन आणि व्यवस्थापन या विषयी प्रश्न निर्माण झाले आहेत. आगामी तीन चार वर्षांत मार्च ते जून जुलै या काळात पिण्याचे पाणी पुरविण्याच्या समस्येने उग्र रुप धारण केलेले असेल. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या सरकारी खर्चाचा बोजा जबरदस्त राहील.

जलविद्युत व इतर मार्गाने निर्माण होणारी वीज उद्योग धंद्यांना कितपत सातत्याने पुरविली जाईल या विषयीही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

तात्पर्य, एकूण औद्योगिक विकासाला आवश्यक असलेली संरचना (Industrial Infrastructure) ही देखील या अवर्षणामुळे कोलमडली आहे कारण या संरचनेतील महत्वाचा घटक म्हणजे वीज उत्पादन होय.

जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी ही परिस्थिती लक्षात घेऊन भारतातील विकासाचा वेग चालू वर्षात शून्य किंवा शून्याच्या आसपासच राहील असा अंदाज व्यक्त केला होता. परंतु औद्योगिक क्षेत्राच्या उत्पादनाने हातभार लावल्याने विकासाचा दर एक ते दीड टक्का एवढा तरी टिकू शकला.

## शेती क्षेत्र

देशातील एकूण पर्जन्यमानावर आधारीत जे एकूण ३५ विभाग आहेत त्यातील २१ विभागात पाऊस फारच कमी झाला. शिवाय अगोदरची तीन वर्षे पावसाचे प्रमाण घटले आहेच. तथापि समाधानाची गोष्ट ही आहे की एकूण शेती उत्पादन आणि विशेषत: अन्नधान्य उत्पादन हे गेल्या वर्षापेक्षा ८ ते १० टक्यानेच घटेल. याचे कारण ज्या विभागात पाऊस झाला तेथील खरीपाच्या उत्पादनाने समाधानकारक हातभार लावला. बागायती क्षेत्रामुळे आणि नवीन तंत्रज्ञानामुळे एकूण कृषि उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटण्याची भिती आता कमी झाले आहे.

मागील वर्षी शिलकी धान्याचे साठे १३ दशलक्ष टन इतके राखीव ठेवता आले. परिणामी सार्वजनिक वितरण व्यवस्था रोजगार हमी आणि काम करणाऱ्यास अन्न व गरीबांना अन्न व शिधावाटप या योजना पार पाडता आल्या. त्यामुळेच अवर्षणामुळे निर्माण होणारी गंभीर समस्या सोडविण्यात बरेच यश मिळू शकले.

रब्बी पीक फार मोठ्या प्रमाणावर घटेल अशी परिस्थिती नाही. विशेषत: रब्बी पिकाकरिता शेती

क्षेत्राला अग्रक्रमाने आणि सवलतीच्या दराने वीज, खते आणि भांडवल यांचा पुरवठा व्हावा अशी दक्षता घेण्यात आली आहे असे सर्वेक्षणाचे मत आहे.

## औद्योगिक क्षेत्र–

एप्रिल ते नोव्हेंबर १९८७ या आठमहिन्याची अद्ययावत माहिती उपलब्ध झाली आहे. या आठच महिन्यात औद्योगिक उत्पादनाची वाढ अनपेक्षितपणे १०.२ टक्के झाली. ही चालू वर्षाची फार मोठी जमेची बाजू आहे. मागील वर्षी औद्योगिक उत्पादनात ८.५ टक्के इतकीच वाढ झाली होती. या पार्श्व–भूमीवर या वर्षाची वाढ दिलासा देणारी आहे. औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष वस्तू निर्मिती करणाऱ्या कारखान्यांच्या क्षेत्राचा विचार केल्यास या क्षेत्रातील उत्पादन ११ टक्यांनी वाढले आहे. एकूण औद्योगिक क्षेत्राची परिस्थिती अशी आहे की ३१ मार्च पर्यन्त कितीही अडचणी आल्या तरी औद्योगिक उत्पादनात ८ टक्यापेक्षा कमी वाढ होणार नाही हे निश्चित. औद्योगिक क्षेत्रातील या प्रगतीचे श्रेय देशातील औद्योगिक प्रगतीला अनुकूल असणाऱ्या संरचनेस द्यावे लागेल. या संरचनेत फारसे बिघाड झाले नाहीत ही जमेची दुसरी बाब तितकीच महत्वाची आहे.

## संरचना क्षेत्र (Infrastructural Sector)

अवर्षामुळे जलविद्युत उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले तरी औष्णिक वीज केंद्रातून होणारे उत्पादन १५.७ टक्यांनी वाढले. एप्रिल ते डिसेंबर १९८७ या काळात झालेले एकूण वीज उत्पादन १९८६ मध्ये याच काळात झालेल्या उत्पादनाशी तुलना करता ७.६ टक्क्यांनी वाढले.

कोळशाचे उत्पादन एप्रिल ते डिसेंबर १९८७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेने १०.२ टक्क्याने वाढले. त्यामुळेच रेल्वेने होणारी मालवाहतूक देखील ५.४ टक्क्यांनी वाढली. त्यामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील रेल्वे, कोळसा आणि वीज या उद्योगांची बाजू भक्कम राहिली.

## किंमती–

शेतीमाल आणि औद्योगिक उत्पादन यांच्या किमतीत मागील वर्षाच्या तुलनेने खूप वाढ झाली. जानेवारी १९८८ मध्ये घाऊक किंमतीचा निर्देशांक १९८६ च्या तुलनेत ९.८ टक्क्याने वाढला. तसेच उपभोक्त्यांच्या किंमतीचा निर्देशांक (सी. पी. आय्.) ९.६ टक्क्याने वाढला. विशेषत: खाद्य तेले- तेलबिया मसाल्याच्या वस्तू, कापूस, डाळी, गूळ, खांडसरी, प्रमुख अन्नधान्ये आणि कडधान्ये यांच्या किंमतीत दुष्काळी परिस्थितीमुळे प्रचंड वाढ झाली. एकूण चलन विषयक व पतविषयक धोरण आखडते ठेवल्यामुळे आणि तुटीचा अर्थभरणा मर्यादित ठेवल्यामुळे आणि त्याच बरोबर सार्वजनिक वितरण व्यवस्था व गरिबांना आणि अवर्षण ग्रस्तांना शिधा व अन्न पुरवठ्याची व्यवस्था केल्यामुळे महागाई फार मोठ्या प्रमाणात भडकली नाही.

राजकोषीय आणि चलननीती, अवर्षणग्रस्त व पूरग्रस्त जनतेला सहाय्य म्हणून मोठ्या प्रमाणावर अनुदाने आणि सरकारी खर्चात वाढ झाली. मॉडव्हॅट पद्धतीमुळे विविध करांची वसुली मोठ्या प्रमाणावर झाली. दुसऱ्या बाजूस स्थायी स्वरुपाच्या चलनी प्रमाणात (S. L. R.) दुप्पट करुन तसेच बँकांच्या रोख शिलकीतही वाढ करुन निवडक पतनियंत्रणे अधिक तीव्र करुन एकूण किंमतीची पातळी आटोक्यात ठेवण्यात आली.

## परदेशी देणीघेणी–

गेल्या दोन वर्षात १९८५ ते १९८७ मध्ये देशातील निर्यात व्यापार आणि उत्पन्न समाधानकारकरीतीने वाढले आहे. १९८६–८७ मध्ये त्याच्या मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीत १५.७ टक्के वाढ झाली होती. चालू वर्षातील पहिल्या नऊ महिन्यात निर्यात उत्पन्नात २४.६ टक्के वाढ आहे.

१९८६–८७ या वर्षी आयात खर्च केवळ २.२ टक्केच वाढला होता. मात्र चालू वर्षी डिसेंबर १९८७ पर्यंत आयात खर्चात १३.५ टक्क्याने वाढ झाल्या-

मुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यात प्रतिकूल झाला आहे. निर्यातीत वाढ होऊन देखील आयात खर्चातील वाढीमुळे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचा आढावा प्रतिकूल झाला आहे. गेल्या चार पाच वर्षात आंतरराष्ट्रीय देवघेवीचा आढावा सतत प्रतिकूलच राहिला आहे. त्याची प्रमुख कारणे म्हणजे देशातील खाद्यतेलाचे उत्पादन घटत गेल्यामुळे भारताला खाद्यतेलाची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागली; पेट्रोल व पेट्रोलजन्य पदार्थ यांच्या आयातीवरही फार मोठा खर्च करावा लागला; जगातील बऱ्याचशा देशात मंदीची परिस्थिती असल्यामुळे आणि अमेरिकेसारख्या देशांनी भारताकडून माल आयात करण्यावर बरेच प्रतिबंध व मर्यादा आणल्यामुळे आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही कर्ज व उचल यांची परतफेड करण्या बाबतचे निर्बंध अधिक कडक केल्यामुळे देशातील व्यापारतोल प्रतिकूल झाला आहे. त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय भांडवली स्वरुपाचे व्यवहार यांचा तोल असे दोन्हीही व्यवहारतोल प्रतिकूल झाले आहेत. यातील जमेची बाजू एवढीच की, चालू वर्षात निर्यात मोठ्या प्रमाणावर झाली परंतु एकूण जागतिक व्यवहारातील डॉलरची घसरण आणि मंदीचे वातावरण लक्षात घेता भारताला मोठ्या प्रमाणावर निर्यातीच्या साहाय्याने परदेशी चलन मिळवण्याचे बाबतीत बऱ्याच मर्यादा स्पष्ट दिसतात.

## आर्थिक परिस्थितीच्या समस्या आणि भवितव्य

हवामान आणि पाऊस अशा नैसर्गिक गोष्टींवर शेती क्षेत्राची जी मदार आहे ती जर काढून टाकता आली आणि शेती क्षेत्रातील उत्पादन आत्मनिर्भर आणि भरवशाचे होण्याकरिता भविष्य काळात जलसिंचनाच्या सोयी वाढविणे जलसिंचनाचे साठे आणि त्यांचे नियोजित उपयोजन यांच्यातील दरी कमी करणे, एकूण पाण्याचा वापर करतांना तो दक्षतेने, न्यायाने आणि नियोजनाने करण्याची व्यवस्था सुरु करणे, भूमिगत पाण्याचा शोध घेऊन त्याचा उपयोग वाढविणे, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकाची निवड व पिकांची रचना करणे, वनीकरण तसेच पर्यावरणाची जपणूक करणे या कार्यक्रमावर भर द्यावा लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रात गेली चार वर्षे समाधानकारक प्रगती झाली. तथापि बरेचसे उद्योग हे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दृष्टीने अजूनही बरेच मागासलेले आहेत. गुणवत्ता, तंत्रज्ञान, उत्पादकता आणि उत्पादन खर्चातील कपात या निकषांवर आधारित औद्योगिक प्रगती झाल्यास आणि त्याचबरोबर सार्वजनिक क्षेत्रातील औद्योगिक संरचना उपलब्ध करुन देणारे उद्योग हे अधिक कार्यक्षम केल्यास औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीतील मोठ्या उणीवा भरुन निघतील.

गेल्या पाच सहा वर्षात सरकारी खर्चात महा प्रचंड वाढ झाली असून चलनवाढ आणि भाववाढ यांचे प्रश्न अधिक अवघड झाले आहेत. त्यावर उपाय म्हणून देशातील महसूली अर्थसंकल्पातील खर्च कमी करणे, महसूली उत्पन्न वाढविणे आणि सरकारी खर्चातील नफा वाढवणे यावर भर द्यावा लागेल त्या दृष्टीने वेतनवाढ आणि सहाय्यक अनुदाने यावर कठोर नियंत्रणे घालण्याची गरज आहे. परदेशी विनिमय व्यवहार सुधारण्याकरिता देशातील औद्योगिक उत्पादनाची कार्यक्षमता, गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय दर्जाची करणे अनिवार्य झाले आहे. दीर्घकालीन धोरण म्हणूनच महानगराचे लोकसंख्या नियोजन आणि शिक्षण यावर भर देणे जरुरीचे झाले आहे. दारिद्र्याच्या दुष्टचक्रात सापडलेल्या भारतासारख्या देशाला उपलब्ध मानवी साधन संपत्तीचा मूलाधार आर्थिक विकास या नात्याने विकास करवून घ्यावा लागेल. त्यासाठी अल्पखर्चिक मात्र उच्च गुणवत्ता असलेल्या सामाजिक सेवा उपलब्ध करून द्याव्या लागतील. त्यात स्त्रिया; ग्रामीण जनता, अशिक्षित मजूर, उपेक्षित समाज घटक या सर्वांना शिक्षण, आरोग्य विषयक सोयी आणि स्वयंरोजगार विषयक सुविधा मिळवून देण्याइतपत कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. योग्य असे प्रशिक्षण देऊन मानवी भांडवलाचा पर्याप्त विकास साधावा लागेल. मात्र त्याचवेळी देशातील एकूण उपलब्ध भांडवलाच्या मर्यादा लक्षात घेऊन दीर्घकाळात फलदायी होणारे उपक्रम हाती घ्यावे लागतील. असे सर्वेक्षण लिहिणाऱ्या तज्ञांचे मत दिसते.

## निष्कर्ष–

एकूण हे सर्वेक्षण वाचल्यास असे लक्षात येते की, सर्वेक्षण लिहिणाऱ्यांनी देशातील परिस्थितीचे त्यातल्या त्यात आशादायक चित्र अधिक ठळकपणे दाखवण्यावर भर दिला आहे. वास्तविक शेती उत्पादन घसरलेले आहे. जीवनावश्यक व इतर अनेक वस्तूंच्या किमती प्रचंड प्रमाणावर भडकल्या आहेत. एकूण चलनवाढीचा दर पूर्वी जो एकांकी होता तो दोअंकी (Two Digital) सुरु झाला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. मल्होत्रा यांनी सध्याच्या चलन–वाढीच्या प्रश्नाकडे सरकारचे आणि जनतेचे लक्ष वेधावे याकरिता सबुरीचा आणि सावधानतेचा सल्ला दिला आहे. शेतकऱ्यांना ऊस तयार होऊनही ऊसाला कारखान्याकडून मागणी नाही. काही राज्यात कारखाने आहेत पण ऊस नाही. अन्नधान्य पिकवायचे तर पुरेसे पाणी नाही. सार्वजनिक शिधा वाटप यंत्रणेतून धान्य मिळाले तरी पाणी मिळण्याची सोय अद्याप झालेली नाही. बँकांचे नफे घटत आहेत. काही बँका तोटयात आहेत. काही दिवाळ खोरीच्या मार्गावर आहेत. व्यापार धंद्यासाठी कर्ज व चलन मिळणे हे एकूण कर्ज विषयक नियमामुळे अवघड झाले आहे. पैशाचा पुरवठा जबरदस्त होऊनही लोकांची क्रयशक्ती घटल्यामुळे बाजारातील मागणीत घसरण होत आहे.

नवीन उद्योग–उपक्रम सुरु करायचे म्हटले तर गुंतवणुकीला पुरेसा भांडवल पुरवठा नाही. जो आहे तो भांडवल पुरवठा अत्यंत महागडा झाला आहे. देशातील गुन्हेगारी, दहशतवाद, अतिरेक्यांच्या चळवळी, बँकांच्या व इतर खाजगी मालमत्तेच्या लुटी, वर्ग कलह जातीजातीतील तेढ, धार्मिक कलह आणि या सर्वांमुळे होणारा भीषण हिंसाचार या सर्व कारणांमुळे देशातील सर्वसामान्य नागरिकाचे मनः–स्वास्थ्य कमालीचे बिघडले आहे.

सरकारी खर्चातील भडकपणा, उधळेपणा, सवंग लोकप्रियतेकरिता केलेली खैरात उच्चपदस्थ व्यक्तांच्या सुरक्षिततेवर होणारा अफाट खर्च, मंत्री व अधिकाऱ्यांच्या दौऱ्यावरील व परदेश वाऱ्यावरील बेसुमार खर्च, मंत्री व अधिकाऱ्यांच्या विश्रांती व सुटीवरील खर्च यामुळे नागरिकांना कर भरतांना फारसा संतोष वाटत नाही. ज्यांच्या हातात आपण आपला पैसा देतो ते हात आपल्याला सुख, सुरक्षितता आणि स्वास्थ्य देण्यापेक्षा स्वतःच्याच पोळीवर तूप ओढून घेण्यात दंग आहेत. त्यामुळे करचुकवेगिरीची प्रवृत्ती वाढत आहे.

देशातील कर्जाचा बोजा एवढा प्रचंड झाला आहे की मुद्दल तर फिटूच शकत नाही. परंतु व्याज देण्याकरिताच नवीन कर्जे काढावी लागत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारातही प्रतिकूल परिस्थिती असून भारताच्या चलनाचे बाह्यमूल्य प्रत्यक्ष बाजारभावा-प्रमाणे कमालीचे घटले आहे.

सारांश, कृषि, संरचना, औद्योगिक क्षेत्र विशेषतः लघुउद्योग क्षेत्र यातील ५० टक्के उद्योग आजारी आहेत. व्यापार, नाणेबाजार, शेअरबाजार, बँका आंतरराष्ट्रीय व्यापार, सरकारी उत्पन्न, खर्च आणि राजकोषीय व्यवहार, उत्पादनगुंतवणूक–नफ्याचे प्रमाण बाजारातील मंदी, जीवघेणी महागाई या सर्व बाबींचा विचार करता हे सर्वेक्षण कमालीचे निराशाजनक आणि मनाला अस्वस्थ करणारे आहे. आर्थिक सर्वेक्षण लिहिणाऱ्या तज्ञांनी देशातील सर्व बाबींचा विचार न करता त्यातल्या त्यात चांगल्या शोभिवंत शेलक्या वस्तू निवडून त्यांची जी गौरवपूर्ण मांडणी केली आहे. ती सुद्धा त्यांना उत्तमप्रकारे सजवता आली नाही असेच म्हणावे लागेल.

आकडेवारीचा उपयोग हा अर्थशास्त्रज्ञांच्या हातचलाखीचा खेळ आहे. उदाहरणार्थ, एका ठिकाणचे सरासरी पर्जन्यमान २५" आहे. ते १९८६–८७ मध्ये १२" होते. मात्र इ.स. १९८७-८८ मध्ये ते १५" झाले. यावर आपण असे म्हणालो की, ८६–८७च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये पावसात २५ टक्यांनी वाढ झाली आहे. तर हे विधान आकडेवारीच्या दृष्टीने योग्य असले तरी ते वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे

आहे. कारण अपेक्षित पाऊस २५" असतांना तो केवळ १५" होता ही वस्तुस्थिती आहे तसेच आर्थिक सर्वेक्षणात तुलनात्मक फरक दर्शविताना नेहमी मागील वर्षाचा संदर्भ दिला जातो.

उदाहरणार्थ, मागील वर्षी धान्योत्पादन १४४ दशलक्ष टन झाले. आताच्या सर्वेक्षणाच्या अंदाजानुसार धान्योत्पादन १० टक्यांनी घटेल. म्हणजे सुमारे १५ दशलक्ष टन उत्पादन कमी होईल. पण गेली ३ वर्षे धान्योत्पादन सातत्याने ५ ते ६ दशलक्ष टनांनी वाढते आहे. हे लक्षात घेतले तर चालू वर्षाची घट ही २१ दशलक्ष टनांची होते. ती मागील वर्षाच्या राखीव शिलकीच्या इतकी **(Buffer Stock)** होते हे विधान वस्तुस्थितीतील सत्यावर जास्त प्रकाश पाडणारे आहे.

ज्याप्रमाणे एका जादूगाराची जादू दुसऱ्या जादूगाराला सहज ओळखता येते त्याप्रमाणे अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना आर्थिक सर्वेक्षणातील आकडयांच्या फिरवा फिरवीने सर्वेक्षणाच्या करामतीचे कौतुक वाटावे इतक्या दर्जाची चलाखी त्यात दिसत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की आर्थिक परिस्थिती खरोखरच फारशी आशादायक नाही. जर ती आशादायक आहे असे मानण्यामुळे खरोखर आशादायक होणार असेल तर सूज्ञांनी आणि जनतेने तसे मानण्यास हरकत नसावी.

# अर्थसंकल्प १९८८–८९

चालू वर्षाचा अर्थसंकल्प अर्थमंत्री नारायणदत्त तिवारी यांनी सादर केला. या अर्थसंकल्पाच्या वेळी- व्यापारी, कारखानदार, शेतकरी, अर्थतज्ञ आणि करतज्ञ तसेच सामान्य जनता यांना अगामी संकल्प कसा असेल याबद्दल जास्त कुतूहल नव्हते. अर्थ संकल्प जाहीर होण्या पूर्वीच पेट्रोल इ. सारख्या किंमती वाढवून सरकारी तिजोरीत लोकांच्या खिशातून पैसा पदरी आपोआप पडावा अशी मखलाशी केली होती. रेल्वेच्या प्रवासी दरामध्ये वाढ झाल्याने लोक नाराज आहेतच अशा पार्श्वभूमीवर हे बजेट आले. आणि सर्वसाधारणपणे नारायणदत्त तिवारींचे व्यक्तीमत्व नेमस्त शांत आणि नमते घेणारे असल्याकारणाने या अर्थसंकल्पात एकूण 'वरील' आदेशानुसार गरीबांच्या कल्याणावर भर देणे आणि राजकीय लोकप्रियता टिकवून ठेवणे ह्या प्रमुख गोष्टीवर भर देण्यात आला आहे. बहुजन समाजाकडून आणि विशेषतः शेतकरी समाजाकडून त्याचप्रमाणे दुर्बल उपेक्षित वर्गाकडून आणि तळागाळांतल्या गरीब लोकांकडून जी सद्भावना मिळवणे आवश्यक असते त्यादृष्टीने जे खर्च केले जातात तशा प्रकारच्या खर्चावर भर असणार हे बहुतेकांनी भाकीत केले होतेच. देशातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था विभिन्न प्रदेशात चालू असलेल्या बंडाळीने खिळखिळी झाली आहे. त्यात भर म्हणून श्रीलंकेत आपल्याच फौजा आपल्याच तामीळ बंडखोरांचा पाडाव करण्यासाठी जी कारवाई करत आहेत. त्या रामायणाकरता सुमारे तीन हजार कोटी रुपये आतापर्यंत खर्ची पडले आहेत. मागील वर्षी श्री. राजीव गांधी यांच्या बजेटमध्ये संरक्षण मंत्रालयावर प्रचंड खर्च वाढवला होता. या वर्षी त्याहीपेक्षा तीनहजार कोटींची भर संरक्षण खर्चात झाली आहे.

## अर्थसंकल्पाचे सार–

चालू वर्षाच्या १९८८–८९ या वर्षाच्या अर्थ संकल्पात एकूण खर्च ७३५६० कोटी रु. असून एकूण प्राप्ती ६६०७६ कोटी इतकी असल्या कारणाने एकूण तूट ७४८४ कोटी रुपयांची आहे. पैकी एकूण खर्चातील महसुली खर्च ५२६४० कोटी रुपयाचा असून भांडवली खर्च २०९२० कोटी रुपयांचा आहे. मागील वर्षाशी तुलना करता चालू वर्षाच्या महसुली खर्चात सुमारे ६००० कोटी (५९२१ कोटी) इतकी प्रचंड भर पडणार आहे. त्यामानाने भांडवली खर्चातील मागील वर्षापेक्षा भांडवली खर्चातील वाढ अत्यंत गौण आहे. २०९२०–१९५४२ = १३९८ कोटी म्हणजेच चालू वर्षी महसुली खर्चात प्रचंड वाढ झाली असल्या कारणाने महसुली अर्थ संकल्पातील तूट ९८४१ कोटी रु. झाली आहे. एवढी प्रचंड तूट भांडवली प्राप्तीतून कितपत भरून निघेल याबद्दल शंका वाटते. म्हणूनच अर्थ संकल्पातील एकूण तूट जी ७४८४ कोटी इतकी होईल असा जो अंदाज आहे तो अंदाज वर्षाअखेरीस खरा ठरेल अशी परिस्थिती नाही.

जमेकडच्या बाजूस दृष्टी टाकल्यास असे दिसते की महसुली प्राप्ती ४२७९८ कोटी असून भांडवली प्राप्ती २३२७८ कोटी आहे. याचाच अर्थ या वर्षाच्या कर आणि करेतर उत्पन्नातून सरकारने सुमारे ४५०० कोटींचा जादा भार जनतेवर टाकला आहे. महसुली खर्च भागविण्याकरिता एवढा मोठा भार महसुली साधनांवर म्हणजेच अप्रत्यक्ष कर, करेतर उत्पन्न यावर दिला गेल्याकारणाने सर्वसामान्य माणसाला करांचा बोजा जबरदस्त प्रमाणात भासणार आहे. रेल्वे, पोस्ट, टेलीफोन, पेट्रोल, कोळसा, इ. चे दर वाढवल्यामुळे त्याची ही चाट जनतेच्या खिशाला बसेल. परंतु वहातूक व संदेश वहनाची साधने महाग झाल यामुळे प्रत्येक वस्तुच्या किमतीतही प्रचंड वाढ होणार आहे. पर्यायाने महागाईची झळ प्रचंड प्रमाणावर भासेल. चालू वर्ष हे चलनवाढीचे विक्रमी वर्ष ठरेल इतकी स्फोटक स्थिती आहे.

## चालू वर्षातील सरकारच्या एकूण प्राप्तीचा आढावा–

चालू वर्षीची एकूण प्राप्ती ६६०७६ कोटीची आहे. त्यातील सर्वात जास्त वाटा उत्पादन कराचा आहे. तो २२ टक्के परदेशी मालाच्या जकातीतून, १९ टक्के देशांतर्गत कर्जे, १६ टक्के अंतर्गत कर्ज, १६ टक्के इतर भांडवली प्राप्ती, ८ टक्के परदेशी सहाय्य, ४ टक्के करेतर उत्पन्न, १२ टक्के निगम कर, ५ टक्के आयकर कर, ४ टक्के इतर कर १ टक्का आणि एकूण तूट ९ टक्के इतकी आहे. यातील ६३ टक्के उत्पन्न प्रत्यक्षकर, अप्रत्यक्षकर यातून मिळणार आहे. २८ टक्के उत्पन्न कर्जाच्या उभारणीतून उपलब्ध होईल, एकूण उत्पन्नातील अर्धे उत्पन्न केवळ कर रुपाने उभे रहाणार आहे. म्हणजेच पर्यायाने सुमारे३३००० कोटी इतकी जमा कररुपानेच होईल.

## चालू वर्षातील सरकारी खर्चाचा आढावा–

एकूण भांडवली व महसुली एकूण खर्च ७३५६० कोटी रुपये आहे त्याची टक्केवारी खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| व्याज देणे | १७ टक्के |
| केंद्रीय योजना खर्च | १९ टक्के |
| संरक्षण | १५ टक्के |
| राज्यांना दिलेले कराचे वाटे | १३ टक्के |
| योजना बाह्य खर्च ( Non Plan Expenditure) | १३ टक्के |
| आर्थिक सहाय्य ( Subsidi ) | ९ टक्के |
| राज्य आणि संघराज्य शासीत प्रदेश यांना विकास अनुदाने | १२ टक्के |
| तसेच त्यांना विकासेतर सहाय्य | २ टक्के |
| एकूण– | १०० टक्के |

एकूण खर्चाकडे पाहिल्यास खालील गोष्टी ठळकपणे जाणवतात. १) विकासेतर आणि अनुत्पादक खर्चातच प्रचंड वाढ होत आहे. व्याज देणी देण्यावरच एकूण खर्चाच्या सहा रुपयांपैकी एक रुपया व्याजापोटी खर्च

होत आहे. सात रुपयातील एक रुपया संरक्षणावर खर्च पडत आहे. व्याज, संरक्षण, आर्थिक साहचकारी अनुदाने, विकासेतर अनुदाने आणि विकासेतर खर्च हे एकत्र केल्यास सुमारे ७० टक्के रक्कम केवळ विकासेतर बाबींवर खर्ची पडत असल्या कारणाने सरकारी तिजोरीतील खर्चांचा देशाच्या आर्थिक विकासाकरता व सर्व सामान्यांच्या कल्याणाकरता त्याचा फारसा उपयोग होऊ शकणार नाही. त्यामुळे सामान्य माणसाने एवढ्या प्रचंड खर्चाचा ताप कशाकरता सोसायचा हेच कळेनासे झाले आहे. दर वर्षी आपण १६ टक्के रक्कम कर्जापोटी उभी करतो आणि १७ टक्के रक्कम आपण व्याजापोटी देतो. अगदी साधा हिशोब केला की त्याचा त्याची अर्थ असा होतो की नवीन मुद्दल १६ टक्के आपण घेत असताना आणि सुमारे तितकेच व्याजापोटी देत असताना मुद्दल फिटण्याची शक्यता फारच कमी दिसते. किंबहुना जुन्या कर्जाची भडकलेली व्याजे देण्याकरीता नवीन कर्जे उभी करावी लागत आहेत. ही परिस्थिती अशीच चालू राहिल्यास देश सरकारी कर्जांच्या सापळ्यात अडकेल (**Debt-trap**). कालांतराने कर्जाचे डोंगर प्रचंड प्रमाणात वाढल्यास आणि कर्ज फेडण्याची असमर्थता वाढत गेल्यास देशाचे आर्थिक दिवाळे आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील पत घसरणे या आगामी संकटाविषयीची धोक्याची सूचना (Alarm चालू वर्षी मिळाली आहे. संरक्षण खात्यावरील खर्च ही प्रचंड वाढवला आहे. त्या खात्यातील माहीती गुप्ततेच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकास मिळू शकत नाही, तसेच त्या खात्यातील हिशेबही नागरिकास उपलब्ध होऊ शकत नसल्या कारणाने त्या खात्यात गैरवाजवी खर्च होत आहे काय, गैरव्यवहार होत आहेत की काय तसेच उधळपट्टी होत आहे की काय या संबंधी तपासणीची (Audit & Accountability) सोय नाही. इतक्या गरीब आणि कर्ज आणि महागाईने गांजलेल्या देशाला संरक्षण खर्चाचा एवढा मोठा बोजा पेलेल काय अशी शंका वाटते.

## महसुली अर्थसंकल्पाची प्राप्ती व खर्च (ठळक आकडेवारी)—

| जमा | कोटी रुपये | खर्च | कोटी रुपये |
|---|---|---|---|
| केंद्रकर प्राप्ती | ३१८९० | व्याज देणी | १४१०० |
| व्याज प्राप्ती | ७१८७ | संरक्षण | ९१२८ |
| लाभांश व नफा | ५७१ | सहाय्यक अनुदाने | ६३९१ |
| करेतर प्राप्ती | ३१५९ | योजना बाह्य खर्च (Non-Plan) | १२३१७ |
| एकण महसुली तुट | ९८४२ | योजना खर्च संघराज्य शासीत प्रदेश व राज्य | ३८१७ |
| | | केंद्रीय योजना खर्च | ६८८७ |
| एकूण जमा | ५२६४० | एकूण खर्च | ५२६४० |

भांडवली प्राप्ती आणि खर्च यांची ठळक विभागणी–

| जमा | कोटी रुपये | खर्च | कोटी रुपये |
|---|---|---|---|
| कर्जाची वसूली | ४२८१ | महसुली तूट | ९८४२ |
| बाजारी कर्जे | ७००० | संरक्षण भांडवली खर्च | ३८७२ |
| विदेशी कर्जे व सहाय्य | ३१४२ | इतर योजना बाह्य खर्च | २०३८ |
| अल्पबचती | ११५० | राज्य आणि संघराज्य व शासित प्रदेश यांना अनुदाने | ५८९७ |
| इतर प्राप्ती | ७७०५ | | |
| भांडवली तूट | ७७८४ | केंद्रीय योजना खर्च | ९११३ |
| एकूण जमा | ३०७६२ | एकूण | ३०७६२ |

वरील आकडेवारी पाहिल्यास देशाची आर्थिक स्थिती आजारी आहे. आजारपणातून बरे होण्यासाठी कोणतेच ठोस उपाय या अंदाज पत्रकात दिसत नाहीत. उलटपक्षी आजार अधिक बळावेल असा निष्काळजी–पणाच आढळून येतो. आगामी वर्षे १९९० पर्यंत जर इतकी चिंताजनक असतील तर २१ व्या शतकाच्या वाटचालीबद्दल उमेद ती काय बाळगावी!

# अर्थसंकल्पविषयक आकडेवारीची कोष्टके

## एकूण कर-उत्पन्न १९८८-८९

तक्ता क्र. : १ राजस्व TAX REVENUE (करोड रुपये)

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधित अनुमान | १९८८–८९ बजट अनुमान |
|---|---|---|---|
| सकल कर–राजस्व Gross Tax Revenue | ३६९१७ | ३७९३५ | ४२५५२ |
| निगमकर | ३५३७ | ३६५० | ४०९९ |
| आयकर | २८४१ | ३३५० | ३६६० |
| व्ययकर अधिनियम १९८७ | – | २० | ५० |
| सम्पदा शुल्क | १० | ९ | ३ |
| धन कर | १२० | १२० | १३० |
| दानकर | ११ | १० | १० |

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधित अनुमान | १९८८–८९ बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| सीमा शुल्क | १२८६७ | १३५०० | १५६२६ |
| संघ उत्पाद शुल्क | १६८२६ | १६५८० | १८१७२ |
| अन्यकर | ९२ | ५८ | १०० |
| संघ राज्य क्षेत्राचे कर | ६०९ | ६३८ | ७०२ |
| घटाइए राज्योका हिस्सा (राज्याचा घटलेला हिस्सा) (Less States Shares) | ९२०६ | ९५९८ | १०६६२ |
| आयकर | २२२५ | २५८९ | २७७३ |
| सम्पदा शुल्क | ७ | ६ | – |
| संघ उत्पाद–शुल्क | ६९७४ | ७००३ | ७८८९ |
| निव्वळ कर राजस्व (Net Tax Revenue) | २७७११ | २८३३७ | ३१८९० |
| Net of assignments of Local Bodies Includes effect of Budget Proposals as below | ४३ | ५३ | ४८ |

## तक्ता क्र. २ : करेतर प्राप्ती १९८८-८९
## NON TAX RECEIPTS

(करोड रुपये)

| | १९८७–८८ बजेग अनुमान | १९८६–८८ संशोधित अनुमान | १९८८–८९ बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| व्याजा संबंधी प्राप्ती | ६२६२ | ६०८४ | ७१८७ |
| लाभांश आणि लाभ | ५२० | ५५४ | ५७२ |
| अन्य कर भिन्न राजस्व (Othernon-Tax Revenue) | ७६८३ | २५९२ | २५५७ |
| ऋणाची वसुली (Recoveries of Loans) | ४०५३ | ४३८४ | ४२८१ |
| बाजार उधार (Market Borrowings) | ६३०० | ७००० | ७००० |
| विदेश सहाय्यता | ३२०० | ३८८५ | ३७३४ |
| अल्प बचत | १००० | १००० | ११५० |
| विशेष जमा | २८२० | ३८७५ | ४३२५ |
| भविष्य निधी | ६३५ | ९०० | १००० |
| अन्य | ३०७० | २१७० | २३८० |
| जोडकर भिन्न प्राप्ती (Total Non Tax Receipts) | २९५४३ | ३१७४४ | ३४१८६ |
| राजस्व प्राप्ती (Revenue Receipts) | ८९७७ | ९७८५ | १०९०८ |
| पूंजी प्राप्ती (Capital Receipts) | २०५६६ | २१९५९ | २३२७८ |

## तक्ता क्र. ३ : केन्द्रीय आयोजनाचा क्षेत्र-वार परिव्यय
## CENTRAL PLAN OUTLAY BY SECTORS

(करोड रुपये)

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधित अनुमान | १९८८–९० बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| कृषि | ९१२ | ११५७ | १०७८ |
| ग्रामीण विकास | १६५१ | १७४४ | १७६२ |
| सिंचन आणि बाढ-नियंत्रण (Irrigation & flood control) | १६७ | १७४ | २१७ |
| उर्जा | ७६९० | ७९३७ | ९११६ |
| उद्योग आणि खनिज | ४७१६ | ४९१२ | ४७८९ |
| परिवहन | ४३७६ | ४६३९ | ५५७२ |
| संचार | १२२९ | १५०३ | १८२० |
| विज्ञान औद्योगिक आणि पर्यावरण | ६३० | ५७९ | ७५१ |
| सामाजिक सेवा | ३०११ | २८४२ | ३२६८ |
| अन्य | २४० | २१४ | २६२ |
| एकूण (Total) | २४६२२ | २५७०१ | २८७१५ |

## तक्ता क्र. ४ : कर-उत्पन्न TAX REVENUE

(करोड रुपये)

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधित अनुमान | १९८८–९९ बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| सकळ कर उत्पन्न | ३६६१७ | ३७९३५ | ४२५५२ |
| निगम कर | ३५३७ | ३६५० | ४०९९ |
| आय कर | २८४५ | ३३५० | ३६६० |
| व्ययकर अधिनियम १९८७ | — | २० | २० |
| सम्पदा शुल्क | १० | ९ | ३ |
| धन कर | १२० | १२० | १३० |
| दान कर | ११ | १० | १० |
| सीमा शुल्क | १२८६७ | १३५०० | १५६२६ |
| संघ उत्पादन शुल्क | १६८२६ | १५५८० | १८१७२ |
| अन्य कर | ९२ | ५८ | १०० |
| संघ राज्य क्षेत्राचे कर | ६०९ | ६३८ | ७०२ |
| राज्यांना दिलेला हिस्सा | ९२०६ | ९५९८ | १०६६२ |
| आयकर | २२२५ | २५८९ | २७७३ |
| सम्पदा शुल्क | ७ | ६ | — |
| संघ उत्पादन शुल्क | ६९७४ | ७००३ | ७८८९ |
| निव्वळ कर उत्पन्न | २७७११ | २८३३७ | ३१८९० |

## तक्ता क्र. १० : केंद्रीय आयोजनाचा मंत्रालय / विभागवार खर्च
## CENTRAL PLAN OUTLAY BY MINISTRIES / DEPARTMENT

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधित अनुमान | १९८८–८९ बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| कृषि | ४६९ | ५३६ | ६७५ |
| कृषि अनुसंधान आणि शिक्षा | ८२ | ८२ | ९६ |
| ग्रामीण विकास | २०५० | २१४३ | २२०० |
| उर्वरक | ९२६ | ९९५ | ६७१ |
| नागर विमानन | ४४२ | ३९७ | ३८८ |
| वाणिज्य | ६६ | ६१ | ६१ |
| पूर्ति (Supply) | ३ | २ | ३ |
| डाक सेवा | ४० | ३५ | ५० |
| दूर संचार | १३०० | १६२० | १८७३ |
| कोळसा (Coal) | १४४४ | १३९३ | २००३ |
| विद्युत | २५८५ | २६५१ | ३३२४ |
| उर्जांचे गैर.पारम्परिक स्त्रोत | १०० | १०० | १०५ |
| पर्यावर और वन | १६७ | १५४ | १८२ |
| आर्थिक कार्य | ४५४ | ७६२ | ५२० |
| राजस्व | १ | — | — |
| खाद्य | ७० | ६७ | ६२ |
| नागरिक पूर्ती | १२ | ११ | १३ |
| स्वास्थ्य | २०५ | १९१ | २२८ |
| परिवार कल्याण | ५८५ | ५७३ | ६०० |
| गृह | ३५ | ३० | ३२ |
| शिक्षण | ८०० | ७१३ | ८०० |
| युवा कार्य आणि खेळ | ६० | ५७ | ६८ |
| कला आणि संस्कृति | ६७ | ५१ | ६६ |
| महिला आणि बाल विकास | २२१ | २२१ | २३५ |
| औद्योगिक विकास | ३१४ | ३७४ | ३२१ |
| रसायन आणि पेट्रो–रसायन | ३८५ | ३७० | ४४६ |
| सरकारी उद्यम (Publio Euterprises) | ४२० | ४१३ | ५२६ |
| सूचना आणि प्रसारण | ३२४ | २८८ | ३५७ |
| श्रम | १९ | १८ | २३ |
| कर्मचारी लोक अदाळत आणि पेंशन | ३ | १ | ६ |
| पेट्रोलियम आणि प्राकृतिक गैस आयोजन | ३२६५ | ३४१५ | ३३१५ |
| सांख्यिकी | ७ | ६ | ७ |

– कुटुंब सहाय्य योजना – २५४ लाख कुटुंबांना एकूण रु. ८४१३ कोटी खर्च पैकी ४० टक्के लाभ अनुसूचित जाती व जमातीसाठी.
– ग्रामीण रोजगार कार्यक्रमांतर्गत खर्च.
– राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम रु. ५२९ कोटी.
– ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम रु. ७३० कोटी.
– १९८६–८७ मध्ये ७००६ लाख दिवस रोजगार निर्माण झाला. मात्र हे उद्दिष्ट ५११५ लाख दिवस होते. त्यापेक्षा जादा दिवसांचा रोजगार निर्माण झाला. अशा प्रकारे चालू वर्षीसुद्धा जादा रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.
– नवीन जादा कामगारांना काम देण्याचे उद्दिष्ट

५ ग्रामीण पाणी पुरवठा आणि स्वच्छता योजना रु. ४३० कोटी.
– सातव्या योजनेत पहिल्या तीन वर्षात योजनेचा इष्टांक म्हणून ठरविलेल्या १.६२ लाख गावांपैकी एक लाख गावांना पाणी आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्यात आली आहे.
– ९८८–८९ मध्ये १८५०० गावांना पाणी आणि स्वच्छता यांची सोय करण्यात येणार
– सातव्या योजनेचा एकूण इष्टांक ३२६९८ गावांचे आहे.

६. उर्जा–वीज उत्पादन व पुरवठा– रु. ९१९६ कोटी.
– विद्युत–पुरवठ्यात ३२ टक्के वाढ
– कोळसा व लिग्नाईट उत्पादनात ३० टक्के वाढ
– विद्युत उत्पादनात एप्रिल ते डिसेंबर १९८८ या कालात १६% वाढ.
– विद्युत निर्मितीसाठी ३९६३ कोटी रुपये
– चालू वर्षात औष्णिक विद्युत–यंत्राची उत्पादन क्षमता वाढून ५५ टक्के होईल. सातव्या योजनेच्या आरंभी ती ५० टक्के होती.
– एप्रिल ते डिसेंबर १९८८ या काळात पूर्वीच्या विद्युत उत्पादन क्षमतेत २६७३ मेगॅवॅटची भर पडेल.
– १९८६–८७ मध्ये ४.१५ लाख गावांना वीज-पुरवठा करण्यात आला.
– १९८७–८८ मध्ये विद्युत पंपाची संख्या ७१.८ लाख होऊ शकेल.

७. कोळसा आणि लिग्नाइट (१७३३ कोटी रुपयांची तरतूद)
– कोळशाच्या उत्पादनामध्ये १६० लाख मेट्रीक टनांची वाढ.
– १९८७–८८ मध्ये १८१० लाख मेट्रीकटनांचे उद्दीष्ट गाठले.
१९८८–८९ मध्ये १९२० लाख मेट्रीकटनांचे उद्दीष्ट आहे.
– सातव्या योजनेच्या पहिल्या तीन वर्षात कोल इंडिया लि. च्या कामगारांची उत्पादकता १७ टक्क्यांनी वाढली.

८. पेट्रोल–खर्च उद्दिष्ट ३३९५ कोटी रुपये.
– हायड्रो कार्बनचे दोन विशेष शोध. पहिला शोध कृष्णा गोदावरी क्षेत्रात तर दुसरा कावेरीच्या तीरावर.
– एच. बी. जे. पाईप लाईनचे ६४२ कि. मी. लांबीचे काम चालू आहे.
– पुढील वर्षात कच्च्या तेलाच्या उत्पादनात २० लाख मेट्रीक टनांनी वाढ होणार आहे. १९८८–८९ मध्ये एकूण ३२१.१० लाख मेट्रीक टन कच्च्या तेलाचे उत्पादनाचे लक्ष आहे.
– नैसर्गिक वायू उत्पादनात १.६४ अब्ज घन-मीटर्सनी वाढ होणार आहे.

९ वाहतूक– खर्च ५५७२ कोटी रुपये.
– रेल्वेवर ३८५० को. रु. खर्च पूर्वीच्या खर्चात २९टक्के नी वाढ.
– योजनेचे उद्दिष्ट २३१ दशलक्ष टन किलोमीटर वाहतूक प्रत्यक्षात मात्र २३६ दशलक्ष टन किलोमीटर वाहतूक–उत्पादन झाले.
– रेल्वे वॅगन वापराचा सरासरी निर्देशांक १३५० टन किलोमीटर होता तो १४२० झाला.
– रस्ते वाहतूकीवर १३१८ को. रु. आणि पूर्वीच्या खर्चात ४० टक्के वाढ.

| | १९८७–८८ बजेट अनुमान | १९८७–८८ संशोधन अनुमान | १९८८–८९ बजेट अनुमान |
|---|---|---|---|
| वैज्ञानिक व औद्योगिक | ६६ | ५९ | ९३ |
| वैज्ञानिक आणि औद्योगिक अनुसंधान | ७९ | ७९ | ८८ |
| जैव औद्योगिक | ३९ | ३१ | ४५ |
| इस्पात (पोलाद) | १४८४ | १५२० | १५७५ |
| खाणी | ३६० | ४०४ | ३१५ |
| जल भूतल परिवहन | ९१४ | ८१६ | १३१८ |
| वस्त्रोद्योग | ९९ | ९३ | १९२ |
| पर्यटन | ३७ | ३२ | ४७ |
| शहरी विकास | ७४ | ६५ | ८५ |
| जल संशोधन | १७२ | १७९ | २२७ |
| कल्याण | २४९ | २४९ | २७५ |
| परमाणु दर्जा | ६६३ | ७१० | ८४९ |
| इलेक्ट्रॉनिक | १३७ | १३७ | १४० |
| महासागर विकास | २० | १४ | २२ |
| अन्तरिक्ष | २९६ | २७६ | ३५४ |
| रेल्वे | २९८० | ३३०० | ३८५० |
| एकूण– | २४६२३ | २५७०१ | २८७१५ |

# १९८८-८९ या वर्षाच्या केंद्रीय योजना खर्चाची ठळक वैशिष्ट्ये

–खासेराव शितोळे

१. नवीन नियोजनावर १९ टक्के खर्च

२. अंतर्गत सरचनेवर २५ टक्के खर्च

३. शेती विकासाच्या नियोजनाचा कार्यक्रम.

– शेती आणि सिंचन यावर १२९५ कोटी रुपये

– ४० टक्के शेती, सहकार आणि पाणी या कार्यासाठी

– २.५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणणे-साठी प्रयत्न.

– शेती उत्पादन वाढीसाठी जिल्हा पातळीवरील योजना.

४ गरीबी हटविण्याचा कार्यक्रम.

– ग्रामीण विकास विभाग कार्यांवर रु. २२०० कोटी खर्च

– एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम रु. ३४६ कोटी.

– सहा दशलक्ष टन निर्यात क्षमतेचे न्हावाशेवा हे बंदर चालू वर्षी वाहतुकीस खुले होईल.

१०. संदेश वहन – खर्च १८२० को. रु.

– दूर संदेश वहनावर (टेलिकम्युनिकेशन) विशेष भर

११. विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण– खर्च रु. ७५१ कोटी.

– अणुशक्ती व अवकाश संशोधनावरील खर्चात २० टक्के वाढ.

– स्वतंत्र अणुशक्ती निगमाची स्थापना.

– अवकाश संशोधनावर सातव्या योजनेत एक-हजार कोटी रुपये खर्चाची तरतूद.

– १९८८ च्या पहिल्या सहामाहीत देशातील राजधानी, राज्यांच्या राजधान्या, संघराज्य प्रशासित प्रदेशांच्या राजधान्या आणि जिल्ह्याची ठिकाणे उपग्रह व संगणकाच्या साह्याने त्वरित संदेश वहनासाठी जोडण्यात येणार आहेत

१२. सामाजिक सेवा – ३२३८ को. रु. खर्चाची तरतूद

– शिक्षणावर ८०० को. रु. खर्च

– नवे शैक्षणिक धोरण, अनौपचारिक शिक्षण, प्राध्यापकांचे प्रशिक्षण, नवोदय विद्यालय, नवीन शाळा, आरोग्यालये, तांत्रिक प्रशिक्षण व रोजगार वृद्धी यावर भर

१३. आरोग्य व कुटुंब कल्याण – ८२८ को. रु. खर्चाची तरतूद.

– स्त्रिया आणि बालके यांचा विकास–२३५ कोटी रु. खर्च.

– शहरी झोपडपट्ट्या, आदिवासी व मागासलेले ग्रामीण विभाग यात १७३८ एकात्मिक शिशु विकास सेवा प्रकल्प सुरु करण्यात येणार आहेत.

१४. अनुसूचित जाती व जमाती कल्याण योजना– ३०५ को. रु. तरतूद.

१५ आदिवासी उपयोजनांसाठी १८५ को. रु.

वरील सर्व तरतुदी १९८८–८९ च्या अंदाज-पत्रकावरुन घेतलेल्या आहेत.

० ० ०

# सरकारी तिजोरीचा पंचनामा।

प्रा. कमलाकर पाचपुरे

नामदार श्री. नारायणदत्त तिवारी यांच्या अर्थसंकल्पातील गरिबांच्या कल्याणांच्या योजना, शेतकऱ्यांसाठी नव्या आकर्षक व हव्या हव्या वाटणाऱ्या खैराती, बायाबापड्यांचा दुवा घेण्याकरिता काजळ, रंग, बांगड्या, मंगळसूत्रे, शृंगाराची साधने यांच्यावरील करातील सवलती, श्रीमंत पोराबाळांना खेळणी स्वस्त करण्याचे उपाय गरीब कारागिरांना स्क्रू ड्रायव्हर स्वस्तात मिळण्याचे आश्वासन, इत्यादि, इत्यादि फुटकळ पण लोकप्रिय (Populist) गोष्टींवर भर दिला गेला असून आर्थिकदृष्ट्या अत्यंत मूलभूत व गंभीर स्वरुपाच्या प्रश्नांना गुल-दस्तात ठेवण्याचा आणि सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्याचा चतुरपणा व मुत्सद्दीपणा यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था गेल्या तीन-चार वर्षात झपाट्याने कोसळत असून चालू वर्षाची अर्थसंकल्पातील महसुली तूट, भांडवली तूट, कर्जाचा प्रचंड बोजा, जुन्या कर्जाच्या व्याजाचे थकलेले हप्ते भरण्याकरिता नवी कर्जे आणि तूट भरुन काढण्या-

करिता केलेली प्रचंड चलनबाढ व तुटीचा अर्थभरणा यामुळे देशाचे आर्थिक दिवाळे निघण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहे. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी फुटकळ कर सवलती आणि कल्याणकारी खर्च यावर लक्ष केंद्रित न करता चालू अर्थसंकल्पात 'कोसळणारी अर्थव्यवस्था' सावरण्याकरिता कोणते ठोस उपाय व वित्तीय व्यूह यांची आखणी केली आहे याचे अधिक काळजीपूर्वक परीक्षण करणे अगत्याचे आहे.

८०० पानांच्या चालू बजेटचे वाचन केल्यास सरकारची आर्थिक स्थिती अत्यन्त नामुष्कीची झाली आहे याचा पुरावा ठाई ठाई मिळतो.

सरकारी तिजोरीतील पुंजी लक्षात घेता आपण आर्थिक विनाशाच्या कड्यावर पोचलो आहे हे लक्षात येते. अर्थसंकल्प वाचताना सरकारी खर्चाचे सरकारी प्राप्तीचे आणि कर्ज व तुटीच्या अर्थभरण्याचे आकडे आपण मंडळी बारकाने पाहतो आणि त्यावरचे भाष्य देतांना आपण त्याचे वरवरचे, काठावरचे निदान करतो. परंतु हे बजेट अभ्यासतांना अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी बजेटमधील पान क्रमांक ४३ ते ४५ ही पाने वाचली तर आर्थिक स्थितीचे सखोल व मार्मिक निदान (Diagnosis) करता येईल. त्या पानामध्ये सरकारच्या पुंजी (Assets) आणि देयतेचे (Liabilities) एक पत्रक (Statement) दिले आहे. त्या पत्रकात असे दिसते की, "सरकारची एकूण देणी २,२४,१८० कोटी रुपयांची असून सरकारची जिंदगी, मालमत्ता व येणी यांचे एकूण मूल्य फक्त १,८४,१०० कोटी रुपयांचेच आहे. याचाच अर्थ असा की, सरकारची सर्व पुंजी विक्रीस काढली तरीही सरकारची देणी भागविता येणार नाहीत. ४०,०८० कोटी रुपयांची देणी सरकारला देता येणे केवळ अशक्यच आहे." एखादी कंपनी, उद्योग, व्यवसाय किंवा व्यक्ती हे आर्थिकदृष्ट्या नादार (Insolvent) आहेत की दमदार (Solvent) आहेत हे पाहतांना कंपनीची पुंजी ही कंपनीच्या सर्व देण्यापेक्षा जास्त की कमी; हे पाहणे आवश्यक असते. कल्पना करा की, सरकारच्या सर्व देशी-परदेशी व्यक्तीगत किंवा संस्थात्मक धनकोंनी (Creditors) सरकारवर आपली कर्जे परत करण्याकरिता दबाव आणला व तसा दावा लावला आणि सुप्रिम कोर्टाने सरकारी कर्जे फेडण्यासाठी हुकूमनामा (Decree) काढला तर, ज्या ज्या व्यक्तींनी प्रॉव्हिडंट फंड, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, युनिट, आयुर्विमा इत्यादींत पैसे कर्जाऊ दिले आहेत ते परत द्यावयाचे झाल्यास या क्षणी १०० रुपयातील ७०-८० रुपयेच फक्त उपलब्ध होतील इतके तूर्तास सरकार नादार झाले आहे.

४०,०८० कोटी रुपयांचे कर्ज फेडायचे झाल्यास सरकारला घटनेप्रमाणे नोटा छापण्याचा अधिकार असल्यामुळे, २-४ महिने ओव्हर टाईम देऊन नासिकच्या 'सिक्युरिटी प्रेस' मध्ये तेवढ्या नोटा छापून घेतल्यास सरकार सध्याचे कर्ज चुटकीसारखे फेडून टाकील. एवढेच काय यापुढेही कर्जाचा असा बोजा यापेक्षा कितीही पटीने वाढला तरी नोटा छापून ते कर्ज फेडता येण्याइतके सामर्थ्य केवळ सरकारकडेच आहे! प्रश्न इतका गंमतीचा आणि किरकोळ स्वरुपाचा (flippant) नाही. सरकारने आपला वित्तीय दमदारपणा (financial Solvency) उत्तमपैकी ठेवल्यास, सरकारी योजनात वित्त-गुंतवणूक करतांना सर्वसामान्य जनतेला सरकारच्या आर्थिक स्थितीविषयी १०० टक्के विश्वास वाटणे, देशाच्या आर्थिक प्रगतीस आणि आर्थिक आरोग्यास अनिवार्य आहे.

१९८६-८७ या वर्षी सरकारची देणी व येणी यातील पोकळी (Gap) २३,५०० कोटी रुपयांची होती, ती पोकळी दोन वर्षात ४०,०८० कोटी रुपयांतकी होते आहे. याचाच अर्थ सुमारे १७,५०० कोटी रुपयांचा खर्च नव्या छापलेल्या नोटांमधूनच सरकारच्या दैनंदिन कार्ये उरकण्यासाठी भागविला जात आहे.

१७,५०० कोटी रुपयांची सरासरी काढल्यास असे लक्षात येते की, (१७५०० ÷ २ वर्षांचे ७२० दिवस) सरकार दररोज २४ कोटी रुपयांच्या नोटा केवळ दैनंदिन अनुत्पादक खर्च भागविण्यासाठी छापत आहे. या नोटांचा विकास, संरक्षण किंवा गरीबांचे

कल्याण या कोणत्याही कारणी खर्च होत नसून केवळ व्याज देणे वा जुन्या कर्जांचे नूतनीकरण करणे यावरच खर्च होत आहे.

१९७७-७८ या वर्षी सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षम (Solvent) होते. त्यावर्षी सरकारची मालमत्ता ही देण्यापेक्षा ९९६ कोटी रुपयांनी जास्त होती. १९६५-६६ या वर्षीही हा आकडा ९३० कोटी रुपयांचा होता; जरी त्या वर्षातच अन्नधान्याची आयात, भारत-पाकिस्तान युद्ध खर्च आणि रुपयाचे अवमूल्यन या गंभीर समस्या होत्या. तरीही!

१९८० नंतरच्या गेल्या ७-८ वर्षातील आपले सर्व अर्थसंकल्प अभ्यासल्यास एक गोष्ट प्रकर्षाने दिसते ती म्हणजे, सरकारी महसुली खर्चात प्रचंड वाढ होत असून, महसुली अर्थसंकल्पातील तुटी (Revenue Budgetary Deficits) या भांडवली अर्थसंकल्पातील कर्ज व तुटीचा अर्थभरणा यांनी भरुन काढण्याची विकृत प्रवृत्ती बाढीस लागल्या कारणाने देशाची आर्थिक प्रकृती ढासळू लागली. भांडवली अर्थसंकल्पाचाही अभ्यास केल्यास असे दिसते की, (Capital Budgetary Deficits) कर्ज-परतफेडीचा ताण एवढा प्रचंड वाढत आहे की, पूर्वीची कर्जेही फिटली जात नसून, त्यांचे व्याज ही देता येणे अशक्य होत आहे. १९८० पासूनचे तुटीचे अर्थभरण्याचे आकडे एकत्र केल्यास गेल्या ७ वर्षात सुमारे ४०,००० कोटी रुपयांच्या नोटा छापाव्या लागल्या आहेत.

या प्रचंड उधळपट्टीमुळे आपण आपल्या जवळच्या मिळकतीच्या साधनापेक्षा जास्त खर्चीक राहणी स्वीकारली असल्यामुळे (Living beyond means) आज आपली स्थिती अमेरिकेसारखी झाली आहे. अमेरिकेचा डॉलर घसरला आहे. आंतरराष्ट्रीय पत कमी झाली आहे आणि वॉलस्ट्रीट मध्ये ऑक्टोबर १९ च्या काळया सोमवारी शेअरच्या किमतीत जी प्रचंड घसरण झाली तसेच जागतिक शेअर व भांडवल बाजारातील अमेरिकेचे सर्वोच्च स्थान अखेर जपानने हिराऊन घेतल्यामुळे आज संपन्न अमेरिकेची आर्थिक दिवाळीखोरी सिद्ध झाली. त्या पाठीमागचे प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेनेही आपल्या महसुली व भांडवली बजेटमध्ये प्रचंड प्रमाणावर खर्चाची उधळपट्टी व कर्जाचे न पेलवणारे डोंगर वाढविले, तुटीचा अर्थभरणा वाढविला आणि त्या मानाने विकास आणि रोजगार वाढीकरीता ठोस उपाय केले नाहीत हेच लक्षात घेतले पाहिजे. अमेरिकेसारख्या संपन्न देशाला हा जुगार तरीही परवडणारा आहे. परंतु भारतासारख्या गरीब देशाने आपला संसार चालवितांना आपले अंथरुण पाहून पाय पसरणे आवश्यक आहे. दुर्देवाने या बाबतीत 'सरकारची बाही ओढण्यास' सरकारला ताळयावर आणण्यासाठी, त्यांना सबुरीचा सल्ला देण्यासाठी, त्याचप्रमाणे सरकारी उधळपट्टी व बेजबाबदार पणावर लगाम ठेवण्यास जनता, विरोधीपक्ष तज्ज्ञ, ज्येष्ठ व आदरणीय व्यक्ती या असमर्थ आहेत. यामुळे भावी परिस्थितीबाबत विचार केल्यास मनाला अधिकच उद्विग्नता येते, देशाच्या आर्थिक स्थितीचा विचार न करणेचे बरे, असे सुज्ञांस वाटणे, ही आजची फार भयाण शोकांतिका आहे.

बेसुमार नोटा छापण्याचे परिणाम भाववाढीने चटकन लक्षात येतात. १९७० ते १९७८ या कालखंडात राहणीमानाचा निर्देशांक १३५ पॉईंटने वाढला. १९६० मध्ये रुपयाची जी क्रयशक्ती व मूल्य होते ते आता १९८७ मध्ये फक्त १६ पैसे आहे. यापुढे रुपयाच्या स्वरुपातील गुंतवणूक उदा. युनिट, सरकारी कर्जरोखे, पोस्टाची बचत प्रमाण पत्रे इत्यादी रुपयाचे मूल्य घसरत असल्याकारणाने कमी करणे हेच शहाणपणाचे आहे असे लोकांना वाटू लागले आहे. त्याचा पुरावा काही प्रवृत्तींमे दिसतो. उदाहरणार्थ, देशातील जमीनी, शेती, बागाईत, इमारती, स्थावर मालमत्ता, सोने, चांदी, हिरे, मोती, माणके, रत्ने, एवढेच नव्हे तर तांबे, अॅल्युमिनियम, पितळ, टिन, इत्यादीच्या खरेदीत लोक पैसे गुंतवत आहेत. कारण की, अशा गुंतवणुकीने सोने फ्लॅटस् इत्यादीच्या किमती प्रचंड वेगाने वाढत असल्याकारणाने अशा गुंतवणुकीचा फायदाच होतो. सरकारी व पतपत्रात

गुंतवल्याने तोटा होतो हे सर्वसामान्यांच्या गुंतवणूक पसंतीक्रम व तत्संबंधी वर्तनावरुन सिद्ध होत आहे.

चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात ७००० कोटी रुपयांची कर्जे उभारली जाणार आहेत तर व्याजापोटी ६९१२ कोटी रुपये म्हणजे एकूण खर्चाच्या १७ टक्के एवढे खर्ची पडणार आहेत. पर्यायाने नवे कर्ज व जुने व्याज यांची बरोबरी झाल्यामुळे मुद्दल कसे फिटणार हा यक्षप्रश्न आहे!

१९८०-८१ या वर्षाशी तुलना करता १९८८-८९ या वर्षी आपल्या व्याज देण्यात ७½ पट वाढ झाली, १९८४-८५ हे पायावर्ष धरल्यास ती २½ पट असून, १९८६-८७ या वर्षाचा संदर्भ घेतल्यास ती ३/४ पट आहे. व्याज देण्याच्या आकड्यांची दैनंदिन सरासरी काढल्यास आपले सरकार रोजच्या रोज तूर्तास २० कोटी रुपये व्याजापोटी देत असून त्यात भर म्हणून २० कोटी रुपयांच्या नोटा छापत आहे.

गेल्या ७-८ वर्षातील संरक्षण खर्चातील वाढ अंतर्गत सुरक्षेच्या खर्चातील वाढ, अति महत्वाच्या व्यक्तिच्या सुरक्षेचा खर्च, त्यांचे दौरे, कार्यक्रम, देशी परदेशी भेटी, बाहेरच्या पाहुण्यांचे भरगच्च जंगी स्वागत, कायदा व सुव्यवस्था ठेवण्याकरिता पोलीस, सेनादल व सुरक्षा दलांचे खर्च, प्रशासनावरील प्रचंड खर्च, सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार, भत्ते यामधील वाढ, अतिमहत्वाच्या व्यक्तींची सुटीतील बडदास्त व बंदोबस्त यावरील प्रचंड खर्च, एशियाड, भारत महोत्सव, अनेक क्रीडा स्पर्धा व जलसे यांचे महोत्सव कर्ज-मेळावे (Loan-Mela), दुष्काळी परिस्थितीचे निरीक्षण करण्याकरिता विमान प्रवासाचा खर्च व त्यांचे दूरदर्शनवरील देखावे या सर्व गोष्टी विचारात घेता मोगल साम्राज्याचा शेवट, रावबाजीच्या काळांतील पेशवाई किंवा १९ व्या शतकातील संस्थानिक, राजेरजवाडे, सरदार, वतनदार नवाबांच्या वेळची एकूण उधळपट्टी, ऐषाराम बेहोषी आणि राजकीय व आर्थिक बेदरकारी यांचा पुनः प्रत्यय येतो. ज्या काळात स्वाभिमानी प्रधान मंडळ, जबाबदार राज्यकर्ते, देशाभिमानी सेनादले निर्भीड न्यायाधिश निस्पृह व निर्भय बुद्धीवंत, प्रामाणिक जनता यांची कदर होत नाही, गुणांचा व मूल्यांचा आग्रह रहात नाही, खुषमस्करे, दंगलबाज, कावेबाज, चुगलखोर हांजीखोर, लाचखोर, नटनटघा विदूषक, भाट, गाणारे, बजावणारे, खाणारे, खिलवणारे, पिणारे, पिलवणारे, व्यसनाधीन व नीतीभ्रष्ट लोकांची चलती असते त्या काळात राजकीय व आर्थिक दिवाळखोरीचे दिवस देशाला आर्थिक दृष्टया अंधारयुगातच नेतात.

ज्या सरकारने कंपन्यांची येणी, देण्यापेक्षा कमी असल्यास त्यांना 'आजारी' (Sick) घोषित करुन त्यांचे व्यवस्थापन ताब्यात घेण्याचा कायदा केला आहे. त्याच निकषावर या आजारी सरकारचे व्यवस्थापन कोणी ताब्यात घ्यायचे हा सवाल आहे. जे सरकार प्रशासनात बऱ्याच प्रमाणात अयशस्वी झाले आहे, मात्र आपल्या टाकसाळीच्या सहाय्याने वेळ मारुन नेत आहे अशा सरकारचा आर्थिक बारदाना व कमकुवत तिजोरी एक ना एक दिवस या सरकारला अडचणीत आणतील अशी परिस्थिती आहे.
(आधार एस् गुरुमूर्ती यांचे ९ मार्च १९८८ च्या इंडियन एक्सप्रेस मधील टिपण.)

• • •



# शेतकऱ्याच्या वार्षिक खर्च-प्राप्ति आणि भांडवली मालमत्ता व देणी यांचा संशोधनपर अभ्यास

-श्री. बी. के. भोर, -कु. सविता भिलारे
-कु. राजश्री भोपटकर, -कु. गीता कोलंगडे
पदव्युत्तर केंद्र, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे.
- सुरेश टमटेरे

अर्थशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, न्यू आर्टस् कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, नगर, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे यांच्यामार्फत संयुक्तपणे आयोजिण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणाचा अहवाल आम्ही सादर करीत आहोत. प्रा. कमलाकर परचुरे आणि प्राचार्य खासेराव शितोळे यांनी या सर्वेक्षणाचे कामी मार्गदर्शन व नेतृत्व केले. अहमदनगर पासून नगर-सोलापूर रस्त्यावरील ३२ किलोमीटर अंतरावरील बनपिप्री या गावातील शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन जमा केलेल्या माहितीचे आधारावरच हा सर्वेक्षण अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

उद्दिष्ट- वरील मान्यवरांचे सूचनेनुसार व मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही विचारलेल्या प्रश्नांची खालील उद्दिष्टे होती.

१) शेतकऱ्यांची सद्यःस्थिती काय आहे? २) त्यांना कोणत्या माहितीची जरुरी आहे? ३) तो वर्षभरात कोणती कामे करतो? ४) कोणत्या पिकांचे उत्पादन करतो? ५) त्याचा स्वतःचा शेती, सरकार व वित्तीय संस्था यांच्याविषयीचा दृष्टीकोन काय आहे? ६) शेतीतील उत्पादन खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांचा विचार करता शेती कितपत किफायतशीर ठरते ते अजमावणे.

आम्ही ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्या सर्वच शेतकऱ्यांचे एक प्रातिनिधिक शेतकरी श्री. मुरलीधर कुंडलिक जगताप यांना प्रश्न विचारले. त्यांनी जिंदगी, देयता, उत्पन्न कामे आणि खर्च या विषयी दिलेली माहिती खालील प्रमाणे-

१) जगताप यांच्या कुटुंबात नऊ माणसे आहेत. त्यातील दोन मुले शाळेत जाणारी व दोन माणसे बाहेर इतर व्यवसाय करतात.

२) सदर शेतकऱ्याजवळ पाच एकर बागायत जमीन आहे.

३) त्यांचेकडे एक बैलजोडी, एक गाय, बैलगाडी व शेतीची अवजारे आहेत.

४) त्यांचे मालकीची स्वतंत्र विहीर आहे व त्यावर एक विद्युत पंपसेट बसविला आहे.

५) सदर शेतकरी हा एकंदरीत भारतीय शेतकऱ्यातील मध्यम प्रतीच्या शेतकऱ्यात समाविष्ट करण्यासारखा आहे.

६) जगताप हा शेतकरी शिक्षित आहे. म्हणजे तो लिहिणे, वाचणे इतपत जाणणारा आहे.

शेतकरी वर्षभरात आपल्या शेतीत कोणती उत्पन्ने घेतो, कोणती कामे करतो या गोष्टी उत्पन्न खर्च पत्रक रुपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

हा शेतकरी खरीप हंगामात ज्वारी, बाजरी ही प्रमुख पिके काढतो. रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा व भुईमूग ही प्रमुख पिके घेतो.

**वार्षिक अंतर्गत चालू खर्च-**

यालाच (Curreut Annual Implicit Costs) असे म्हणतात. शेतकऱ्याच्या अंदाज पत्र-

कातील अंतर्गत चालू खर्चाचा आढावा घेतला असता शेतकरी स्वत:, कुटुंबिय, बैलबारदाना यांचे साहृयाने रु. १४२१०।– इतके उत्पन्न मिळवित असल्याचे दिसते. म्हणजे त्याला जे वार्षिक उत्पन्न मिळते त्यातील अंतर्गत कष्टाचे मोल रु. १४२१० होते.

शेतकरी जी महत्वपूर्ण कामे करतो त्यात खालील कामे महत्वाची आहेत.

१) खरीप व रब्बीतील नांगरणी पाळी, वेचणी, इ. मशागतीचे कामे यांचे अंदाजे मूल्य रु. १४०० आहे.

२) शेतकरी स्वत: जवळ उपलब्ध असलेले जे खत पिकासाठी घालतो त्याचे अंदाजे मूल्य ९०० रुपये आहे.

३) शेतकऱ्याला हंगामातील जी कामे करावी करावी लागतात त्याचे मूल्य रु. १००० होते. पीक थोडे वाढून वर आल्यावर शेतीची खुरपणी, कोळपणी करावी लागते. महत्वपूर्ण कामाचे मूल्य रु. २२५०।– इतके होते.

४) शेतीस पाणी देणे, राखण करणे, इ. कामे करावी लागतात.

५) शेतकरी पेरणीसाठी काही प्रमाणात घरगुती बियाणांचा वापर करीत असतो. तसेच रासायनिक खते शेतात टाकावयाचे काम स्वत:च करतो औषध फवारणी ही स्वत:च करतो. या सर्व कामाचे मूल्य लक्षात घेतले पाहिजे.

६) पिकाची कापणी–काढणी, मळणी व विल्हेवारी करणे ही कामे करण्यासाठी शेतकऱ्याला बराच वेळ खर्च करावा लागतो. त्याचे मूल्यहीं विचारात घ्यावे लागते.

७) शेतकरी वर्षभर शेतीसाठीच जनावरांचे पालन पोषण करीत असतो. जनावरांसाठी वेगळे दुय्यम पीक या स्वरुपात गवत, घास व चाऱ्याचे उत्पादन घेत असतो. त्या जनावरांच्या पालन पोषणाचा खर्च रुपये ६०००।– येत असतो.

अशा प्रकारे शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कामांचे निरीक्षण केले तर त्याला वर्षभर सतर्क रहावे रहावे लागते. त्याच्या या कष्टरुप अंतर्गत उत्पादकतेचे मूल्य हे रु. १४२१०।– इतके आहे हे यावरून समजते, (कोष्टक क्रमांक एक) हा सर्व खर्च शेतकरी अप्रत्यक्षरित्या करीत असतो पण तो शब्दापेक्षा कोष्टकातून अधिक स्पष्ट होतो.

## वार्षिक बाह्य खर्च– (Annual Explicit Costs)

शेतकऱ्याचा बाह्यखर्च म्हणजे त्याला शेतीतून उत्पन्न काढण्यासाठी वर्षभरात स्वत:जवळून रोख पैशांच्या स्वरुपात करावा लागणारा वास्तव खर्च होय.

१. बियाणे खरेदी – शेतकऱ्याला हंगामाचे काळात विविध बियाणांची खरेदी करावी लागते. बियाणावरील खर्च हा महत्वपूर्ण खर्च असतो. श्री. जगताप हे दोन्ही हंगामात बियाणांसाठी रु. ८५०/– खर्च करतात. हा त्यांचा रोख स्वरुपातील महत्वपुर्ण खर्च असतो.

२. रासायनिक खते– यानंतरचा महत्वपूर्ण खर्च म्हणजे पीक वाढीच्या काळात रासायनिक खतांचा वापर करणे ह्यासाठी रु. २०४०।– इतका खर्च होतो. या खर्चांवर पिकांची खरी वाढ अवलंबून असते. तसेच कधी काळी पिकावर रोग आला तर त्यासाठी प्रतिबंधात्मक कीटक, नाशकांचा वापर करावा लागतो.

३. दुरुस्ती खर्च– शेतकऱ्यास अवजारे दुरुस्त करावी लागतात. पंपसेट बिघडल्यास त्याचा दुरुस्ती खर्च करावा लागतो. अवजारांच्या दुरुस्तीसाठीही हंगामात खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे वीजेचा खर्च करावा लागतो. हे सर्व खर्च रोख स्वरुपात करावे लागतात. त्या सर्वाचा दुरुस्ती व देखभालीचा खर्च यात समावेश करतात.

४. कर्जावरील व्याज देणे– शेतकऱ्याने शेतीसाठी विविध वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था व व्यक्तींकडून कर्ज घेतलेले असते. त्यावर त्याला आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग कर्जफेड व व्याज या रुपात खर्च करावा लागतो. हा खर्च वार्षिक सरासरी रु २८००।– एवढा लागतो. कर्जांवरील व्याजाचा बोजा हा शेतकऱ्याला मोठा ताण देणारा असतो.

५. इतर खर्च– या व्यतिरिक्तही शेतकऱ्याला त्यांचे जनावरांना चारा कमी पडल्यास विकत घ्यावा

लागतो. हंगामाचे काळात रोजंदारीवर मजूर घ्यावे लागतात. त्यावर खर्च करावा लागतो. आलेल्या उत्पादनाची विक्री करावयाची झाल्यास विक्री खर्चही करावा लागतो.

अशा प्रकारे शेतकऱ्याच्या शेतीवरील बाह्य-खर्चांचा विचार केला तर वर्षाकाठी रु. ७७१०।– खर्च होतो. हा खर्च सर्वसाधारणपणे अंतर्गत मशा-गतीच्या निम्मा होतो.

तात्पर्य, उत्पादन खर्चात बाह्य खर्च ३५ते४० टक्के आहे. या बाह्यखर्चातही शेतकऱ्यास महत्वपूर्ण योगदान करावे लागते. (कोष्टक क्रमांक दोन पहावे)

## मध्यम व दीर्घमुदतीचे भांडवली खर्च–

शेतकरी आपल्या शेतात काही भांडवली स्वरु-पाची गुंतवणूक करीत असतो. ती विविध प्रकारची असते. त्यातील बरीचशी कामे तो हंगाम विरहीत काळात करीत असतो. या कामातही शेतकरी स्वतःचे महत्त्वपूर्ण असे योगदान देत असतो

या मध्यम व दीर्घ मुदत भांडवली खर्चाची यथार्थ कल्पना आपणास भांडवली खर्च–पत्रकावरुन येत असते. या भांडवली खर्च पत्रकाचे दोन भाग करता येतात. हे भांडवली खर्च–पत्रक कोष्टक क्रमांक तीन मध्ये पहावयास मिळते या भांडवली खर्च–पत्र-कात अंतर्गत कामे आणि बाह्यकामे असे दोन विभाग समाविष्ट असतात.

अ) अंतर्गत कामे ( शेतकऱ्याने आपल्या स्वतःचे व कुटुंबाच्या श्रमाने केलेली कामे):– या विभागात खालील प्रकारच्या कामांचा समावेश केला जातो.

१) विहीर खोदणे– शेतकरी आपल्या शेतात विहीर खणत असतांना स्वतः, कुटुंबातील व्यक्ती व बैलाचे सहाय्याने काही कामे करीत असतो. त्यात उदा. मुरवातीचे माती–मुरमाचे काम करणे, बैलाचे सहाय्याने काही कामे करीत असतो. उदा. दगड काढणे, त्याचप्रमाणे टेकेदाराला वेळोवेळी मदत करणे अशी कामे करावी लागतात.

२. गोपालन करणे– शेतकरी शेती कामा-बरोबर एक दोन गायींचा सांभाळ करतो. त्यापासून त्याला दुध मिळते. गोऱ्ह्यांची जोपासना ते शेतीसाठी बैल म्हणून उपयोगात यावे यासाठी केली जाते. यात एक प्रकारची भांडवली गुंतवणूक केली जाते.

३) अवजारे बनवून घेणे– शेतकरी अवजारा-साठी घरी अथवा शेतात उपलब्ध असणाऱ्या झाडांच्या सहाय्याने सुताराकडून अवजारे बनवून घेतो. तो त्यासाठी स्वतः जवळचे लाकूड वापरतो. त्यातून बैलगाडी, औत, पाभर, फराट, कुळव, इत्यादी अवजारे तयार करून घेतो. ही अंतर्गत स्वरुपाची भांडवल गुंतवणूकच होय.

४) घराचे बांधकाम करणे– शेतकरी स्वतः साठी गावात अथवा शेतावर घर अथवा छप्पर बांधतो. त्यासाठीही तो अनेक अंतर्गत स्वरुपाची कामे करतो. त्यासाठी लाकूड फाटा, दगड, माती, मातीच्या विटा, इत्यादी साहित्य वापरतो. ही अंतर्गत भांड-वली गुंतवणूकच.

५) शेतीची बांध–बंदिस्तीची कामे– शेतात पावसाचे पडलेले पाणी मुरावे, पाणी वाहुन जाऊन जमीनीची धूप होऊ नये यासाठी, शेतीच्या संरक्षणा-साठी, हद्दी नीट समजाव्या यासाठी पाऊस वारा यापासून जमीनीची धूप होऊ नये यासाठी भांडवली गुंतवणूक करावी लागते. यातील बहुसंख्य कामे तो स्वतःच आपल्या कुटुंबियांच्या मदतीने करतो.

६) शेतातील पाणी पुरवठयाची कामे– शेत-कऱ्याला आपल्या विहिरीवर पंपसेट बसविणे, त्याची ने आण करणे, त्याचे फौंडेशन खाली अथवा वरच्या पातळीत ठेवणे, पाणी शेतात चोहोकडे फिरविण्या-साठी पाईप लाईन टाकणे, त्यासाठी चर खोदणे, पाणी जाण्यासाठी दंड अथवा पाट तयार करणे इत्यादी कामे करावी लागतात. ही सर्व भांडवली स्वरुपाचीच कामे होत. त्यातील बरीचशी कामे

शेतकरी व त्याचे कुटुंबिय स्वतःच्या श्रमातूनच पार पाडतात. त्यांचा अंतर्गत भांडवली कामात समावेश करावयास हवा.

शेतकऱ्याच्या भांडवली खर्च-पत्रकाकडे पाहिल्यास एकंदरीत शेतकरी अंतर्गत भांडवली कामाच्या स्वरुपात आपली फार मोठी श्रमशक्ती खर्च करीत असतो. या सर्व कष्टाची मूल्याच्या स्वरुपात मोजदाद करावयाची म्हटले तर शेतकरी वर्षभरात रुपये २२०००।- एवढ्या मूल्याची स्वतःची शक्ती शेतीसाठी वापरतो. तेच त्याचे भांडवली स्वरुपाचे योगदान होय.

ब) बाह्य कामे-(मजुरी देऊन अथवा खरेदी करुन केलेली कामे)- मजुरांना रोख पैसे देऊन करवून घेतलेल्या कामाचा यात समावेश करता येईल.

१) विहीर खोदणे- ठेकेदारांना काम देऊन विहीर खोदाईचे काम करुन घेणे.

२) जनावरांची खरेदी- शेतीसाठी बैलाची खरेदी करणे या कामी शेतकऱ्याला फार मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागते.

३) अवजारांची खरेदी- सुताराकडून शेतीसाठी नवीन अवजारे तयार करून घेणे, तसेच सुधारीत अवजारे खरेदी करणे यासाठी रोख स्वरुपातच गुंतवणूक करावी लागते.

४) घर बांधणी व दुरुस्ती- शेतकऱ्याचे घर साधेच असते. शेतावर तर छप्परच असते. त्याची दरवर्षी दुरुस्ती करावी लागते. त्यासाठी नेहमीच मोठा खर्च करावा लागतो.

५) बांध बंदिस्ती व सपाटीकरण- या स्वरुपाची सर्वच कामे स्वतः अथवा कुटुंबियांकरवी करता येण्यासारखी नसतात. काही कामे अनेकदा मजूर लावून अथवा ठेकेदारी पद्धतीने करुन घ्यावी लागतात.

६) पाणी पुरवठ्याच्या साधनांची खरेदी- ऑईल इंजिन, इलेक्ट्रिक मोटार पंपसेट, पाईप्स, इत्यादीच्या खरेदीवर व त्यांच्या फिटींगवरही मोठ्या प्रमाणात भांडवली स्वरुपाचा खर्च करावा लागतो.

७) यांत्रिक अवजाराची खरेदी- शेतीसाठी यांत्रिक अवजारांची खरेदी व वापर यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करावी लागते.

वरील प्रकारच्या विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणावर रोख स्वरुपात भांडवली खर्च करावा लागतो. या शेतकऱ्याने सुमारे रुपये ५४००० एवढा बाह्यस्वरुपी भांडवली खर्च केला आहे. या भांडवली गुंतवणूकीची प्रचलीत बाजारभावाने किंमत काय होईल त्यांचा विचार नंतर करावयाचा आहे.

वरील निरीक्षणावरुन आपल्याला थोडक्यात निष्कर्ष काढता येईल की, शेतकऱ्याला आपले स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी भांडवली गुंतवणुकीशिवाय पर्याय नाही. तो मालमत्ता असल्याशिवाय जिवंतच राहू शकणार नाही. पाच एकर बागायत जमीन धारण करणाऱ्या मध्यम प्रतीच्या शेतकऱ्यास रुपये ७५००० भांडवली गुंतवणूक करावी लागते.

## शेतकऱ्याचे एकूण शेतीपासून वार्षिक उत्पन्न

प्रस्तुत सर्वेक्षणानुसार मध्यम दर्जाच्या भारतीय शेतकऱ्याच्या वार्षिक उत्पन्नाविषयी कोष्टक क्रमांक चारमध्ये तपशीलवार माहिती दिली आहे.

शेतकऱ्याने वर्षभरात ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, भूईमूग, ऊस, इतर दुय्यम पिके आणि जनावरांचा चारा यांचे उत्पादन घेतले आहे. या सर्व उत्पादनांचा बाजारभावाने विक्रय केला तर शेतकऱ्याला वार्षिक रुपये ३०६५० एवढे उत्पन्न मिळेल. तात्पर्य, मध्यम दर्जाचा भारतीय शेतकरी हंगाम व्यवस्थित साधला, पाऊस पाणी वेळेवर झाला, मन लावून कष्ट केले तर वर्षाकाठी सरासरी रुपये ३०००० इतके उत्पन्न घेऊ शकतो.

यावरुन खालील प्रकारे निष्कर्ष काढता येतील.

१. प्रातिनिधिक मध्यम दर्जाच्या शेतकऱ्याचा वार्षिक खर्च-
अंतर्गत खर्च + बाह्य खर्च = एकूण वार्षिक खर्च.
१४२१० + ७७३० = २१९४० एवढा आहे.

२. एकूण खर्च खालीलप्रमाणे असेल.
एकूण वार्षिक खर्च + कर्जाचे हप्ते = एकूण खर्च.
२१९४० + ४००० = २५९४० रु.

३. शेतकऱ्याला मिळणारा निव्वळ नफा—
एकूणप्राप्ती – एकूण खर्च = निव्वळ नफा.
३०६९० – २५९४० = ४७१० रुपये.

म्हणजे सर्वसाधारणपणे अंतर्गत स्वरुपाचा खर्च हा शेतकऱ्याचा वार्षिक उपभोग खर्च मानला आणि बाह्यस्वरुपी खर्च व कर्जाचे हप्ते हे त्याला रोख स्वरुपात द्यावे लागतात असे गृहीत धरले तरी देखील मध्यम दर्जाच्या शेतकऱ्याला सालीना रु. ४५००/– इतके निव्वळ उत्पन्न किंवा नफा शिल्लक रहातो असे दिसते. अर्थात शेतकऱ्याच्या सर्वसाधारण वागणुकीवर त्याचा कौटुंबिक खर्च अवलून राहतो हेही येथे लक्षात घ्यावयास हवे.

## शेतकऱ्याची भांडवली जिंदगी व देयता

सर्वेक्षणात आपण अभ्यासत असलेल्या प्रातिनिधिक मध्यम दर्जाच्या शेतकऱ्याचे रहाते घर, धारण क्षेत्र, बैल बारदाना, विहीर, पंपसेट याची एकूण किंमत रु. १०२०००/– इतकी होते. तीच त्याची भांडवली जिंदगी होय.

अशा शेतकऱ्याची देयता ही अशीच फार मोठी असते. शेतकऱ्याची भांडवली गुंतवणूक बरीच मोठी असते. त्यासाठी त्याला कर्जाऊ रकमेची गरज असते. भू–विकास बँक, राष्ट्रीयकृत बँका, प्राथमिक सहकारी सोसायटी, साखर कारखाने, नातेवाईक, सावकार व सरकार यांच्याकडून त्याला विविध प्रकारे कर्ज मिळते. त्याची तो शेतीसाठी गुंतवणूक करतो. सामान्यतः मध्यम प्रतीच्या शेतकऱ्याची देयता रु. ३००००। एवढी आहे. म्हणजेच त्याच्या भांडवली जिंदगीपेक्षा त्याची देयता फार कमी आहे. जसे—

एकूण जिंदगी— एकूण देयता – निव्वळ जिंदगी
रु.१०२००० रु. ३०००० – ७२००० रुपये

सामान्यतः देयता वजा जाता निव्वळ जिंदगी सुमारे रु. ७००० एवढी आहे. सध्या परिस्थितीनुसार शेती व्यवसाय हा फार मोठा नफा मिळवून देणारा आहे असे दिसत नाही तो मध्यम स्वरुपाचा आहे; मात्र अजूनही भांडवली जिंदगी ही बऱ्यापैकी आहे. त्यामुळेच शेतकरी शेती व्यवसाय सोडून देण्यास तयार नाही. आजही निर्वाहापुरते उत्पन्न मिळत असल्याने तो शेतीव्यवसाय करतो आहे.

तात्पर्य, शेतकऱ्याला त्याचा निर्वाह करण्यासाठी मोठी भांडवल गुंतवणूक करावी लागते. मध्यम दर्जाच्या शेतकऱ्याला निर्वाहापुरते उत्पन्न मिळवून केवळ ४ते५ हजार रुपयांपर्यंत नफा मिळविता येतो. परंतु जेव्हा नैसर्गिक परिस्थिती अनुकूल असेल तेव्हाच हे शक्य होते. जर पाऊस पुरेसा व वेळेवर झाला नाही तर विहिरीचे पाणी कमी पडते. त्याचा उत्पन्नावर अनिष्ट परिणाम होतो. अशावेळी शेतकऱ्याला गतवर्षीचा नफा व धान्य यावर पुढच्या वर्षात गुजराण करावी लागते. मात्र जनावरांच्या उपजिविकेसाठी आवश्यक तो चारा उपलब्ध न झाल्यास ती विकण्याचीही पाळी शेतकऱ्यावर येत असते.

वरील सर्व विवेचनावरुन जिरायत शेतकरी, बागायत शेतकरी, अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतमजूर यांची अत्यन्त हालाखीची स्थिती आहे हे स्पष्ट होते. त्यांना भरघोस सहाय्याची आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य त्या किमतींची हमी मिळणे आवश्यक आहे. तसे झाले तरच त्यांना निर्वाहाचे योग्य साधन उपलब्ध होईल. त्याचबरोबर राष्ट्रीय आर्थिक विकासाला हातभार लागेल.

(या आर्थिक सर्वेक्षणाचे कामी आम्हास अहमदनगरचे न्यू आर्टस्, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, बर्नापिप्री येथील ग्रामस्थ श्री. बलभीमराव जगताप, श्री. भाऊसाहेब पठारे यांचे बहुमोल सहकार्य लाभेल. त्यामुळेच हा प्रकल्प उत्तम प्रकारे राबविता आला त्याबद्दल त्या सर्वांचे आभार.)

## कोष्टक क्रमांक १

## क्षेतकऱ्याचा वार्षिक अंतर्गत चालू खर्च

**( Imputed, Implicit, Value added )**

| अ. नं. | कामाचा / खर्चांचा प्रकार | हंगाम | दर एकरी खर्च (रुपयात) | एकूण क्षेत्र एकरात | एकूण खर्च (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १) | शेती मशागत (बैल नांगरणी, | खरीप | १५०—०० | ५ एकर | ७५०—०० |
| | वेचणी, इत्यादीं | रब्बी | ५०—०० | ४ एकर | २००—०० |
| | | खरीप | ५०—०० | ५ एकर | २५०—०० |
| | | रब्बी | ५०—०० | ४ एकर | २००—०० |
| २) | कंपोस्ट खत (वाहतूक व शेतात पसरणे) | | ७५ रु. गाडी | १२ गाड्या | ९००—०० |
| ३) | हंगामातील कामे (पाळी, पेरणी इ.) | खरीप | १००—०० | ५ | ५००—०० |
| | | रब्बी | १००—०० | ५ | ५००—०० |
| ४) | खुरपणी व कोळपणी | खरीप | ३००—०० | ५ | १५००—०० |
| | | रब्बी | २५०—०० | ५ | १२५०—०० |
| ५) | पिकांची व शेताची राखण | खरीप | — | — | १५०—०० |
| | (पिक क्षेत्रावर अवलंबून) | रब्बी | — | — | १५०—०० |
| ६) | पिकास पाणी देणे (पाण्याची पाळी, | खरीप | ५०—०० | ५ | २५०—०० |
| | विहिरीतील पाणी यावर अवलंबून) | रब्बी | ५०—०० | ५ | २५०—०० |
| ७) | घरगुती बियाणाचा वापर | | | | |
| | ज्वारी एकरी ५ किलो | खरीप | १२-०० | ३ | ३६—०० |
| | बाजरी एकरी ३ किलो | खरीप | १२-०० | २ | २४—०० |
| ८) | रासायनिक खते घालणे | खरीप | ५०—०० | ५ | २५०—०० |
| | | रब्बी | ५०—०० | ५ | २५०—०० |
| ९) | कापणी, मळणी व विल्हेवारी | रब्बी | ५०—०० | ५ | २५०—०० |
| | | रब्बी | १००—०० | ४ | ४०० ०० |
| १०) | जनावरांच्या चाऱ्याचा खर्च | खरीप | ७५०—०० | ४ एकर | ३०००-०० |
| | | रब्बी | ७५०—०० | ४ एकर | ३०००-०० |
| | एकूण | | | रुपये | १४२१०·०० |

कोष्टक क्रमांक २

## शेतकऱ्याचा बाह्य खर्च

### Actual - Explicit Costs

| अ. नं. | काम – त्यावरील खर्च | हंगाम | दर एकरी खर्च | क्षेत्र एकर | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) | नवीन बियाणे वापरणे. | | | | |
| | भुईमूग- १४ रुपये कि. एकरी ४० किलो | रब्बी | ५६०-०० | ०१ | ५६०-०० |
| | ज्वारी- ५० रुपये ५ कि. | रब्बी | ५०-०० | ०२ | १००-०० |
| | ऊस | वार्षिक | १५०-०० | ०१ | १५०-०० |
| | बाजरी- ४० रुपये किलो | खरीप | ४०-०० | ०१ | ४०-०० |
| २) | रासायनिक खतांचा वापर | | | | |
| | बाजरी- २० : २० : ० एकरी २ गोण्या | खरीप | २४०-०० | ०२ | ४८०-०० |
| | ज्वारी- २० : २० : ० एकरी २ गोण्या | खरीप + रब्बी | २४०-०० | ०४ | ९६०-०० |
| | गहू- २० : २० : ० एकरी ३ गोणी | रब्बी | ३००-०० | ०१ | ३००-०० |
| | ऊस, हरभरा | वार्षिक रब्बी | ३००-०० | ०१ | ३००-०० |
| ३) | कीटक नाशक औषधांचा वापर (सरासरी) | वार्षिक | २५-०० | ०५ | १२५ ०० |
| ४) | वीजेचे बील (तीन हॉर्स पॉवरची मोटर वार्षिक खर्च | वार्षिक | -- | -- | ६००-०० |
| ५) | पंपसेट दुरुस्ती (अंदाजे खर्च) | वार्षिक | ५०-०० | ०५ | २५०-०० |
| ६) | अवजारे दुरुस्ती व घसारा | वार्षिक | २५-०० | ०५ | १२५-०० |
| ७) | कर्जावरील व्याज मध्यम मुदत | -- | -- | -- | १२००-०० |
| | दीर्घ मुदत | -- | -- | -- | १६००-०० |
| ८) | चारा खरेदी (वर्षभर पुरेल एवढे उत्पादन शेतकरी करतो असे मानू) | -- | -- | -- | -- |
| ९) | हंगामी मजुरी (खुरपणी, कापणी, मळणी) | -- | -- | -- | ५००-०० |
| १०) | विक्री खर्च (धान्य तयार झाल्यापासून ते बाजारात नेईपर्यंतचा) | खरीप | -- | -- | २४०-०० |
| | एकूण खर्च | | | | ७७३०-०० |

## कोष्टक क्रमांक ३

## शेतकऱ्याचे भांडवली खर्च पत्रक

| क्र. नं. | अंतर्गत कामे | कामाचे मूल्य (रुपयात) | क्र. नं. | बाह्य कामे | कामाचे मूल्य (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विहीर खोदाई (मातीकाम वगैरे) | १००००–०० | १ | विहीर खोदाई कातळ व मुरुम फोडणे) | ३००००–०० |
| २ | गायीचे गोऱ्हे व त्यांची किंमत | १०००–०० | २ | नवीन बैल खरेदी | २५००–०० |
| ३ | अवजारे व बैलगाडीसाठी लाकूड ( उपलब्ध असलेले ) | २०००–०० | ३ | अवजारे खरेदी सुतारकाम आणि मजूरी | ६०००–०० |
| ४ | घर बांधणी दगड, माती, इ. घराची उपलब्ध मालमत्ता) | २०००–०० | ४ | घरबांधणी (मजुरी व साहित्य | ५०००–०० |
| ५ | बांध-बंदिस्ती व सपाटीकरण | २०००–०० | ५ | बांध-बंदिस्ती व सपाटीकरण ( ट्रॅक्टर खर्च ) | – |
| ६ | पाणी पुरवठा (चर व पाट खोदाई, पंपसेटची ने-आण) | ५०००–०० | ६ | पंपसेट, एंजिन, पाईप्स खरेदी | १००००–०० |
| ७ | – | – | ७ | मोटर फिटींग इ. | १०००–०० |
| | एकूण – | २२०००–०० | | एकूण | ५४५००–०० |

कोष्टक क्रमांक ४

## शेतकऱ्याचें एकूण शेतीपासूनचे वार्षिक उत्पन्न-पत्रक

| अ. नं. | उत्पादनाचा प्रकार | एकूण नग | दर नगाची किंमत | एकूण किंमत. |
|---|---|---|---|---|
| १ | ज्वारी (एकरी १० पोती) | ३० पोती | ११० रु. १०० किलोस | ३३००-०० |
| | बाजरी (एकरी ५ पोती) | १० पोती | १५० रु. १०० किलो | १५००-०० |
| २ | भुईमूग (एकरी ३० पोती) ( १ पोते - २५ किलो | ३० पोती | ७०० रु. १०० किलो | ५२५०-०० |
| ३ | ऊस | | | १००००-०० |
| ४ | हरभरा | १ पोते | ७०० रु. १०० किलो | ७००-०० |
| ५ | गहू | ३ पोती | ३०० रु. १०० किलो | ९००-०० |
| ६ | दुय्यम पिके | - | - | १३००-०० |
| ७ | चारा उत्पादन | - | - | ८०००-०० |
| | एकूण | | | ३०६५०-०० |

अंतर्गत कामावरील खर्च + बाह्य खर्च = एकूण उत्पादन × किंमत = उत्पन्न

१४२१० + ५७३० = ३०६५०

एकूण वार्षिक खर्च = अंतर्गत खर्च + बाह्यखर्च

२१९४० = १४२१० + ७७३०

एकूण वार्षिक खर्च + कर्ज हप्ते = एकूण खर्च

२१९४० + ४००० = २५९४०

एकूण प्राप्ती - एकूण खर्च = निव्वळ नफा

३०६५० - २५९४० = ४७१० रुपये

कोष्टक क्रमांक ५

## शेतकऱ्याची मांडवली जिंदगी व देयता

| मांडवली जिंदगी | | | देयता | |
|---|---|---|---|---|
| अ. नं. | प्रकार | किंमत | प्रकार | किंमत |
| १. | धारण क्षेत्राची किंमत | ५००००-०० | भूविकास बँक कर्ज | २००००-०० |
| २. | राहत्या घराची किंमत | ७०००-०० | नातेवाईकांचे कर्ज | १००० ०० |
| ३. | बैल बारदाना, अवजारे | १००००-०० | सोसायटी कर्ज | २०००-०० |
| ४. | विहीर-बाजार भावाने किंमत | २००००-०० | साखर कारखाना-उचल | ५०००-०० |
| ५. | पंपसेट, पाईप लाईन इ. | १५०००-०० | चारा तगाई | २०००-०० |
| | एकूण | १०२०००-०० | एकूण | ३००००-०० |

एकूण जिंदगी - एकूण देयता = निव्वळ जिंदगी

१०२०००-०० - ३००००-०० = ७२०००-००

# बनपिंप्री येथील अभ्यास पाहणीचा अहवाल

श्री. दौंडकर आणि श्री. डुंबरे
फर्गुसन कॉलेज, पदव्युत्तर केंद्र, पुणे.
श्री. सुरेश ढमढेर

पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग, फर्गुसन महाविद्यालय आणि न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बनपिंप्री या अहमदनगर पासून नगर सोलापूर रस्त्यालगत ३२ किलोमीटरवर असलेल्या गावातील शेतकऱ्यांची शेतीसाठीचे भांडवल व इतर गरजा आणि उत्पादन विषयक अभ्यास पाहणी करण्यात आली. त्यासाठी प्रा. कमलाकर परचुरे आणि प्राचार्य खासेराव शितोळे यांचे मार्गदर्शन व नेतृत्व लाभले होते. त्यावेळी म्हणजे दिनांक ६ मार्च १९८८ रोजी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. शेतकऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

उद्देश– या अभ्यास पाहणीचे अनेक उद्देश होते. तेथील शेतकऱ्यांची सद्यःस्थिती काय आहे? ते एका वर्षाचे कालावधीत कोणकोणती पिके घेतात? त्यांचा जमाखर्च कसा आहे? त्यांची कर्जाची परिस्थिती कशी आहे? त्यांचा अंतर्गत खर्च व बाह्य खर्च किती आहे? त्यांची वित्तीय जिंदगी व वित्तीय देयता किती आहे? त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न आणि वार्षिक खर्च किती आहे? सरकारी योजना आणि कर्जपुरवठा करणाऱ्या विविध संस्था यांचा त्यांना काही लाभ होतो का? इत्यादि प्रश्नांची उकल करण्यासाठी आणि त्यांची एकंदर आर्थिकस्थिती समजावी यासाठी विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. त्या मुलाखतीपैकीच एक प्रातिनिधिक मुलाखत फारच बोलकी आहे. त्या आधारे तयार करण्यात आलेला पाहणी अहवाल पुढे देत आहोत.

शेतकऱ्याचे नाव– श्री. वसंत लक्ष्मण यादव

कुटुंबाचा आकार– पाच माणसे, धारणक्षेत्र– ५ एकर जिरायती.

त्यांना मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नावरुन शेतीची विविध कामे, शेती आदाने, बाह्य खर्च, अंतर्गत खर्च, एकूण उत्पादन व एकूण प्राप्ती, देयता व जिंदगी इ. विषयक तपशील पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक क्रमांक १**

**एकूण बाह्य खर्च (Explicit Costs)**
शेतातील विविध कामे, आदाने आणि खर्च.
(Costs of operations and inputs)

| अ. नं. | कामाचा प्रकार | खर्च प्रकार | हंगाम | दर एकरी खर्च | क्षेत्र | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन बियाणांचा वापर | बियाणे | रब्बी | | | |
| | (अ) भुईमूग | | | ४० कि. १४ रु. किलो | २ एकर | ११२०–०० |
| | (ब) बाजरी | | | ३ कि. एकरी १० रु. किलो | ३ एकर | ९०–०० |
| | (क) ज्वारी | | खरीप | एकरी ३कि. २.५० रु. किलो | ५ एकर | ३७–५० |

| अ. नं. | कामाचा प्रकार | खर्च प्रकार | हंगाम | दर एकरी खर्च | क्षेत्र | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | रासायनिक खतांचा वापर | | | | | |
| | बाजरी २०:२०:० | एकरी १ गोणी | रब्बी | १२० रु. | | ४८०–०० |
| | ज्वारी २०:२०:० | एकरी १ गोणी | खरीप | ११० रु. | | ३३०–०० |
| | इतर पिके २०:२०:० | एकरी ५० किलो | खरीप | ६० रु. | | ६०–०० |
| ३. | कीटक नाशक फवारणी | औषधे | वार्षिक | २० रु. | ५ एकर | १००–०० |
| ४. | अवजारे दुरुस्ती व घसारा | — | वार्षिक | २० रु. | | १००–०० |
| ५. | कर्जावरील व्याज | — | वार्षिक | — | — | १०००–०० |
| ६. | हंगामी मजुरी | — | रब्बी | २०–०० रु. | ५ एकर | १००–०० |
| ७. | विक्री खर्च | भरणी, वाहतूक, दलाली, हमाली इ. | रब्बी | दर पोत्यास १२ रु. वाहतूक दर पोते ८ रु. | १० पोती | १२०–०० ८०–०० |
| | | | खरीप | वरीलप्रमाणे | ६ पोती | ७२–०० ४८–०० |
| | एकूण | | | | रुपये | ३८१२–५० |

वरील कोष्टकावरून स्थूल मानाने रब्बी व खरीप पिकांसाठी येणारा बाह्य खर्च आणि वार्षिक उत्पादन या बाबतची आकडेवारी स्पष्ट होते. यावरून शेतीची लाभप्रदता ठरविण्यासाठी उपयुक्त माहिती मिळते.

## कोष्टक क्रमांक दोन

## वार्षिक अंतर्गत चालू खर्च (Current Annual Implicit Costs)

### कुटुंबियांनी शेती कामासाठी केलेले कष्ट व उपयोगात आणलेली आदाने

### (Farm Operations & Inputs Endowed by the family labour & Houshold Inputs)

| अ. नं. | कामाचा प्रकार | खर्च प्रकार | हंगाम | एकरी खर्च | क्षेत्र | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नांगरणी | बैल नांगरणी | रब्बी | १५०–०० | ५ एकर | ७५०–०० |
| | | | खरीप | ५०–०० | ५ एकर | २५०–०० |
| २) | शेती कामे (वेचणी पाळी) | मजुरी | रब्बी | २५–०० | ५ एकर | १२५–०० |
| | | | खरीप | २०–०० | ५ एकर | १००–०० |
| ३) | खते व रसायने | किंमत व वाहतूक | रब्बी | ७५–०० गाडी | ३ गाड्या | २२५–०० |
| | | | खरीप | ,, | ४ गाड्या | ३००–०० |
| ४) | हंगामातील कामे | पाळी, पेरणी इ. | रब्बी | ३०–०० | ५ एकर | १५०–०० |
| | | | खरीप | २५–०० | ५ एकर | १२५–०० |
| ५) | शेतीची खुरपणी वगैरे | — | रब्बी | १००–०० | ५ एकर | ५००–०० |
| | | | खरीप | १२५–०० | ५ एकर | ६२५–०० |
| ६) | शेतीची राखण | कुंपण घालणे पाखरे हाकलणे | रब्बी | २५–०० | ५ एकर | १२५–०० |
| | | | खरीप | ३०–०० | ५ एकर | १५०–०० |
| ७) | मळणी, कापणी व इतर कामे | मजुरी व वाहतूक खर्च | रब्बी | २०–०० | ५ एकर | १००–०० |
| | | | खरीप | २५–०० | ५ एकर | १२५–०० |
| ८) | घरगुती बियाणांचा वापर | बाजरी | रब्बी | ६·२५० किलो | ५ एकर | १२–५० |
| | | ज्वारी | खरीप | ५ किलो | ५ एकर | २०–०० |
| ९) | जनावरांचा चारा | बैल १ | | | | ४००–०० |
| | | गाय १ बकरी १ | | | | ५००–०० |
| | एकूण– | | | | | ४५८२–५० |

वरील प्रमाणे शेतकरी व त्यांचे कुटुंबिय यांनी शेतीत केलेले कष्ट व शेतीसाठी उपयोगात आणलेल्या स्वतःजवळील आदानांची एकूण किंमत असल्याचे आढळते.

## कोष्टक क्रमांक ३

## एकूण वार्षिक उत्पादन आणि प्राप्ती

### (Annual Total Output and Revenue)

| अ. नं. | उत्पादन | प्रकार | एकूण नग | नगाची किंमत | हंगाम | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ज्वारी | १ एकर | १० पोती | ११० रु. १०० किलो | रब्बी | १०००-०० |
| २) | बाजरी | १ एकर | ५ पोते | १२० रु. १०० किलो | रब्बी | ६००-०० |
| ३) | भुईमुग | १ एकर | २० पोती | ७०० रु. १०० किलो | रब्बी | ३२००-०० |
| ४) | इतर | १ एकर | २ पोती | — | — | १००-०० |
| ५) | हरभरा | १ एकर | २ पोती | ७०० रु. १०० किलो | खरीप | १४००-०० |
| ६) | ज्वारी | २ एकर | ८ पोती | ११० रु. १०० किलो | खरीप | ८८०-०० |
| ७) | इतर | — | — | — | — | १२५-०० |
| ८) | चार उत्पादन | — | — | — | — | २०००-०० |
| | एकूण- | | | | | ९४०५-०० |

वरील कोष्टकानुसार एकूण वार्षिक उत्पन्न ९४०५-००

– खर्च १) अंतर्गत (Value added) ४५८२ ५०

२) बाह्य (Actual) ३८१२-५०

तात्पर्य एकूण उत्पन्न – एकूण खर्च = नफा

९४०५-०० – ८३९५-०० = १२१०-००

वास्तव (Actual) उत्पन्न वास्तव (Actual) खर्चापेक्षा थोडेसेच अधिक आहे. यावरुन सदरची शेती ही 'निर्वाह शेती' 'Subsistence farming' आढळते.

शेतकऱ्याला अप्रत्यक्षपणे मिळणारे उत्पन्न रु. ३८१२-५० एवढे आहे. त्यातूनच त्याची स्वतःची मजुरी आणि कुटुंबाचा उपभोग खर्च अंशतः भागविला जात असतो हे अनुमान काढता येते.

कोष्टक क्रमांक ४

## एकूण वार्षिक उत्पन्न
## Total Annual Revenue

| अ. नं. | उत्पादन प्रकार | रब्बी (रुपये) | खरीप (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | ज्वारी | १०००-०० | ८८०-०० |
| २. | बाजरी | ६००-०० | — |
| ३. | भूईमूग | १२००-०० | — |
| ४. | इतर | १००-०० | — |
| ५. | हरभरा | — | १४००-०० |
| ६. | इतर | — | २२५-०० |
| ७. | चारा उत्पादन | १०००-०० | १०००-०० |
| | एकूण उत्पन्न | ५९००-०० | ३५०५-०० |

कोष्टक क्रमांक ५(अ)

## एकूण अंतर्गत खर्च
## Total Annual Implicit Costs

| अ. नं. | कामाचा प्रकार | रब्बी (रुपये) | खरीप (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | नांगरणी | ७५०-०० | २५०-०० |
| २. | शेतीची इतर कामे | १२५-०० | १००-०० |
| ३. | खते व रसायने | २२५-०० | ३००-०० |
| ४. | हंगामातील कामे | १५०-०० | १२५-०० |
| ५. | शेतीची खुरपणी | ५००-०० | ६२५-०० |
| ६. | शेतीची राखण | २२५-०० | १५० ०० |
| ७. | पिकाची मळणी, कापणी इ. | १००-०० | १२५-०० |
| ८. | घरगुती बियाणांचा वापर | १२-५० | २०-०० |
| ९. | जनावरांचा चारा | ४००-०० | ५००-०० |
| | एकूण | २३८७-५० | २१९५-०० |
| | एकूण अंतर्गत खर्च | | ४५८२-५० |

### कोष्टक क्रमांक ५ (ब)
## एकूण बाह्य खर्च
### (Total Annual Explicit Costs)

| अ. नं. | कामाचा प्रकार | रब्बी रुपये | खरीप रुपये |
|---|---|---|---|
| १) | नवीन बियाणांचा वापर | १) ११२०-०० | — |
| | | २) ९०-०० | ३) ३७-५० |
| २) | रासायनिक खतांचा वापर | ४८०-०० | ३३०-०० |
| | | ६०-०० | — |
| ३) | कीटक नाशकांचा वापर | — | १००-०० |
| ४) | अवजारे दुरुस्ती व घसारा | — | १००-०० |
| ५) | कर्जावरील व्याज | — | १०००-०० |
| ६) | हंगामी मजूरी | १००-०० | ७५-०० |
| ७) | विक्री खर्च | १२०-०० | ८०-०० |
| | | ७२-०० | ४८-०० |
| | एकूण- | २०४२-०० | १७७०-५० |

एकूण वार्षिक बाह्य खर्च = रब्बी + खरीप
३८१२-५० = २०४२-०० + १७७०-५०

### कोष्टक क्रमांक ६
## भांडवली जिंदगी व देयता
### (Total value of Assets and Libilihies)

| अ. नं. | जिंदगी प्रकार | किमत रुपयात | देयता प्रकार | किमत रुपयात |
|---|---|---|---|---|
| १) | धारण क्षेत्र | ३५०००-०० | बँकेचे कर्ज | ५०००-०० |
| २) | राहत्या घराची किमत | ५०००-०० | नातेवाईकांचे कर्ज | ८०००-०० |
| ३) | बैलबारदाना व इतर | ८०००-०० | सह. सोसायटी कर्ज | १००००-०० |
| ४) | | — | चारा-तगाई | १०००-०० |
| | एकूण- | ४८०००-०० | | ३३०००-०० |

जिंदगी - देयता = निव्वळ जिंदगी
४८०००-०० - ३३००० = १५०००

शेतकऱ्याच्या मालमत्तेचे मूल्य आणि कर्जाचा बोजा यात फारसा फरक नाही हे उपरोक्त कोष्टकांवरुन स्पष्ट दिसते. तथापि उदाहरणादाखल हा 'प्रातिनिधिक' (Representative) शेतकरी नादार (Insolvent) नाही हे या सर्व पाहणीवरुन दिसून येते.

या आर्थिक सर्वेक्षणाच्या निमित्ताने उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे खालील प्रकारचे काही ठळक निष्कर्ष काढता येतात.

**निष्कर्ष**

१. या जिरायत शेतकऱ्याला रु. १११० नफा होत असल्यामुळे तो अजूनही शेती करत आहे. कारण त्याच्या या धारणक्षेत्रातून त्याचा उदरनिर्वाह अजूनही होऊ शकतो. म्हणूनच अशा शेतकऱ्यास तग धरणारा (Viable) किंवा सीमान्त (Marginal) शेतकरी म्हणावयास हरकत नाही.

२. वरील आकडेवारीवरुन आपल्याला असे दिसून येते की, जिरायत शेतकऱ्याचा बाह्यखर्च बागायत शेतकऱ्यांपेक्षा फारच मर्यादित १६२६१चा आहे.

३. जिरायत शेतकऱ्यांचा कर्ज बाजारीपणा हा जास्त वाढीस लागला असून जर नैसर्गिक आपत्ती म्हणजे दुष्काळ, अवर्षण, इत्यादी पुढील तीन-चार वर्षांच्या काळात अशीच येत राहीली तर शेती व्यवसाय धोक्यात येणार आहे.

४. जिरायती शेतकऱ्यांना इतर पिकांच्या तुलनेत भूईमुग या पिकाच्या उत्पादनापासून त्यातल्या त्यात जास्त उत्पन्न मिळते. पण ते बरेच बेभरवशाचे (Uncertain) असते.

५. अत्यंत महत्वाचा निष्कर्ष असा काढता येतो की, सरकारी योजनांचा लाभ हा गरीब शेतकऱ्यांपर्यन्त पोहोचू शकत नाही. त्यामुळे त्याचा फायदा फक्त बागायतदार शेतकऱ्यांनाच होतो. तसेच त्याला मिळणारा भांडवल-कर्ज पुरवठा फारच अल्प व अपुरा असतो.

६. या जिरायती शेतकऱ्याचा विचार करता त्याची एकूण जिंदगी ही त्याच्या एकूण देयतेपेक्षा जास्त आहे आणि म्हणून तो अजूनही शेती व्यवसायात आपले स्थान टिकवून आहे. अजूनही त्याला त्याची शेती विकायला लागून त्याला दारोदार हिंडावे लागत नाही. अर्थात् एवढ्यावर समाधान मानून शासन व समाजसेवी संस्था आणि वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांनी शेतकऱ्यांच्या दुःस्थितीकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही.

भारतातील शेती हा पावसावर खेळला जाणारा जुगार आहे असे म्हणतात ते बरोबर आहे. निसर्ग अनुकूल राहिला तर जिरायत शेतकरी देखील बागायत शेतकऱ्याच्या जोडीला येऊ शकतो. त्यामुळेच जिरायत शेती ही आजही फार तोटयाची किंवा सोडून द्यावी अशी स्थिती झालेली नाही. निसर्ग सततच प्रतिकूल राहिला तर मात्र बागायत शेती देखील किफायतशीर राहणार नाही. जिरायत शेतीतील अवस्था अशावेळी भयावहच असेल. हीच गोष्ट गेल्या काही वर्षातील सततच्या दुष्काळाने दाखवून दिली आहे.



# सातव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधि अहवाल
## मार्च १९८८

-प्रा. कमलाकर परचुरे

(एक टिपण-नियोजन मंडळाने सरकारी कर्जात झालेल्या वाढीबद्दल व्यक्त केलेली चिंता)

राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीसाठी नियोजन मंडळाने सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यवाहीचा मध्यावधि आढावा सादर केला. त्यात खालील समस्यांबाबत मंडळाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

१. अंतर्गत व परदेशी कर्जातील प्रचंड वाढ.

२. योजना बाह्य ( Non-plan expenditure ) खर्चातील घातक व अवाजवी वाढ.

३. योजनांकरिता महसुलवाढीच्या साधनांकडून उपलब्ध होणारी अपुरी मदत.

४. तुटीचा अर्थभरणा व अनुत्पादक खर्चातील वाढ.

५. महागाई भडकण्याची चिन्हे.

६. निर्यातीतून मिळणारे परदेशी चलन उत्पन्न असमाधानकारक. अपुरी निर्यात वाढ.

७. परदेशी चलनाच्या ताळेबंदात मोठी तूट.

८. रेल्वे, पोस्ट या खेरीज बाकीच्या सरकारी उद्योगातून मिळणारे नफे असमाधानकारक.

९. संरक्षणखर्च, सबसिडी व व्याजदेणी यावरील वाढते खर्च आवरते घेण्याची गरज. महसुली उत्पन्नातील सुमारे ७०% या दोन बाबीवरच खर्च होत असल्यामुळे महसुली तूटही वाढण्याची अनिष्ट प्रवृत्ती.

१०. अवर्षण, इत्यादी कारणांनी एकूण विकास दर मंदावलेला.

| वर्ष | विकासेतर खर्चाचे प्रमाण | विकास खर्चाचे प्रमाण |
|---|---|---|
| १९८१-८२ | ४६.० | ५४.० |
| १९८२-८३ | ६४.६ | ३१.४ |
| १९८३-८४ | ५१.४ | ४८.६ |
| १९८४-८५ | ६६.२ | ३३.८ |
| १९८५-८६ | ५८.५ | ४१.५ |
| १९८६-८७ | ७१.८ | २८.२ |
| १९८७-८८ | ७३.३ | २६.७ |

सारांश, अनुत्पादक खर्चाचे प्रमाण ३:१ किंवा एकूण खर्चातील ३/४ इतके झाल्यामुळे या प्रवृत्तीला त्वरित आळा घालण्याची गरज आहे.

• • •

# महाराष्ट्राचा अर्थसंकल्प

— श्री. सुरेश ढमढेरे

महाराष्ट्र राज्याच्या सन १९८८–८९ या वर्षाच्या अर्थ संकल्पात एकूण खर्च २४३० कोटी रुपये होणार आहे. उत्पन्नाच्या बाजूस २१०८.७७ कोटी रुपये अपेक्षित आहेत. परिणामी एकूण तूट २१२.५५ कोटी रुपयांची आहे.

हे अंदाज पत्रक पहाता काही खास वेगळे असलेले त्यात आढळून येत नाही. प्रत्येक अंदाजपत्रकात काही तुरळक चांगल्या तरतुदी असतात. तथापि देखावा करणाऱ्या मांडणीचे कौशल्यच जास्तीत जास्त प्रत्ययास येते. यात २१२.५५ कोटी रुपयांची अंदाजपत्रकीय तूट असून १४९.५ कोटी रुपये एवढया कर आकारणीच्या सहय्याने व शून्याधारित अर्थसंकल्प पद्धतीमुळे अनावृत्त (Uncovered) आर्थिक तूट १८.४० कोटीवर आणण्याचे कसब अर्थमंत्र्यांनी दर्शविले आहे.

शून्याधार अंदाजपत्रकामुळे प्रगतीशील प्रशासकीय बचत साधवयांच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांचे स्वागत करावयास हवे. खर्च वाढविणाऱ्या आर्थिक तत्वांचे पोषण करणाऱ्या अनुदानाचा वाढता उपयोग करण्याकडे प्रस्थापित सरकारचा कल आढळून येतो. त्याबाबत टीकाही वाढत्या प्रमाणात होतांना दिसते. या अन्याय तत्वाचे प्रशासकीय पातळीवर अनेक दुष्परिणाम झाले आहेत. या तत्वामुळे व्यवहारात फारसा विधायक बदल झालेला दिसून येत नाही. हे अंदाजपत्रकही त्याला अपवाद नाही.

सुमारे १०८१ कोटी रुपयांचे अनुदान वाटपाची तरतूद अंदाजपत्रकात केली आहे. अर्थमंत्र्यांनी सबसिडी संबंधी स्वतंत्र विवरण सादर केले ही विशेष उल्लेखनीय बाब होय. केंद्र सरकार व अन्य राज्य सरकारांनीही या उपक्रमाचे अनुकरण करावयास हवे असे वाटते.

पुढील वर्षी करदर शुल्क आकारणीच्या द्वारे रु. १४९.५ कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे. ते प्रामुख्याने विक्रीकर, विद्युतकर या पासून मिळविण्याचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने अंदाजपत्रक पूर्व व अंदाजपत्रकात केलेल्या दरवाढ व करवाढ यामुळे व आताच्या करांमुळे भाववाढीत भरच पडणार आहे. शिवाय तूट भरून काढण्यासाठी मोठ्याप्रमाणावर चलन निर्मितीचे आणि त्यामागोमाग येणाऱ्या महागाईच्या संकटाचे भयही वाढले आहे.

वीजदर वाढल्यामुळे उद्योग व्यापारावर तर प्रतिकूल परिणाम होईलच पण अगतिक सामान्य ग्राहकाची अनवस्था अधिकच वाढणार आहे.

लाकडांवरील कर वाढल्याने घर बांधणी–सारख्या अग्रक्रमी गरजेच्या कार्यक्रमावरही मर्यादा पडणार आहेत.

मोटार वाहनावरील विक्रीवर व प्रवेशकर वाढविल्यामुळे इतर राज्यातून कर चुकवून येणाऱ्या वाहनाना प्रतिबंध होईल. ही या प्रकारच्या कर आकारणीमुळे साध्य होणारी चांगली बाब आहे. उत्पन्नात भर टाकण्याचा हा प्रयत्न योग्य वाटतो.

केंद्र सरकारच्या सूचनेवरुन विमानासाठी लागणाऱ्या इंधनावरील विक्रीकर महाराष्ट्र सरकारने यापूर्वी रद्द केला होता. त्यामुळे कमी झालेल्या उत्पन्नाची भरपाई करुन देण्याचे केन्द्राने आश्वासन

देऊनही ते पाळले नाही, त्यामुळेच राज्य सरकारने चालू वर्षी या प्रकारच्या इंधनावर पुन: विक्रीकर लागू केला आहे. दरवर्षी होणारे ३० कोटी रुपयांचे नुकसान या करामुळे १० कोटी रुपये इतके कमी करता येईल.

## आर्थिक सूट व सवलती

केंद्रीय अंदाजपत्रकाच्या पावलावर पाऊल ठेवून याही अंदाजपत्रकात शेती व्यवसायाला विशेष प्राधान्य देण्यात आलेले आहे. शेती, पाणीपुरवठा, विद्युत यावर पुढील वर्षी नियोजन खर्च एकूण योजनेत ५४% एवढा आहे. कल्याणकारी योजनांसाठी केलेली तरतूद अशीच समाधानकारक वाटते. जीवरक्षक औषधे, अपंगासाठी उपयुक्त साधने यावरील विक्रीकर मुक्तीची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

नुकत्याच सादर करण्यात आलेल्या खासदार विखे पाटील समितीच्या शेतमजुरांच्या किमान वेतनाबाबतच्या अहवालानुसार शेतमजुरांच्या सध्याचे वेतनाचे दर दुप्पट करुन तो स्वीकारल्याचे सुचविण्यात आले आहे. तथापि गरीब वर्गासाठी पुरविलेल्या अन्य सवलती बहुतांशी दिखाऊ स्वरुपाच्या असून त्या नगण्य मानता येतील. उदाहरणार्थ, सर्वसाधारण लग्न पत्रिकेवरील विक्रीकर, प्लॅस्टिक व रबराच्या पादत्राणावरील विक्रीकर माफ करण्यात आला, नाममात्र उत्पन्न देणारी पिक कर्जावरील स्टॅंप ड्यूटीतील सूट, सर्वसाधारण तयार कपड्यावरील विक्रीकर माफी आणि गरीबांना लागणाऱ्या तवे, कढया, लाकडी पोळपाट, लाटणी, इत्यादीवरील करमाफी या सवलती पाहिल्या की, त्यांचे सर्वसामान्य स्वरुप सहज लक्षात येईल. यामुळे गरीबांच्या पदरात भरीव असे काहीही पडणार नाही.

शेती व ग्रामीण गरीबांच्या बरोबरीनेच नागरी दुर्बलांचाही विचार व्हावयास हवा होता असे वाटते. महाराष्ट्र राज्य हे तुलनेने अधिक उद्योगप्रधान राज्य असल्याचे सांगितले जाते. काही विशिष्ठ शहरापुरते हे मान्य करुनही उद्योगांच्या वाढीसाठी या अंदाज-पत्रकात विशेष तरतूद केलेली आढळत नाही.

औद्योगिक विकेंद्रीकरण करण्यास अनुकूल व प्रोत्साहक धोरणे आखून व सवलती देऊन रोजगार निर्मिती व शेतीमधील लोकसंख्येचे व्यावसायिक स्थलांतर साधणे शक्य होणार आहे. त्या दिशेने मात्र अंदाज-पत्रकाचे पाऊल पडलेले दिसत नाही. पेट्रोल, कोळसा, लोखंड, पोलाद, तारखाते, टेलिफोन, रेल्वे मालवाहतूक यांच्या दरातील वाढ अबकारी करातील वाढ यामुळे उद्योग धंद्यावरील आर्थिक बोजा आधीच वाढला असताना राज्य सरकारची औद्योगिक क्षेत्रा-बाबतची उपेक्षा योग्य वाटत नाही.

राज्य सरकारला एकूण विकासासाठी उत्पन्नाची साधने कमीच पडत आहेत. शेती व समाज कल्याण-कारी योजनांसाठी आर्थिक आणि राजकीय कारणा-साठी विशेष सहाय्य व सवलती देणे निकडीचे वाटले तरी सरकारच्या अन्य क्षेत्राबाबतच्या जबाबदाऱ्या कमी महत्त्वाच्या मानता येणार नाहीत. त्यामुळे त्यांची उपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. प्रस्तुत अंदाजपत्रक म्हणूनच गुणवत्तेच्या दृष्टीने एकांगी व असमतोल झाले आहे. महाराष्ट्राचे हे अंदाजपत्रक आपल्या सिमित क्षेत्रापुरते पारंपारिक व तडजोडवादी स्वरुपाचे दिसते.

प्रस्तुत अंदाजपत्रकानुसार विक्रीकरांचे उत्पन्न सर्व साधनांपेक्षा सर्वात जास्त म्हणजे ६७ को. रु. एवढे मिळणार आहे. यात ३० को. रु. महसूल अधिक मिळणार आहे. मोटार वाहनावर १५ टक्के विक्रीकर अधिक लावला आहे.

वीजेवरील वाढत्या दरामुळे ३३ को. रुपये उत्पन्न वाढेल. मद्य विक्रीकरापासून १७ को. रुपये जादा मिळतील.

नवीन अंदाजपत्रकात ज्यांचे वेतन ८०० ते १२०० रुपये आहे त्यांना १५ रुपये व्यवसायकर द्यावा लागेल. ज्यांचे मासिक उत्पन्न १२०० रु. पेक्षा जास्त आहे त्यांना २० रु. व्यवसायकर द्यावा लागेल.

मागास भागामध्ये काम करणाऱ्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईभत्त्यामध्ये मासिक २० रुपयापासून ते १०० रुपयापर्यंत वाढ दिली जाणार आहे ती केंद्रशासनाच्या योजनेनुसारच.

अल्पबचतीत महाराष्ट्र राज्य भारतात अग्रेसर राहिले आहे. परंतु केंद्र सरकारच्या धोरणानुसार त्यातील राज्याला मिळणाऱ्या वाट्यात कपात झाली असल्या कारणाने, तसेच राज्य प्रगतीशील आहे या सबबीवर केंद्राकडून राज्याला मिळणारी अनुदाने अत्यंत अल्प व अपुरी असल्या कारणाने महाराष्ट्र राज्याला अर्थसंकल्पातील तूट भरून काढणे जड जाणार आहे. इतर राज्यांच्या तुलनेने आपल्यावर असणाऱ्या करांचा व करेतर उत्पन्नाचा बोजा जास्त आहे. त्या कारणाने राज्याचा गाडा चालविण्याकरिता केंद्रावर विसंबावे लागेल. नेमकी हीच व्यथा राष्ट्रीय विकास मंडळाच्या (देशातील सर्व मुख्यमंत्री, नियोजन मंडळ सदस्य व महामंत्री यांच्या उपस्थितीत) नुकत्याच झालेल्या वादळी बैठकीत राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी निर्भीडपणे व्यक्त केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. कॉंग्रेसची सरकारे असलेल्या राज्यातील कोणताही अन्य मुख्यमंत्री इतके स्पष्ट निवेदन करण्यास धजला नाही. महाराष्ट्र राज्याच्या मंत्र्यांनी असा कणखरपणा दाखविल्यास राज्याचे मूलभूत वित्तीय प्रश्न सोडविणे जमू शकेल.

राज्याच्या चालू वर्षाच्या अर्थ संकल्पात वाढीव पगार व भत्ते यामुळे अनुत्पादक व प्रशासकीय खर्चात झालेली वाढ अनिष्ट आहे. त्यावर आवर घालण्याकरिता व खर्चाचा ओघ विकास कार्यांकडे वळविण्याकरिता विशेष प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

## महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प १९८८-८९ दृष्टिक्षेपात आकडेवारी

नवीन कर (जुन्या कराव्यतिरिक्त) १४९.५० कोटी रुपये त्यातील हिस्से पुढीलप्रमाणे:—

विक्रीकर ६७ कोटी रुपये, वीजेवरील कर ३३ कोटी रुपये, स्टॅंप ड्यूटी १९ कोटी रुपये दारुबंदी खाते परवाना शुल्क १७ कोटी रुपये, मोटार वाहन कर १० कोटी रुपये, व्यवसाय कर ३.५ कोटी रुपये.

टीपण – याचाच अर्थ असा की, चालू वर्षी वीजग्राहक, मद्यपान करणारे, मोटारी व वाहनांचे मालक व चालक तसेच व्यावसायिक या वर्गावरचा करभार अधिक प्रमाणावर वाढवला आहे. शून्याधारित अर्थ संकल्पाने ५ कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे. ३००० रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या मंगळसूत्रावर विक्रीकर नाही. तसेच विवाहाच्या निमंत्रण पत्रिकावरील करात सूट देण्यात आली आहे. २५ रुपयापेक्षा कमी किंमतीच्या पादत्राणावरील विक्रीकर रद्द केला आहे.

मात्र शीतपेटयांमध्ये ठेवलेले मटन आणि चिकन, पॉलिथिन पिशव्या, चांगल्या प्रतीचे लाकूड यांच्या ग्राहकांना अप्रत्यक्ष कर द्यावे लागतील. विदेशी मद्यावरील दर लिटरमागे सरसकट पाच रुपये करवाढ झाल्यामुळे अशा मद्याच्या दर लिटरच्या किंमतीमध्ये त्यांच्या गुणवत्तेनुसार दोन ते १२ रुपये वाढ होईल, हुंडाबळी आणि बलात्कार यासंबंधीचे खटले चालविण्यासाठी ६.२५ कोटी रुपयांची विशेष तरतूद या वर्षी केली आहे. राज्यांनी चालवलेले उद्योग अपेक्षित नफा मिळवतील अशी शक्यता दिसत नाही.

# रेल्वे आणि पोस्ट यांचे नवे दर

श्री. सुरेश ढमढेरे

नुकतेच रेल्वे मंत्री श्री. माधवराव शिन्दे यांनी १९८८–८९ चे रेल्वे अंदाजपत्रक लोकसभेत मांडले त्यानुसार रेल्वेच्या वहातूक दरात केलेल्या वाढीमुळे केंद्र शासनास ६६२ कोट रुपये अधिक मिळणार आहेत. त्याचप्रमाणे पोष्ट व दूरसंदेश यांच्या दरवाढी मुळे ५४९ कोट रुपये अधिक मिळणार आहेत. ही वाढ एक एप्रिल १९८८ पासून अंमलात आली आहे.

१९८८–८९ च्या अंदाजपत्रकात रेल्वेच्या प्रवासामध्ये रेल्वे तिकीट, प्लॅट फॉर्म तिकीट, पार्सल व लगेज यांच्या दरात वाढ केली आहे.

दूर संदेशवहनापासून ५०० को. रु. अधिक मिळतील. पोस्टाच्या दरवाढीमुळे ४९ को. रु. जादा मिळतील.

मनीऑर्डर, रजिस्ट्रेशन फी, आंतरदेशीय पत्र, दूरसंदेश, ट्रंककॉल व सार्वजनिक टेलिफोन यांच्या दरामध्ये वाढ झाली आहे. रेल्वे अंदाजपत्रकात गेल्या वर्षापेक्षा २८ को. रु. वाढ दाखवली आहे..

१९८८–८९ मध्ये रेल्वे भाड्यापासून २४१ को. रुपये उत्पन्न मिळणार आहे. रेल्वेच्या सर्व प्रवास दरामध्ये वाढ झाली आहे. मासिक पास धारकासह या वाढीमुळे ३५८ को. रु. अधिक मिळणार आहेत. पार्सल व लगेज यामध्ये १० टक्के वाढ केली असून त्यापासून २३ को. रु. मिळतील.

रेल्वे प्रशासनाकडून मिळणारा लाभांश ७३६ को. रु. हा पर्यायाने सरकारी जमेच्या बाजूस जाईल.

सुरवाती पासूनच्या रेल्वे प्रवासी भाड्यात ५० पैशाने वाढ केली आहे. सर्वसाधारणपणे दुसऱ्या वर्गाच्या भाड्यामध्ये ९५ रुपयांनी वाढ केली आहे. त्यात एअर कंडिशनिंगची व झोपण्यांची व्यवस्था असेल. पहिल्या वर्गातील एअरकंडिशन्ड डब्यातील १० टक्के दुष्काळ निवारणासाठी कर सर्वसाधारणपणे लावलेला आहे. याच वर्गाच्या प्रवाशी भाड्यातही १० टक्के वाढ करण्यात आली.

प्लॅटफॉर्म तिकीट, मासिक पास, रिझर्व्हेशन, यामध्ये ५० पैशांनी वाढ केली आहे. दुसऱ्या वर्गाच्या व ठराविक वेळेसाठी मासिक पास धारकांच्या तिकीट दरात ४ ते ८ रुपयांनी वाढ केली आहे मागील सात वर्षापेक्षा प्रथम वर्गाच्या प्रवाशांच्या भाडामध्ये बदल केला असून प्रथम वर्गातील स्लीपर बर्थचे १२ रुपये व्यवस्थेसाठी तर ६ रुपये चेअरकरिता, त्याचप्रमाणे दुसऱ्या वर्गातील प्रवाशांना बर्थकरिता १ रुपये आणि दुसऱ्या वर्गासाठी २ रुपये असे अधिक कर द्यावे लागतील.

मनिऑर्डरच्या दरामध्ये ५० रुपयांपर्यन्त वाढ झाली असून ३० पैसे ते ४० पैशापासून १० रुपये अथवा त्याहून अधिक परंतु किमान ५० पैसे कमिशन घेण्यात येणार आहे.

रजिस्ट्रेशन फीमध्ये वाढ झाली असून ४–५० रुपयांची रजिस्ट्रेशन फी ५ रुपये झाली आहे. पोस्टेज-मध्ये ३५ पैशांनी वाढ झाली असून आंतरदेशीय पत्रात वाढ झाली नाही. छापील आंतरदेशीय पत्रामध्ये १५ पैशाने वाढ झाली आहे तर छापील पाकिटाची किंमत १५ पैशाने वाढली आहे.

टेलिफोन दरामध्ये मासिक दरात पूर्वीच्या १०० कॉलमध्ये कोणताही बदल केला नाही. एक्स्चेंज

पद्धतीप्रमाणे १०० लाईन किंवा १००० लाईनमध्ये १२५ रुपये ते १४० रुपयांनी वाढ केली आहे. द्वैमासिक भाडे, एक्स्चेंज पद्धतीमध्ये १०,००० लाईन ३०००० लाईन एकलाख, तीनलाख व तीनलाखापेक्षा जास्त लाईनसाठी अनुक्रमे ३५ रु., ५० रु., ७५ रु., १०० रु. व १३० रुपयांनी वाढ केली आहे.

सार्वजनिक टेलिफोन ५० पैशावरुन प्रत्येक कॉलला १ रुपया केला आहे. एस्. टी. डी. कॉलला प्रत्येक युनिटला आता ६० पैशाऐवजी एक रुपया पडेल.

प्रत्येक टेलिफोन धारकाला २७५ कॉल मोफत केले असून पुढच्या २००० कॉलपर्यंत २० पैशांनी वाढ केली आहे. ती पूर्वी ६० पैसे होती ती आता ८० पैसे केली आहे. त्यापुढील म्हणजे २००० कॉलपासून ५००० कॉलपर्यंत २० पैशांनी वाढ केली आहे. म्हणजेच प्रत्येक कॉलला ८० पैसे होते ते आता एक रुपया करण्यात आला आहे. ५००१ च्या पुढील कॉल्सना प्रत्येकी ४५ पैसे वाढ केली आहे, पूर्वी ८० पैसे होते आता रु. १-२५ झाले आहेत.

ट्रंक कॉलचे दर पहिल्या २० किलोमीटरला दरात बदल नाही. त्यापुढील १०० किलोमीटरपर्यन्त २ ते ८ रुपयें वाढ झाली आहे. १०० ते २०० किलोमीटरला १२ ते १६ रुपयें वाढ, २०० ते ५०० किलेमिटरला रु. १८ ते २७ वाढ, ५०० ते १००० कि. मी. ला ३० ते ३६ रु. वाढ आणि १००० कि. मीटरच्या पुढे ३६ ते ४५ रु. वाढ करण्यात आली आहे.

० ० ०

# औद्योगिक विकासाचे अर्थशास्त्र

## 'भारतापुढील आव्हाने'

मूळ लेख-प्रा. डी. आर. आठवले (चाळीसगाव), अनुवाद-प्राचार्य खासेराव शितोळे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी साम्राज्यवाद्यांच्या जोखडाखालून मोठ्या आर्थिक विकासाच्या आशा आकांक्षा उराशी बाळगून भारत हे स्वतंत्र राष्ट्र उदयास आले. त्यावेळी देश राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होता परंतु आर्थिकदृष्ट्या अतिशय दुर्बल होता. शेती व उद्योग यात एकाचवेळी विकास घडवून आणण्याची मोठी समस्या देशासमोर होती. दुर्दैवाने अर्थव्यवस्थेच्या या दोन्ही क्षेत्रात कमालीची दुर्बलता होती. त्यामुळेच जलद औद्योगिकीकरणावरच आशा केंद्रीत करण्यात आल्या. कारण त्यामुळे उद्योगक्षेत्रातील जलद उत्पन्नवाढीचा उपयोग शेतीच्या व इतर क्षेत्रांच्या विकासाकरिता करता येणार होता. त्यावेळी असा विचार करण्यात आला होता की, उत्पादनातील जलदगती वाढ व विविधता संरचनात्मक बदल घडवून आणील व त्यायोगे आर्थिक वृद्धी व विकास यांना चालना मिळेल.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास देश दारिद्र्य, बेरोजगार, अतिरिक्त लोकसंख्या, शिक्षणाचा व कौशल्याचा अभाव, आणि अशाच इतर वाईट गोष्टींच्या कचाट्यात सापडलेला होता. या सर्व प्रश्नांचे उत्तर जलद औद्योगिकीकरणात मिळेल असे सर्वांना वाटत होते. उद्योगक्षेत्र हे एक गतिमान क्षेत्र आहे-हे खरे असले तरी सर्वांगीण आर्थिक विकासाच्या व्यूहाचा ते एक घटक आहे. येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीचे मूल्यमापन इतर घटक विचारात न घेता करता येणे कठीण आहे. उद्दीष्ट पूर्तीसाठी शेती व

इतर क्षेत्रांचे सहकार्य आणि शासकीय धोरणे यांची उपयुक्तता निखालस अधिक आहे हे तितकेच खरे आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अड-थळ्यांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. विकासाच्या प्रारंभिक प्रयत्नात औद्योगिकीकरणावर विविध मार्गांचा अवलंब करुन अधिक भर देण्यात आला. त्या प्रयत्नांचा खालील काही परिच्छेदातून आढावा घेतला आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेअखेरीस असे दिसून आले की, शेतीक्षेत्राने शासकीय धोरणास फारच कार्य-क्षम व उत्तम असा प्रतिसाद दिला आहे. त्यामुळेच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्राऐवजी मूलभूत व अवजड उद्योगावरच अधिक भर देण्यात यावा असा विचार निश्चित करण्यात आला त्यानुसार मूलभूत व अवजड उद्योगाचा विकास हाच औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू मानण्यात आला. त्यामुळेच मोठ्या प्रमाणावरील उद्योगाच्या विकासाठी व घर-गुती उत्पादित वस्तूंच्या उत्पादनासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होऊ शकतील अशी अपेक्षा होती. परिणामी या क्षेत्रांत योजना काळात प्रचंड प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली. मात्र या क्षेत्रात गुंतवणूक केल्यानंतर प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात होईपर्यंतचा कालावधी इतका मोठा होता की तो सहन करणे आपल्या अर्थव्यवस्थेला परवडेनासे झाले. त्यातून सर्वक्षेत्रातील किंमत वाढीला उत्तेजन मिळाले. योजनाकारांना परिस्थितीने जबरदस्त धक्का देऊन चांगलाच धडा शिकविला. परिणामी तिसऱ्या योजने-तील डावपेचात (Strategy) पुन: बदल कर-ण्यात आला. शेतीला पुन: प्राधान्य देण्यात आले. भारतावरील चीनचे अनपेक्षित आक्रमण आणि जाग-तिक बँकेने भारत सरकारला रुपयाचे अवमूल्यन करण्याबद्दल दिलेला सल्ला यांनी भारताच्या औद्यो-गिक विकासाच्या इतिहासाला एकदम नाट्यपूर्ण कलाटणीच देऊन टाकली. एक जबरदस्त धक्का बसला.

समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रचंड प्रमाणावरील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या निर्मितीमुळे भारताच्या अगोदरच खाला-वलेल्या आर्थिक परिस्थितीची आणखीच दुरावस्था झाली. हे क्षेत्र पांढरा हत्ती आहे हे हळूहळू सिद्ध होत गेले. कारण या क्षेत्राला फार मोठ्या प्रमाणावर परकीय हुंडणावळीची गरज लागत असे आणि आपल्याकडे ते तर अतिशय दुर्मिळ होते. या क्षेत्रा-साठी लागणारे श्रेष्ठ दर्जाचे तंत्रज्ञान, अद्ययावत यंत्रसामुग्री भारतात उपलब्ध नव्हती. याशिवाय या क्षेत्रात भारतीयांना फारच अल्प रोजगार संधी उपलब्ध होत होत्या. समाजवादाची अपेक्षा करणे आणि तो प्रत्यक्षात आणणे या दोन गोष्टी पूर्णत: भिन्न आहेत. वस्तुत: योजनाकारांनी भांडवलशाहीचा व्यवहार आणि समाजवादाचे अंतिम उद्दिष्ट नजरे-समोर ठेऊन आर्थिक गोंधळातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधायला हवा होता. (आज अनेक समाजवादी समाज याच मार्गांचा अवलंब करतांना दिसत आहेत.)

प्रारंभिक अवस्थेत हा एक चांगला पर्याय म्हणून भारताने जलद व गतिमान औद्योगिकीकरणा-साठी स्वीकारण्यात औचित्य दाखविले. आजही त्या पर्यायाचा वापर केला जात आहे. आयात केलेल्या उपभोग्य वस्तूंची मागणी उत्तरोत्तर वाढत आहे. आता असे वाटते की आयात वस्तू देशी उपभोग्य वस्तू उत्पादनांची जागा घेतील. त्यामुळे परदेशातून आयात केलेल्या सुट्या भागापासून देशात वस्तु तयार करण्याच्या उद्योगाला जोरदार चालना मिळाली. भारतात दुय्यम स्वरुपाच्या वस्तु उत्पादनांवर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे भांडवली वस्तु उत्पादना-बरही जोर दिला गेला. या धोरणामागे योग्य असे तर्कशुद्ध विचार होते. मात्र परकीय चलन-विषयक अडचणी मुळे यात म्हणावे असे यश मिळणे अवघड होते. आयात व निर्यात यातील तफावत सारखी वाढतच गेली. त्यातूनच परकीय चलनविषयक गंभीर समस्या उद्भवली. आजही या स्थितीत फारसा बदल झालेला नाही.

औद्योगिक वसाहतींच्या माध्यमातून उद्योगांच्या विकेंद्रीकरणाचे धोरण आर्थिकदृष्ट्या तग धरण्या-सारखा प्रकार आहे असे सिद्ध झालेले नाही. कारण

या औद्योगिक वसाहतींना संरचनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे औद्योगिक केंद्राकडून या वसाहतींकडे भांडवल आकर्षित होऊ शकले नाही. कर, वाहतूक वीज पुरवठा व तत्सम सवलती उद्योजकांमध्ये आवश्यक तेवढा उत्साह निर्माण करुन औद्योगिक वसाहती झपाट्याने विकसित करु शकल्या नाहीत.

औद्योगिकीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा हा सरकारी धोरणाचाच आहे. याबाबत उद्योजकात खचितच एकमत होईल. कारण ही धोरणे सतत धरसोडीची होती. त्यात सातत्यता नव्हती. शिवाय ती राबविण्यातही जिद्द नव्हती. परिणामी परवाने व लायसेन्सेसचे महत्व अवास्तव प्रमाणात वाढले. त्यातून गैरप्रकार, भ्रष्टाचार व जास्तीत जास्त पैसा मिळविण्याची विकृत लालसा निर्माण झाली. अलिकडे मात्र शासनाने आपल्या धोरणात बदल केला असून अनेक निर्बंध कमी केले आहेत.

या सर्व पार्श्वभूमिवर आता आपण आपल्या राष्ट्रापुढील आव्हानांचा विचार करु या.

प्रथमदर्शनी आपल्या लक्षात येईल की, भारतातील औद्योगिकीकरणाच्या प्रयत्नांचा राहणीमानावर चांगलाच परिणाम झालेला आहे. त्या सर्वांचा इतर क्षेत्रातील विशेषत: शेतीक्षेत्राच्या विकासासाठी निकटचा संबंध आहे. शेती आणि उद्योगक्षेत्रातील सुसंवादी विकासच जलद औद्योगिकीकरणासाठी अत्यावश्यक आहे. ही दोन्ही क्षेत्रे एकमेकांना किती प्रमाणात व कोठपर्यंत एकमेकांच्या प्रगतीत मदत करतात तेच शेवटी अर्थव्यवस्थेच्या एकूण वृद्धीवर व औद्योगिकीकरणावर परिणाम करणारे घटक ठरणार आहे. या दिशेने खूप काम करता येण्यासारखे आहे.

भारतासारख्या देशात उद्योगधंद्यांनी साध्या उत्पादक व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करावयास हवे. अशा वस्तू उत्पादनाचे कार्य श्रमप्रधान तंत्रज्ञानाने करुन स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन देऊ शकते. पॉवर टिलर, कृषि अवजारे, कापड, अन्न, फर्निचर, साध्या घरगुती वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स, बसेस, पंखे, सायकल, इत्यादी यांच्या उत्पादनासाठी प्रचंड भांडवल गुंतवणुकीची गरज नाही. खास तंत्रज्ञानाची गरज नसते. विकसित अथवा औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनी स्वीकारलेल्या तंत्राने व पद्धतीनेच विकसनशील राष्ट्रांनी आपला विकास करवून घेणे नेहमीच योग्य ठरत नाही. योजनाकारांनी प्रथमत: जनसामान्यांच्या गरजांची पाहणी करुन त्यानुसार उपलब्ध साधन सामग्रीच्या सहाय्याने या गरजांच्या पूर्तीसाठी आवश्यक त्या वस्तू व सेवांचे उत्पादन कसे जास्तीत व पुरेशा प्रमाणात करता येईल ती व्यूहरचना करावी. नियोजन हे जनसामान्यांना दारिद्र्याच्या खाईतून वर काढण्यासाठी व उन्नतीची साधने उपलब्ध करुन देण्यासाठी केलेली व्यूहरचना होय. नियोजनाच्या तीन दशकानंतरही आज एकीकडे दैनंदिन जीवनपयोगी उपभोग्य वस्तूंची मोठ्या प्रमाणावर टंचाई आहे तर दुसरीकडे कुलर्स, टी. व्ही, एअर कंडीशनर्स रेफ्रिजिरेटर्स आणि तत्सम वस्तूंनी बाजारपेठा भरल्या आहेत. उत्पादनाच्या क्षेत्रातील हा समतोल शक्य तितक्या लवकर दूर करायला हवा.

आत्मविश्वास व आत्मनिर्भयता वाढीस लावण्यासाठी औद्योगिकीकरणास विकासाच्या प्रयत्नात केंद्रस्थानी मानण्यात येते. त्यामुळे आयात पर्यायीकरण हा औद्योगिकीकरणाचा सर्वात उत्तम मार्ग म्हणून ओळखला जातो असे असले तरी आजच्या परिस्थितीत निर्यात पर्यायीकरणाचा पाठपुरावा करावा असे सुचविले जाते. निर्यात पर्यायीकरण म्हणजे पारंपारिक प्राथमिक स्वरुपाच्या वस्तुनिर्याती ऐवजी प्राथमिक स्वरुपाचा पक्का माल, अर्धवट उत्पादित वस्तु व पक्का माल यांचे उत्पादन वाढवून त्याची निर्यात करणे. निर्यातीवर आधारित किंवा निर्यातमूलक औद्योगिक विकासाची व्यूहरचना ही उत्पादनाच्या आर्थिक बचती वाढविणारी आणि बाजार बाजारपेठांच्या कक्षा रुंदविणारी अशी असते. अशा प्रकारच्या औद्योगिकीकरणाचा सर्वांत मोठा फायदा हा आहे की त्यामुळे देशातील लोकांच्या

गरजा मोठया प्रमाणावर, भागविल्या जातात. त्याच प्रमाणे रोजगार संधी उपलब्ध होतात. आणि इतर राष्ट्रांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित होतात.

सरकारने आखलेली धोरणे व योजलेले उपाय यांनी भारतीय अर्थव्यवस्थेची वृद्धी आणि औद्योगिकिकरण यात फार महत्वाची भूमिका बजावली आहे. या बाबतचे धोरण हे व्यापक पायावर आधारित औद्योगिक विकास घडवून आणणारे हवे. असे धोरण निश्चित उद्दिष्ट साध्य करण्णासाठी योग्य असे आर्थिक व सामाजिक वातावरण निर्माण करणारे असले पाहिजे. जोपर्यन्त संरचनात्मक व संस्थात्मक असा योग्य सांगाडा निर्माण केला जात नाही. तोपर्यंत औद्योगिक विकास हा एकांगी असाच होणार. यात सर्व व्यापकता व सर्वांगीणत्व येणारच नाही.

उपलब्ध नैसर्गिक साधनांचा व मानवी साधनांचा पुरेपूर उपयोग करुन घेण्यासाठी देशाने जागतिक अर्थव्यवस्थेत अधिकाधिक उदार धोरण स्वीकारावे व शेजारी देशांसह आर्थिक विकासाचा अधिक सुयोग्य नियोजनबद्ध कार्यक्रम आखावा.

उद्योगांच्या उत्पादनांना व्यापक व मोठी बाजारपेठ निर्माण केली पाहिजे. त्यासाठी कृषि-औद्योगिक उत्पादने करणाऱ्या उद्योगांची ग्रामीण व निमशहरी भागात मोठया प्रमाणावर उभारणी केली पाहिजे. त्यासाठी अशा उद्योगांच्या उभारणीकरिता आवश्यक अशी संरचना उपलब्ध करुन दिली पाहिजे. अशा प्रकारच्या उद्योगांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील लोकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल शहरी केंद्राकडे त्यांचे होणारे स्थलांतर थांबेल, ग्रामीण व अर्ध-शहरी भागातील लोकांचे उत्पन्न वाढेल. मोठया प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या उपभोग्य वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळू शकेल. बाजार पेठांच्या कक्षा रुंदावतील.

गुंतवणूकीच्या विविध क्षेत्रात व उपक्षेत्रात गुंतवणूक योग्य निवडीची जर सुसंवादी पद्धतीने गुंतवणूक केली तर रोजगार संधी व्यापक प्रमाणात उपलब्ध होतील. औद्योगिकीकरणाने शेती, बांधकाम घर बांधणी, विविध सेवा, इत्यादींच्या विकासासाठी चालना मिळाली पाहिजे. त्यामुळे आणखी रोजगार संधी वाढू शकतील अर्थात हे सारे केले जात असतांना उत्पादनातील विविधता व उत्पादनांचा उत्कृष्ट दर्जा टिकविलाच पाहिजे. त्यामुळे अशा उत्पादनांना देशांतर्गत मागणी तर येईलच पण परकीय बाजारातील त्यांची स्पर्धा क्षमता वाढेल. त्याच वेळी अवाजवी प्रमाणावरील वस्तुभेद टाळावा. कारण असा अतिरिक्त वस्तुभेदच साधन सामुग्रीचा अपव्यय व मक्तेदारी यांना प्रामुख्याने जबाबदार असतो.

औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांनी आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे संरक्षण धोरण (Protectionist Policy) शिथील करावे यासाठी जगातील इतर देशांनी दबाव आणला पाहिजे. विकसनशील देशांतून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर प्रगत देशांचे सहकार्य घेऊन काम करायला खूपच वाव आहे. या सर्वाबरोबरच औद्योगिकीकरणासाठी कामगारांच्या कुशलता वाढीकरिता अधिक उत्तम प्रशिक्षण देणें, सर्वप्रकारचे शिक्षणाचा प्रसार, व्यवस्थापकीय कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण, संशोधन सहाय्य या बाबी अत्यंत अत्यावश्यक आहेत.

सर्वात शेवटी हेच खरे की, औद्योगिकीकरण हे लोकांच्यासाठीच व लोकांच्या सहभागातून व्हावयास आहे

# भारतीय संघराज्यपद्धती आणि सरकारिया आयोगाचा अहवाल

अनुवाद-प्रा. शंकरराव फुलारे

भारताची राज्यघटना अस्तित्वात आल्यापासून आणि विशेषत: १९६७ मधील सार्वत्रिक निवडणुकीनंतर घटक राज्यांना अधिक स्वायत्तता हवी ही मागणी जोरदारपणे करण्यात येऊ लागली.

संघराज्यात्मक शासन पद्धतीत प्रत्यक्ष व्यवहारात भारतीय संघराज्यात केंद्रीकरण प्रवृत्ती विशेष प्रकर्षाने जाणवू लागल्या आहेत. भारतीय संघराज्यातील या केंद्रगामी प्रवृत्तीला अनेक घटक जबाबदार आहेत. पहिला घटक म्हणजे ब्रिटीश राज्यघटनेची परंपरा आपल्या राज्यघटनेत आढळते. ब्रिटीशकाळात गव्हर्नर जनरल हा भारताचा सर्वोच्च अधिकारी होता. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात केंद्रस्थानी एकाच पक्षाचे सरकार दीर्घकाळ सत्तेवर होते तर घटक राज्यांपैकी बहुसंख्य घटक राज्यात केंद्रात ज्या पक्षाचे सरकार होते त्याच पक्षाची सरकारे अस्तित्वात होती. त्यामुळे केंद्रसत्तेचे महत्त्व वाढत गेले आणि संघराज्याचे स्वरुप केंद्रानुवर्ती असेच बनले.

दुसरा घटक म्हणजे एकपक्ष अधिकारारुढ असल्याने केंद्र व घटक राज्ये यातील राजकीय व वैधानिक तंटे सुप्रीम कोर्टात नेण्याऐवजी पक्षांतर्गत पातळीवरच सोडविले जाऊ लागले व त्यातून केंद्रसत्ता अधिक प्रबळ बनली.

तिसरा मुद्दा असा की, ६ वी, १३ वी, ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात येऊन घटक राज्यांच्या तुलनेत संघराज्य सरकारला अधिक व्यापक अधिकार प्रदान करण्यात आले.

चौथा मुद्दा असा की, सुप्रीम कोर्टाने काही निर्णय असे दिले आहेत की, त्यामुळे केंद्रसरकारची सत्ता वाढण्यासच मदत झाली आहे. उदाहरणार्थ राज्य सरकारांनी उत्पादित केलेल्या वस्तूंवर अबकारी कर आकारण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे असा सुप्रीम कोर्टाचा निर्णय.

राज्य सरकारांना आरंभापासूनच आर्थिक दुर्बलता अनुभवास येत आहे. ही बाब घटनाकारांना अपेक्षितच होती. म्हणूनच त्यांनी वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारने घटक राज्य सरकारांना वेळोवेळी अनुदाने द्यावीत असे नमूद करुन ठेवले. याशिवाय स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या गतिमान नेतृत्वाखाली आर्थिक नियोजनाचा अंगिकार केल्यानंतर प्रत्यक्ष पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रमांच्या सुयोग्य अंमलबजावणीसाठी केंद्रसरकारला राज्य सरकारांना योजना आयोगामार्फत आर्थिक सहाय्य करावे लागू लागले. त्यामुळेही राज्यांचे केंद्रसत्तेवरील अवलंबन आणखी वाढले. प्रो. एम. वेंकटरंगय्या यांच्या मतानुसार आर्थिक नियोजनामुळे भारतीय संघराज्यातील घटकराज्य सरकारांची स्वायत्तता व स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले आहे. हे आर्थिक परावलंबन हा घटक राज्यांची सत्ता कमी होणाऱ्या व केंद्रसत्ता प्रबळ होणाऱ्या कारणांपैकी पाचवा घटक होय.

सहावा घटक म्हणजे घटक राज्याचा राज्यपाल. गेल्या सदतीस वर्षात विविध घटक राज्यांच्या राज्यपालांच्या कृतीतून असेच सिद्ध झाले आहे की, राज्यपाल हा केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणूनच

काम करतो. तो राज्यशासनाच्या यंत्रणेचा अपक्ष असा प्रमुख आहे अशी प्रतिमा निर्माण झालेली नाही.

सारांश, कारणे कोणतीही असोत त्यांचा परिणाम म्हणून भारतीय संघराज्यात केंद्रानुगामी प्रवृत्ती अधिक बलवान झाली आणि घटनाकारांच्या लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाला पूर्णपणे विरोधी वातावरण तयार झाले आहे.

वरील सर्व परिस्थिती पाहता सरकारिया आयोगाकडून अशी अपेक्षा करण्यात येत होती की, सदर आयोग संघराज्य व घटक राज्य सरकारे यांच्यात सत्ता समतोल व्हावा यासाठी काही खास शिफारशी करील. सुदैवाने आयोगाने राज्यांना स्वायत्तता मागणारांच्या अपेक्षा संपूर्णत: पूर्ण केल्या नसल्या तरी त्याने भारतीय संघराज्याच्या रचनेला बाधा येणार नाही व घटक राज्यांना योग्य न्याय मिळेल अशा शिफारशी केल्या आहेत. मात्र सध्याची संघराज्यातून फुटून निघण्याची प्रवृत्ती आणि केंद्राबरोबर सतत संघर्षाची भूमिका घेण्याची लोकांची प्रवृत्ती लक्षात घेता सरकारिया आयोगाने केंद्र सरकारची सत्ता कमी करणाऱ्या अथवा सयुक्त सूचितील विषयात बदल करणाऱ्या मूलगामी शिफारशी केलेल्या नाहीत.

केंद्र व राज्य सरकार यातील सत्ता समतोलाबाबत घटनेतील तरतुदींना काही दुरुस्त्या सुचविताना आयोगाने राज्यांच्या बाबतीत केंद्र सरकारच्या अधिकारातिक्रमणावर कडक टीका केली आहे. शिफारशी करताना आयोगाने, "संघराज्य शासनपद्धती ही केवळ घटनात्मक संकल्पना नसून ती प्रत्यक्षात परस्पर सहकार्याच्या तत्वावर कार्यवाहीत आणावयाची बाब आहे." या आपल्या मतावर ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

● आयोगाने फुटीरतावादी 'प्रवृत्ती निर्माण होण्याच्या कारणांची यादी देताना (अ) स्वतंत्र अस्तित्वाचा शोध (ब) सुरक्षिततेची गरज आणि शिक्षण, रोजगार आणि औद्योगिक संधी यात योग्य व न्याय्य हिस्सा मिळावा ही मागणी या कारणांचा समावेश केला आहे. गेल्या सदतीस वर्षात भारताच्या शासनपद्धतीत दोन परस्पर विरोधी प्रवृत्ती आढळून येतात याची आयोगाने नोंद केली आहे. एका बाजूला केंद्रानुवर्ती आर्थिक प्रवाह केंद्रीकरण, आधुनिकीकरण, वृद्धी व विकास यांची बाजू मजबूत करीत आहेत. दुसऱ्या बाजूला जुनी राजकीय व्यवस्था मोडीत काढणे, राष्ट्रीय पक्षातील दुफळी, लोकप्रिय घोषणा देऊन त्याचा लाभ उठविण्याची वृत्ती, जातीयवादी घोषणांचा लाभ उठविण्याची वृत्ती, भाषा, पैसा आणि सामर्थ्य यांचा निवडणुकातील वापर, जीवनाच्या बहुसंख्य क्षेत्रातील भ्रष्टाचार, भाषेविषयीचा अतिरिक्त अभिनिवेश या सर्व बाबी केंद्रापसारी (संघराज्यातून फुटून निघण्याच्या प्रवृत्तीला खतपाणी घालीत आहेत.

सध्याच्या या अशा परिस्थितीत आयोगाने केंद्रसत्ता प्रबळ असावी अशी शिफारस केली आहे. मात्र त्याचवेळी घटना परिषदेने केंद्र सरकार व घटक राज्य सरकारे यांच्यात अधिकार व जबाबदारी यांचे योग्य विभाजन करुन खऱ्या अर्थाने संघराज्य शासनपद्धती अस्तित्वात आणण्याबाबतची जी इच्छा व्यक्त केली आहे त्याकडे आयोग आपले लक्ष वेधून घेत आहे. आयोग म्हणतो की, आपल्या राज्यघटनेत सत्तेच्या विभाजनाची जी योजना दिली आहे ती प्रबळ केंद्रसत्ता व घटक राज्यांना स्वायत्तता यांच्यात मेळ घालणे कसे अत्यावश्यक आहे ते स्पष्ट करणारी आहे. त्या योजनेनुसार सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. मात्र ताठर अशी एकमेकांचे संबंध तोडणारी व्यवस्था केलेली नाही. व्यवहारात ती परस्परावलंबी स्वरूपाचीच व्यवस्था आहे. तिच्या लवचिकतेमुळे सरकार सरकारामधील सहकार्य व सौजन्य यामुळे लोकांच्या कल्याणाचे अंतिम उद्दिष्ट साध्य करता येऊ शकेल. भारतातील केंद्र–राज्य संबंधाचा अभ्यास करतांना वरील गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यात येऊ नये असेच आयोगाने सुचविले आहे.

आयोगाने एकूण २५० शिफारशी केल्या आहेत. त्यातील राज्यपालाची नेमणूक व भूमिका यांच्याशी संबंधित शिफारशी फारच महत्वपूर्ण आहेत. कारण आरंभापासून राज्यपालांच्या अधिकाराबाबत राजकीय संघर्ष चालू आहेत. राज्यपालपदी अगदी योग्य व नि:पक्षपाती व्यक्तींची निवड केल्यास राज्यपालावर होणारी टीका खचित टाळता येऊ शकेल असे मत आयोगाने मांडले आहे.

राज्यपालपदी निवडली जाणारी व्यक्ती (अ) जीवनातील उत्तम यश संपादन केलेली असावी, (ब) ज्या राज्यात राज्यपाल नेमावयाचा त्या राज्यातील ती व्यक्ती नसावी, (क) नजिकच्या भूतकाळात अशा व्यक्तीने राजकारणात फार मोठ्या प्रमाणात भाग घेतलेला असू नये. आयोग असेही म्हणतो की राज्यपालाची निवड करण्यापूर्वी पंतप्रधानांनी उपराष्ट्रपती लोकसभेचे सभापती, राज्यांचे मुख्यमंत्री यांच्याशी गुप्त अशी सल्लामसलत करावी.

निवृत्त होणाऱ्या राज्यपालाला प्रथा म्हणून कोणत्याही आर्थिक लाभाच्या पदावर नेमण्यात येऊ नये. मात्र त्यांचा राष्ट्रपती अथवा उपराष्ट्रपती पदासाठी जरुर विचार करावा. राज्यपालाची नेमणूक एका राज्यात किमान ५ वर्षासाठी करावी आणि त्यांना बदलण्याबाबत अथवा निवृत्त करण्याबाबत तशीच गंभीर परिस्थिती निर्माण झाली तरच विचार करावा म्हणजे राज्यपालांचे स्वातंत्र्य अबाधित राहील.

राज्यपालांना काढून टाकण्यापूर्वी त्यांना त्यांची बाजू मांडण्याची व त्यांचा दृष्टीकोन मांडण्याची पूर्ण संधी दिली जावी. राज्यपालांना उपराष्ट्राध्यक्ष लोकसभेचे सभापती आणि सर न्यायाधिश यांच्या समितीपुढे आपली बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे.

जर एखाद्या राज्यपालाची बदली केली असेल, एखाद्या राज्यपालाने राजीनामा दिला असेल अथवा मुदत संपण्यापूर्वी एखाद्या राज्यपालास काढून टाकले असेल तर संसदेला सरकारने त्याबाबतची कारणे आणि राज्यपालाचे म्हणणे सादर करावे.

राज्यपालांचे स्वातंत्र्य अबाधित रहावे यासाठी त्यांना सेवा निवृत्तीनंतरच्या लाभाबाबत खास तरतूद करण्यात यावी अशीही आयोगाने शिफारस केली आहे.

आयोगाच्या अहवालात राज्यपालांच्या राज्याच्या विधान मंडळाने संमत केलेल्या विधेयकास संमति मिळविण्याच्या अधिकाराबाबत तपशीलवार शिफारशी केल्या आहेत. राष्ट्राध्यक्षांनी अशा विधेयकावर जास्तीत जास्त चार महिन्यात निर्णय दिला पाहिजे अशी आयोगाची शिफारस आहे. त्याचप्रमाणे राष्ट्राध्यक्षांनी राज्याच्या विधेयकास संमती नाकारली असेल तर त्याबाबतचे कारण राज्य सरकारला कळविले पाहिजे. आयोग पुढे असे म्हणतो की, राज्यांच्या सूचितील विषयाबाबत राज्य सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा केंद्र सरकारने आदर केला पाहिजे. राष्ट्राध्यक्षांचे साधन वापरुन केंद्रसत्तेने आपली मते राज्य सरकारवर लादू नयेत. संयुक्त सूचिमधील विषयाबाबत घटक राज्यांनी मंजूर केलेल्या विधेयकास केवळ केंद्र सरकार भविष्यकाळात या बाबत एक सर्वसमावेशक कायदा करणार आहे या सबबीवर राष्ट्राध्यक्षांनी संमति देण्यास अडवू नये.

घटक राज्य सरकारच्या मंत्रीमंडळ स्थापनेबाबत राज्यपालांची भूमिका "सरकार स्थापन होत आहे एवढेच पाहण्याची असावी मात्र राज्यपाल ज्या धोरणांचा पुरस्कार करतात तीच धोरणे राबविणारे सरकार असावे अशी भूमिका, राज्यपालांनी स्वीकारु नये अशी आयोगाची शिफारस आहे.

जेव्हा विधानसभेत आपल्याच पाठीशी बहुमत आहे असा परस्पर विरोधी दावा केला जातो तेव्हा राज्यपालांनी संबंधितांना विधानसभेतच आपापले बहुमत सिद्ध करण्याची संधि द्यावी. कोणत्याही परिस्थितीत राजभवनावर गुप्त बैठकीत बहुमताचा दावा सिद्ध करण्यासाठी संधि देऊ नये ही आयोगाची शिफारस अत्यंत स्वागतार्ह आहे.

केन्द्र सरकारच्या आणीबाणीविषयक अधिकार व त्यांचा वापर याबाबत आयोगाला असे वाटते की, घटनेत आणीबाणी लादण्याची तरतूद ही जेव्हा राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण होतो तेव्हाच वापरावयाची असते. मनात येईल तेव्हा राज्य सरकारच्या अधिकारावर आक्रमण करण्यासाठी आणीबाणीचा अधिकार वापरण्यात येऊ नये.

घटनेचे कलम ३५६ हे घटक राज्यात राष्ट्रपति राजवट लागू करण्याबाबत आहे. त्याबाबत आयोगाच्या अहवालात असे म्हटले आहे की, "घटनेचे ३५६ कलम अपवादात्मक अत्यंत अत्यावश्यक परिस्थितीत अतिशय काळजीपूर्वक अगदी अंतिम उपाय म्हणूनच वापरात आणले जावे. अर्थात राज्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी सर्वप्रयत्न करुन व घटनात्मक मार्ग वापरुन यश नसेल तरच या ३५६ च्या कलमाचा वापर करावा. घटनेचे कलम ३५६ जेव्हा राज्यातील पेचप्रसंग मिटविण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केल्यानंतरच वापरात आणले जावे". आयोगाचे असे मत आहे की, एखाद्या राज्यात राष्ट्रपति राजवट लागू करण्याबाबत राज्यपालांच्या अहवालात राज्यातील सर्व परिस्थितीचे स्पष्ट चित्र दाखविण्यात आलेले असले पाहिजे आणि सदरच्या अहवालास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. राज्यघटनेच्या ३५६ व्या कलमात आयोगाने अशी दुरुस्ती सुचविली आहे की, ज्यामुळे एखाद्या राज्यात राष्ट्राध्यक्ष राजवट लागू करण्याच्या घोषणेचा एक भाग म्हणून त्याच्या समर्थनार्थ दिलेल्या कारणांचा त्या जाहिरनाम्यात स्पष्ट उल्लेख व समावेश असावा. याशिवाय जोपर्यंत राष्ट्राध्यक्ष राजवटीच्या जाहिरनाम्यास संसद मान्यता देत नाही तोपर्यंत संबंधित राज्यातील विधानसभा बरखास्त करण्यात येऊ नये अशी आयोगाची शिफारस आहे.

एखाद्या घटक राज्यात संघराज्य सरकारचे सशस्त्र दल पाठविण्याबाबत आयोगाची शिफारस पुढीलप्रमाणे आहे. "घटक राज्यात सशस्त्र दल अथवा अन्य दल पाठविण्यापूर्वी संघराज्य सरकारने शक्य असेल तर घटकराज्य सरकारशी चर्चा व विचार-विनिमय करावा, तसेच एखादा प्रदेश 'अशांत प्रदेश' म्हणून घोषित करण्यापूर्वीही अशी चर्चा करणे आवश्यक आहे. त्यासाठी घटकराज्याचे सहकार्य मिळवावे. आयोगाने असेही मत व्यक्त केले आहे की, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दैनंदिन प्रशासनात लष्करीबळाचा वापर शक्यतो टाळावा आणि असा वापर करावा लागला तर तो अत्यल्प काळासाठी व अतिशय मर्यादित प्रमाणात करावा.

राष्ट्रीय प्रश्नावर समान व एकात्म धोरणाची आखणी व अंमलबजावणी या बाबत आयोगाने वैधानिक क्षेत्रात संसदेचे वर्चस्व मान्य केले आहे. त्यामुळेच आयोगाने कायदे करण्याचा अधिकार असलेल्या विषयांच्या यादीत कोणताही बदल केलेला नाही मात्र या क्षेत्राशी संबंधित अशा दोन महत्वपूर्ण शिफारशी आयोगाने केल्या आहेत. आयोगाने सरकारच्या यादीतील क्रमांक ९७ (अवशिष्ट अधिकार) करारोपण अधिकार व्यतिरिक्तच्या इतर सर्व अधिकारांचा समावेश सामायिक सूचित करण्यात यावा अशी पहिली शिफारस केली आहे.

दुसरी शिफारस आहे ती केंद्र सरकारने सामायिक सूचितील विषयाबाबत कायदा करतांना प्रथमतः घटक राज्य सरकारांशी विचार विनिमय करण्याची प्रथा कटाक्षाने पाळावी.

सत्तेच्या प्रागतिक विकेंद्रीकरणाच्या हेतूने केंद्रसरकारने घटनेच्या २५८ कलमातील अधिकारांचा वास्तव दृष्टीकोनातून वापर करावा. या कलमाने राष्ट्राध्यक्षांना घटक राज्यांशी विचार विनिमय करुन केंद्र सरकारचे अंमलबजाबणीचे अधिकार काही प्रमाणात घटक राज्यांच्या अधिकाऱ्याकडे सोपविता येतात.

आयोगाने आंतर-राज्य-मंडळ (Inter state Council) या ऐवजी आंतर-सरकार-मंडळ (Inter-Governmental-Council) स्थापन करण्याची अत्यंत महत्वाची शिफारस केली आहे. त्यांची घटनेच्या कलम २६३ अन्वये तरतूद केलेली आहे. या नव्या मंडळाचा पंतप्रधान हा पद-

सिद्ध अध्यक्ष असेल सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री आणि संघराज्य व घटक राज्य सरकार यांच्यातील समान हितसंबंधाच्या विषयांचे मंत्री यांचा या मंडळाच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असावेत. या मंडळाची वर्षातून दोनदा सभा घेण्यात यावी. या मंडळाला ज्या विषयात सर्व घटक राज्यांना अथवा काही घटक राज्यांना स्वारस्य आहे ज्या प्रश्नात एका अथवा अधिक घटक राज्यांचे समान हितसंबंध गुंतलेले आहेत, त्या–बाबतीत शोध घेणे, चौकशी करणे, चर्चा करणे, योग्य त्या शिफारशी करण्याचे अधिकार असावेत. यातून सुयोग्य असा सुसंवाद निर्माण होऊ शकेल.

अर्थात या आयोगाने सामाजिक व आर्थिक नियोजन विषयक प्रश्नाबाबत या मंडळाने काही विचार करुन शिफारशी करु नयेत. कारण त्यासाठी 'राष्ट्रीय आर्थिक आणि विकास मंडळ' (National Economic and Development Council) स्थापन करण्याची शिफारस आयोगाने केली आहे.

मूळच्या आंतरराज्य मंडळाला दोन अथवा अधिक राज्यातील तंटयाबाबत चौकशी करण्याचे व सल्ला देण्याचे अधिकार देण्यात आले होते. नव्या आंतर सरकारीय–मंडळाला दोन राज्यातील तंटयाबाबत चोकशीचे अधिकार असणार नाहीत. त्यामुळे त्याचे कार्यक्षेत्र हे राजकीय व प्रशासकीय प्रश्नांच्या चर्चेपुरतेच मर्यादित असेल. दुर्दैवाने आयोगाने या मंडळाचे कार्यक्षेत्र एवढे मर्यादित ठेवण्याचे कारण स्पष्ट केलले नाही. वास्तविक असे अनेक प्रश्न राज्याराज्यात निर्माण होत असतांना त्याबाबतची चर्चा करण्याचा अधिकार या मंडळाला असणे गरजेचे होते.

आयोगाने विभागीय मंडळा (Zonal Council) ची पुनर्रचना करण्यात यावी असे सुचविले आहे त्याचप्रमाणे घटनेच्या कलम २६३ नुसार निर्माण करण्यात आलेल्या ईशान्य मंडळाची (North Eastern Council) पुनर्रचना करण्यात यावी असे सुचविले आहे. अशा विभागीय मंडळाचा अध्यक्ष हा त्या विभागातील राज्यांपैकीच एका राज्याचा मुख्यमंत्री असावा आणि हे पद आळीपाळीने प्रत्येक राज्याला दिले जावे. या विभागीय मंडळांनी आपल्या कक्षेतील राज्याराज्यातील प्रश्न व विभागातील सर्वांच्या हिताचे प्रश्न यांची प्राथमिक स्तरावर चर्चा करावी. तपशीलवार चर्चा अर्थातच आंतर–सरकारीय मंडळातच व्हावी.

केन्द्र राज्य संबंधात वित्त हा घटक नेहमीच अतिमहत्वाचा मानला गेला आहे. या बाबतही आयोगाने काही लक्षणीय सूचना केल्या आहेत.

१. वित्तीय आयोगाची कार्यकक्षा ठरविताना केन्द्र सरकारने घटक राज्यांशी प्रथमतः विचार विनिमय करावा.

२. नियोजन मंडळाचे महत्व व कार्यक्रम याबाबत वाढ व्हावी अशा अनेक शिफारशी आयोगाने केल्या आहेत.

योजनेची आखणी करतांना नियोजन मंडळाला घटक राज्यांशी परिणामकारक सल्लामत करण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे. नियोजन मंडळाची प्रतिमा अधिक चांगली व्हावी यासाठी नियोजन मंडळाचा उपाध्यक्ष हा नामवंत तज्ज्ञ असावा की ज्याला केन्द्र व घटकराज्ये मान देतील, असे आयोगाने सुचविले आहे.

केन्द्र सरकारने प्रायोजित केलेल्या पंचवार्षिक योजनेतील प्रकल्पांची संख्या किमान पातळीत ठेवावी आणि घटक राज्यांना त्या प्रकल्पांचा तपशील व इतर बाबी ठरविणेबाबत अधिक वाव दिला पाहिजे. संघराज्यातील अधिक चांगल्या सहकार्यासाठी आयोगाने सुचविले आहे की, जिल्हा नियोजन मंडळाशी सल्लामसलत करणे सक्तीचे केले जावे.

नियोजनबद्ध आर्थिक विकासाला जोरदार चालना देण्यासाठी सध्याच्या राष्ट्रीत विकास मंडळाचे नाव राष्ट्रीय आर्थिक आणि विकास मंडळ असे करावे

आणि त्याला आंतरराज्य सरकारांना योग्य मार्गदर्शन करण्याचा अधिकार देण्यात यावा. या मंडळाला घटनेच्या कलम २६१ अन्वये वैधानिक स्वरुप व मान्यता देण्यात यावी आणि त्याला योजनेची आखणी व साधनसामग्रीची जुळवाजुळव याबाबत मते अजमावण्याचा व चर्चा करण्याची कायदेशीर तरतूद करावी असे आयोगाने सुचविले आहे.

१. कार्पोरेशन कराचे विभाजन करण्याबाबत संसदेला योग्य ते अधिकार प्रदान करण्यासाठी घटनेतच दुरुस्ती करण्याची आयोगाने सूचना केली आहे. आर्थिक क्षेत्रात सुधारणा करणेसाठी नभोवाणी व दूरचित्रवाणीवरील जाहिरातीवर कर आकारण्याची व त्याचे घटकराज्यात वाटप करण्याची घटनेतील कलम २६९ मधील तरतूद दुरुस्त करण्यात यावी, असे आयोगाने सुचविले आहे.

आयोगाने व्यवसाय व व्यापार यावरील करांच्या दरात वाढ करणे, प्राप्तीकरावर अधिकर लागू करणे आणि विशिष्ठ कार्यासाठी व विशिष्ठ कालासाठी खास कर आकारणे या बाबी सुचविल्या आहेत.

अतिरिक्त केंद्रीकरणाच्या दुःखद परिणामांकडे लक्ष वेधून आयोगाने सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा जोरदार पाठपुरावा केला आहे. "केवळ लोकांचा परिणामकारक सल्ला न घेता त्यांच्या हातीच सत्ता सोपविणे आवश्यक आहे" या स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरुंच्या कल्पनेस अनुलक्षून 'पंचायत राज' या कल्पनेचे मूल्यमापन केले पाहिजे व त्यात योग्य त्या सुधारणा केल्या पाहिजेत.

आयोगाने जिल्हा परिषदा व नगर परिषदांच्या निवडणुका वेळेवर घेण्यात याव्यात आणि त्यांना दीर्घकाळ डावलले जाऊ नये असे मत व्यक्त केले केले आहे.

सारांश, आयोगाने अत्यंत मूलगामी व महत्व पूर्ण शिफारशींनी परिपूर्ण असा अहवाल सादर केला. त्याच्या महत्वाच्या शिफारशी जर केंद्र सरकारने स्वीकारुन अंमलात आणल्या तर भारतात खऱ्या अर्थाने सहकारी संघराज्यवाद (Cooperative federalism) अस्तित्वात येईल.

## चाणक्याचे अर्थशास्त्र भाग १

### विद्येचा उद्देश

तर्कशास्त्र, वेदविद्या, कृषिकर्मादि अर्थशास्त्र आणि सामदाम दंडादि राजनीति अशा चार विद्या आहेत. वेदविद्या, वार्ता आणि दंडनीति या तीनच विद्या आहेत असे मनुचे मत आहे. कारण आन्वीक्षिकी विद्येचा त्रयींमध्येच अंतर्भाव होतो. वार्ता आणि दंडनीति या दोनच खऱ्या विद्या असे बार्हस्पत्य म्हणतात. वेदविद्या हे लोकव्यवहारचतुर माणसाचे आवरण आहे असे ते समजतात. दंडनीति ही एकच विद्या शुक्राचार्याचे अनुयायी मानतात, कारण दंडनीतीत इतर सर्व विद्यांचा बीजरुपाने समावेश होतो. विद्या चार आहेत असेच कौटिल्याचे मत आहे. जिच्या योगाने धर्म, अधर्म अर्थ अनर्थ कळतो तीच विद्या असे विद्येचे लक्षण आहे. सांख्य, योग आणि तर्कवाद मिळून आन्वीक्षिकी विद्या होते. वेदविद्येत धर्म आणि अधर्म व वार्ताशास्त्रात अर्थ व अनर्थ यांचा समावेश होतो. दंडनीतीमध्ये नय व अनय यांचा विचार येतो. त्रयी, वार्ता व दंडनीति यांचे बलाबलाची परीक्षा करणारी जी विद्या ती आन्वीक्षिकी, तिच्या योगाने अभ्युतकाळी व संकटकाळी बुद्धी स्थिर राहते; विचार, उच्चार व आचार यात चतुरता येते व अशा तऱ्हेनें आन्वीक्षिकी ही सर्व विद्यांचा प्रदीप, सर्व कर्मांचा उपाय व सर्व धर्मांचा आश्रय आहे, असे आर्य चाणक्याचे मत आहे.

–सौ. श्यामा परचुरे

॥ श्री ॥

मा कुलगुरु,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

पुणे
७ एप्रिल १९८८

# विषय : विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या नेमणुका संबंधीची जाहिरात आणि तत्संबंधात विद्यापीठाची अधिकारशाही कार्यपद्धती

स. न. वि. वि.

विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या नेमणुकी-संबंधी दैनिक सकाळमधील जाहिरात आणि त्या संबंधीची अधिकारशाहीची कार्यपद्धती यावद्दल विद्यापीठाच्या एम्. फिल व एम. ए. च्या सर्व विद्यार्थ्यांच्या सह्यांच्या निवेदनाची प्रत मंडळाचा अध्यक्ष या नात्याने माझेकडे आली आहे. सदरहू निवेदन त्यांनी आपणास, उपकुलगुरु आणि कुलसचिव यांना सादर केले असून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून त्या संबंधातील कारवाईवद्दल पूर्वग्रहरहित व न्यायबुद्धीने फेरविचार व्हावा अशी आशा व्यक्त केली आहे.

पुणे विद्यापीठातील नव्याने सुरु झालेल्या अर्थशास्त्र विभागाची कूळकथा आपणांस माहित आहेच. ह्या विभागाची प्रतिस्थापना करण्यात "अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचा" प्रधान वाटा आहे. अभ्यास मंडळाने सप्टेंबर १९८५ मध्ये विविध ग्रामीण व शहरी पदव्युत्तर तसेच पदवी अर्थशास्त्र अध्यापन केंद्रे, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांची गुणवत्ता वाढण्यासाठी विस्तारसेवा तसेच पर्याप्त अभ्यासक्रम यावर भर द्यावा या दृष्टीने नव्या विभागाची मागणी करण्याचा ठराव केला होता. तो ठराव विद्याशाखा ( Faculty ) विद्वतसभा ( Academic council ) विधीसभा ( Senate ) आणि कार्यकारी मंडळ ( Executive Council ) या सर्व प्रातिनिधीक, स्थायी व घटनात्मक स्वरुपाच्या अधिकार मंडळांनी एकमताने मान्य केल्यामुळे मा. कुलगुरु यांना एक तज्ञ समिती नियुक्ती करावी लागली होती. सरते शेवटी मा. कुलगुरु यांनी अर्थशास्त्राच्या विद्यापीठातील विभिन्न महाविद्यालयात अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचा जाहीर कौल ( Mandate ) विद्या महामंडळाच्या सभागृहात प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेने संपन्न झालेल्या बैठकीत घेऊन नवा विभाग सुरु करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार कुलगुरुंच्या कार्यालयात जूनमध्ये पुन्हा एक बैठक घेऊन त्यात डॉ. वि. म. दांडेकर यांना नव्या विभागाचे सन्मानित प्रमुखपद ( Honarry Headship ) देण्यात आली. पुण्यातील विभिन्न संशोधनसंस्था व कॉलेज यातील ज्येष्ठ प्राध्यापकांची सन्मानित अभ्यागत प्राध्यापक म्हणून नियुक्ति करण्यात आली व डॉ. दांडेकर यांनी दैनंदिन प्रशासन व नेतृत्व करण्याकरता आपला प्रतिनिधी म्हणून अभ्यास मंडळाचे एक जेष्ठ सदस्य प्रा. कमलाकर परचुरे यांना काम करण्याची विनंती केली.

या व्यवस्थेनुसार विभागाचे कामकाज गेली दोन वर्षे सुरळीत चालू आहे. याच अवधीत एम. फिल सुटीचा व एम. फिल रेग्युलर हे दोन वर्ग प्राध्यपकांच्या या सुटीतील अभ्यासक्रम आणि इतर विद्यार्थ्यांकरिता रेग्युलर M. A. Part I & Part II हे वर्ग डॉ. दांडेकर, प्रा. परचुरे व मंडळाचा अध्यक्ष स्वतः मी, या तिघांना वेळोवेळी विश्वासात घेऊन ही कार्ये व्यवस्थित पार पडली. तसेच पदव्युत्तर

अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचे पुनर्शिक्षण वर्ग, चर्चासत्रे, कार्यशाळा याही वेळोवेळी घेतल्या गेल्या विभागाचा विकास व्हावा या करता ७ व्या योजनेतील ग्रंथालय, उपकरणे आणि अध्यापन साहित्य, प्राध्यापकांच्या नेमणूका यासाठीही प्रा. दांडेकर व प्रा. परचुरे यांनी प्रयत्न केले. हे सर्व करतांना मंडळाने अनेक औपचारिक ठराव करुन आपणास कळविले तथापि 'आपण 'नव्या' विभागाला कार्यालय कर्मचारी, सेवक आणि अध्यापन साहित्य सुविधा कधीच उपलब्ध केल्या नाहीत ही वस्तुस्थिती विभागासंबंधीच्या आपल्या दृष्टीकोणाची ग्वाही देते.

प्रा. दांडेकर व प्रा. परचुरे यांच्या प्रयत्नातून विभागाचा विकास झाला. विद्यार्थ्यांत सर्वत्र समाधान व गौरवाची भावना आहे. असे असता अनुदान संमत झाल्यावर त्या संबंधीची जाहिरात देतांना आपण विभागाचे सन्माननीय अध्यक्ष म्हणून डॉ. दांडेकर किंवा प्रभारी सहाय्यक प्रा. परचुरे यांना विश्वासात घेतले आहे काय ? कोणत्या प्रकारच्या विशेष व्यासंग (Specialisation & Expertise) गुणवत्ता व अनुभव या बारही पदांकरता आवश्य आहे. यासंबंध विभाग प्रमुखांच्या सल्याने जाहिरात देण्यासंबंधीचा शिष्टाचार, शैक्षणिक प्रथा आणि प्रशासकीय नियम यांचे उल्लंघन केले आहे की काय अशीही शंका येते. सदरहू जाहिरात देतांना आमच्या माहिती प्रमाणे हे संकेत पाळले गेले नसल्यामुळे आम्ही स्थापन केलेल्या अर्थशास्त्र विभागाचे प्रशासन केवळ अधिकारशाही आणि सत्तेच्या रेटयानेच चालणार असेल आणि यापूर्वी ज्या पद्धतीने विद्यार्थी, प्राध्यापक तज्ञ विद्यापिठातील इतर अधिकार मंडळे व प्रातिनिधीक मंडळे यांना विश्वासात घेऊन या विभागाचे कार्य चालत असे ते यापुढे चालणार नसेल, तर नव्या विभागाचे नेतृत्व व प्रशासन आम्हा सर्वांच्या सद्भावना मिळविण्यात कसे यशस्वी होईल, याबद्दल शंका वाटते.

दंडसत्तेच्या सहाय्याने विद्यार्थी, संशोधन विद्यार्थी प्राध्यापक व आमच्या सारखी विद्यापिठाची मंडळे व त्यांच्या अपेक्षा व मागण्या, दडपून टाकणे अवघड निश्चित नाही, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. परंतु ते कितपत उचित होईल याचा निर्मळ व न्यायी दृष्टीने आपण विचार करावा.

नव्या विभागाची घडी सुरळीत बसण्याकरिता आमची किमान एवढीच मागणी राहील की प्रा. दांडेकर व प्रा. परचुरे यांचा सल्ला व मार्गदर्शन तसेच नित्याच्या प्रशासनात अधिकाराने येणारा संबंध असावा, त्याच प्रमाणे लोकशाहीची कदर करण्यांच्या दृष्टीने विभागाचे प्रशासन करण्याकरता जी समिती असते त्यात (Departmental Committee) अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व मंडळाने सुचविलेले दोन तज्ञ यांचा समावेश असावा. अशा प्रकारचे प्रतिनिधीत्व देऊ केल्यास विद्यापीठ, प्राध्यापक व विद्यार्थी यामध्ये आवश्यक तो समन्वय साधला जाईल. आपण आम्ही या दिलेल्या निवेदनाचा योग्य तो विचार करावा तसेच मंडळाचा अध्यक्ष म्हणून या संबंधी आपले भेट घेऊन विचार विनीमय करण्याची मला संधी द्यावी ही विनंती. कळावे.

खा. ह. शितोळे
अध्यक्ष

# आवेदन

मा. अध्यक्ष साहेब,
अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे.

**विषय– अर्थशास्त्राचे कार्यकारी विभागप्रमुख प्रा. कमलाकर परचुरे हेच कायमस्वरुपी औपचारिक विभाग प्रमुख राहणेबाबत.**

**अर्जदार– अर्थशास्त्र विभागामध्ये शिक्षण घेणारे सर्व एम्. फील व एम्. ए. चे विद्यार्थी.**

महोदय,

आम्ही खालील सह्या करणारे सर्व एम. फील व एम. ए. चे विद्यार्थी या अर्जाद्वारे आपणास अशी विनंती करीत आहेत की, अर्थशास्त्र विभाग आपल्या पुणे विद्यापिठात नव्याने सुरु करण्यात आलेला असून या विभागात एम. ए. प्रथम व द्वितीय वर्षात सुमारे ६० विद्यार्थी शिक्षण घेतात. ह्याचप्रमाणे १९८७–८८ या वर्षी नव्याने एम. फील. सुरु करण्यात आलेले असून त्यात सुमारे ३० विद्यार्थी शिक्षण घेतात. अर्थशास्त्र विभागाची प्रथमतः नव्याने सुव्यवस्थित स्थापना करण्याकरिता सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. वि. म. दांडेकर व प्रा. कमलाकर परचुरे यांचे मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य सुरवातीपासून मिळाले आहे याची आपणाला जाणीव आहेच. डॉ. वि. म. दांडेकरांच्या नेतृत्वाखाली प्रा. कमलाकर परचुरे हे विशेष परिश्रम घेवून अर्थशास्त्र विभाग प्रमुखाचे दैनंदिन काम उत्तम रीतीने पार पाडीत आहेत. अर्थशास्त्र अभ्यास मंडळानेही या कामी त्यांच्यावर विश्वास टाकलेला आहे. विद्यापीठ नियमाला अनुसरुन ते नेहमीच विद्यार्थीहिताचा व अडचणीचा विचार करणारे प्राध्यापक आहेत. आम्हा सर्वांना योग्य प्रेरणा व मार्गदर्शन देण्यात ते तत्पर आहेत. तसेच शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा टिकवणाऱ्यापैकी ते एक आहेत असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते.

डॉ. वि. म. दांडेकरासारख्या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या अर्थतज्ञाने प्रा. परचुरे यांच्यावर मोठ्या विश्वासाने ही जबाबदारी सोपविली असून आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीप्रमाणे ते स्वतः व प्रा. कमलाकर परचुरे ही सेवा विनामूल्य करीत आहेत. त्यामध्ये विद्यापिठाला निश्चितच गौरव व अभिमान वाटावा असे आम्हाला वाटते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही उत्तमरितीने शिक्षण घेत असताना पुणे विद्यापिठाने नुकतीच अर्थशास्त्र विभागामध्ये विभागप्रमुख, रिडर व प्राध्यापकांच्या नेमणूका करण्यासंबंधी जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे. आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीप्रमाणे नवीन नेमणुका करण्यासंबंधीची जाहिरात देण्यापूर्वी त्यांचेशी विद्यापिठाने व विद्यापीठ प्रशासनाने कोणत्याही प्रकारचा सुसंवाद साधलेला नाही. तसेच सल्लामसलत केलेली नाही याचे आम्हाला नुसतेच आश्चर्य वाटत नसून त्याबद्दल फार मोठी खंत वाटते.

ज्या व्यक्तींनी अर्थशास्त्र विभाग स्थापनेसाठी प्रयत्न केले, परिश्रम केले, अर्थशास्त्र विभागाला स्थैर्य लाभवून दिले आणि पुण्यातील अनेक नामवंत व व्यासंगी प्राध्यापकांचे सहकार्य मिळवून आम्हा विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे अध्यापन तसेच संशोधनातील प्रशिक्षण उपलब्ध केले. त्या दोघांच्या व्यक्तीगत संबंधामुळे या विभागाला प्रतिष्ठा मिळालेली आहे. ही वस्तुस्थिती असतांना नेमक्या याच व्यक्तींना विद्यापीठ प्रशासनाने दूर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे अशी आमची खात्री होण्याकरिता याचा

आमच्याजवळ सबळ पुरावा आहे. म्हणून आम्ही सर्व विद्यार्थी अर्थशास्त्र विभाग प्रमुखाची जागा भरणेसाठी आमचे मत व्यत करीत आहोत.

डॉ. वि. म. दांडेकर यांची सन्माननीय सल्लागार म्हणून आणि त्यांनी नियुक्त केलेले प्रा. परचुरे यांची कार्यकारी विभाग प्रमुख म्हणून जोड पूर्ववत तशीच रहावी म्हणजे या नव्या विभागाचा विकास आणि स्थैर्य या गोष्टी साध्य होतील. नवीन अनुभवी मनुष्य बाहेरुन आणून या दोघांनी बसविलेली घडी विस्कटेल. तसेच आम्हा विद्यार्थ्यांचे त्यात प्रचंड नुकसान होईल असे दिसते. विभाग प्रमुख म्हणून नव्या विभागाची प्रगती करण्याकरिता डॉ. वि. म. दांडेकर व प्रा. परचुरे यांच्यासारख्या जेष्ठ परिपक्व, अनुभवी आणि राष्ट्रीय ख्याती मिळविलेल्या प्राध्यापकांना विद्यापिठानेच विनंती करुन गेली दोन वर्षे त्यांच्या सेवेचा लाभ मिळविला. मात्र यु. जी. सी. चे अनुदान आल्यावर त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी तसेच त्यांना नव्या विभागाच्या नेमणूकीसंबंधी विश्वासात घेण्याऐवजी पगारी काम करणाऱ्या उत्सुक असणाऱ्या प्राध्यापकांची नियुक्ती करण्याचा विद्यापीठाचा डाव दिसतो. हा निर्णय या दोन व्यक्तींच्या महान कामांचे अवमूल्यन व अवमान करणारा असून त्यांचेवर व्यक्तीश: अन्याय व उपमर्द करणारा आहे. या अन्यायाची दखल आम्ही कृतज्ञ विद्यार्थ्यांनी आमच्या शैक्षणिक हितासाठी घेतली नाही तर आम्हीच स्वत: आपमतलबी व करंटे ठरु. त्यांच्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आम्हाला आमच्या विभागाचे कामकाज योग्य रितीने चालावे या हमीसाठी विभागप्रमुख म्हणून कोण असावे या स्वयम् निर्णयाचा नैसर्गिक हक्क आहे. विभाग प्रमुख कोण असावा या विद्यार्थ्यांच्या मतांची देखील कदर केली जावी असे शैक्षणिक मूल्य सर्वमान्य झाले असल्यामुळे आम्ही त्याच कारणास्तव विभागाचे दैनंदिन प्रशासन व नेतृत्व करण्याकरिता प्रा. कमलाकर परचुरे यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीत कोणताही बदल करु नये अशी आम्ही मागणी करतो. रीडर व प्राध्यापकांच्या नेमणूका करण्यासंबंधी डॉ. वि. म. दांडेकर व प्रा. परचुरे यांचे मत विचारात घेतले जावे. तसेच विभाग प्रमुखपदी तूर्तास झालेली विद्यमान व्यवस्था चालू रहावी अन्यथा आम्ही अर्थशास्त्र विभागाच्या दैनंदिन कार्यप्रशासनावर बहिष्कार घालू याची आपण दखल घ्यावी.

विद्यार्थी हा केंद्र बिंदू नव्या राष्ट्रीय धोरणात मानला गेला असून स्वत: आपल्या जाहीर व्याख्यानात ह्या धोरणांचा पुरस्कार करीत आला आहात. यासंबंधी आपण विद्यार्थी विरोधी (अँन्टी स्टूडंट) भूमिका घेणार की विद्यार्थी हित व शैक्षणिक हितासाठी निर्मल व न्यायाची भूमिका घेणार? तसेच आपले वचन व आपली कृती यात एकवाक्यता आहे की नाही हे ठरविण्याची ही कसोटी आहे.

आपण यासंबंधी वस्तुनिष्ठ चौकशी करुन योग्य न्याय द्याल असा आम्हाला विश्वास वाटतो. म्हणून आपणास हे आवेदन मोठ्या आशेने सादर करीत आहोत.

**आपले अज्ञाधारक विद्यार्थी**

१) श्री. एस. के. बामदळे
२) श्री. व्ही. टी. सोनवणे
३) श्री. जी. बी. होले
४) श्री. के. आर. रोडे
५) श्री. हनुमंत बर्गे
६) श्री. ईश्वर आहेर
७) श्री. पी. बी. तावरे
८) श्री. शांताराम काळखांब
९) श्री. एम. के. चौधरी
१०) श्री. एस. व्ही. कांबळे
११) श्री. ए. बी. माने
१२) कु. जे. एच. खान
१३) कु. एस. आर. पांडे
१४) कु. आर. एस. कुलकर्णी
१५) कु. एन. एम. कोचरानी
१६) श्री. एस. व्ही. वैशंपायन
१७) श्री. पी. ए. मॅथ्यू
१८) श्री. यू. बी. वाघ
१९) श्री. आर. ए. रसाळ
२०) श्री. एम. आर. बिबवे
२१) श्री. के. आर. राऊत
२२) श्री. आर. सुकराम
२३) श्री. जी. ए. कुलकर्णी
२४) श्री. ए. आर. देशपांडे
२५) श्री. शिवकुमार

कार्यालय,
प्राचार्य निवास,
न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज,
अहमदनगर

प्राचार्य खा. हृ. शितोळे
अध्यक्ष, पुणे विद्यापीठ,
विभागीय अर्थशास्त्र प्राध्यापक
परिवार, अहमदनगर

दिनांक ५-४-१९८८

प्रति,
मा. कुलगुरु,
पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७

## विषय- पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवाराची अर्थशास्त्र विभागातील नव्या नेमणुकासंबधी मागणी

जळगाव येथे विद्यापिठातील विभिन्न महाविद्यालयात अर्थशास्त्राचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची तीन एप्रिल १९८८ रोजी नूतन मराठा महाविद्यालयात सकाळी सभा झाली. त्या सभेंत पुणे विद्यापिठात व विद्यापिठाला संलग्न असलेल्या महाविद्यालयात अर्थशास्त्राचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी व अर्थशास्त्राचे अध्ययन व अध्यापन अधिक सखोलतेने व्हावे यासाठी एक कायम स्वरुपी संघटना असावी आणि तिचे नाव 'पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार" असे असावे असे ठरले. या परिवाराची अस्थायी कार्यकारिणी सर्वानुमते ठरली आणि या परिवाराचे अध्यक्षपद एकमताने माझेकडे सोपविण्यात आले.


सदरहू परिवारांराचा अध्यक्ष म्हणून परिवाराने आपणास सादर करावयाचे निवेदन आपल्या विचारासाठी पाठवित आहे.

विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांच्या भावना, अपेक्षा आणि मागण्या आपण सहृदय व समंजस रीतीने जाणून घ्याल यात मला तरी शंका नाही.

यासंबंधात आपण मला व अस्थायी कार्यकारिणीचे सहकारी सदस्य यांना भेटीची वेळ व दिनांक देऊन खुल्या मनाने चर्चा करावी ही विनंती.

कळावे.

आपला,
के. एच्. शितोळे
अध्यक्ष
पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार,
अहमदनगर



# नम्र निवेदन

मा. डॉ. व्हो. जो. भिडे
कुलगुरु, पुणे विद्यापिठ पुणे.

आम्ही खाली सह्या करणारे पुणे विद्यापीठ विभागातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख व प्राध्यापक असे नम्र निवेदन करतो की.

पुणे विद्यापिठात नवीनच सुरु करण्यात आलेल्या अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुखांची व इतर प्राध्यापकांच्या जागा ७ व्या योजनेच्या अनुदानासाठी भरणार आहोत असे विद्यापिठाच्या जाहिरातीवरुन समजले. त्या संबंधी आम्ही असे नम्रतेने निवेदन करतो की, अर्थशास्त्र विभागास दोन वर्षापासून सहाय्यक प्रभारी प्राध्यापक म्हणून काम करणारे प्रा. कमलाकर परचुरे याला नव्या विभागाच्या विकास योग्य रितीने होण्याच्या दृष्टीने विभागाच्या प्रशासनाशी संबंध असावा असे आम्हास वाटते.

आमच्या या इच्छेस मान देऊन प्रा. कमलाकर परचुरे यांची अर्थशास्त्र विभाग प्रमुखपदी सन्मानपूर्वक नियुक्ती करावी असा आमचा आग्रह आहे.

तसेच विद्यापिठाचे गुणवत्ताविस्ताराचे कार्य लक्षात घेता त्यांच्या सारखा अनुभवी व ज्येष्ठ प्राध्यापकांची निवृत्तीची गरज आहे. या दृष्टीने आपण आमच्या मागणीचा योग्य तो विचार कराल अशी अशा आहे. ही विनंती.

आपले नम्र

१) प्रा. दि. रा. आठवले, चाळीसगांव कॉलेज, चाळीसगांव
२) „ खा. ह. शितोळे, न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर.
३) „ टी. ई. शेळके, आर. बी. एन. बी. कॉलेज, श्रीरामपूर
४) „ पी. पी. जगताप —„— —„—
५) „ व्हि. जे. गोडबोले, सी. टी. बोरा कॉलेज, शिरुर
६) „ के. पी. धोंगडे, पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर.
७) „ एम. डी. कुलकर्णी, प्रताप कॉलेज, अमळनेर
८) „ एस्. एम्. तोडकर, एस्. एस्. जी. एम्. कॉलेज, कोपरगांव
९) „ एस. डी. जोशी, एम्. जे. कॉलेज, जळगाव.
१०) „ आर्. आर्. पवार. न्यू आर्टस् अँण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर.
११) „ एस्. डी. दिघे, —„— —„—
१२) „ एस्. व्ही. दरेकर, —„— —„—
१३) „ आर्. जी. कोल्हे, —„— शेवगाव
१४) „ बी. एस्. बोबडे, —„— —„—
१५) „ एन्. टी. पाटील, तळोदा कॉलेज, तळोदा

१६) प्रा. के. के. वाघ, नवापुर कॉलेज, नवापुर.

१७) " एस्. एम्. चांडे, पी. व्ही. पी. कॉलेज, प्रवरानगर

१८) " बी. एम्. कांदळकर, दादा पाटील कॉलेज, कर्जत.

१९) " आर्. के. खाडे, टी. सी. कॉलेज, बारामती

२०) " बी. आर्. आदिक, आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

२१) " ए. पी. कानवडे, पी. व्ही. पी. कॉलेज, प्रवरानगर

२२) " सौ. मंगला जंगले, नहाटा कॉलेज, भूसावळ

२३) " सौ. सुमित्रा पवार, महिला महाविद्यालय, भुसावळ

२४) " सी. व्ही. पाटील, सिंदखेड कॉलेज, सिंदखेडा

२५) " बी. एम्. देशमुख, नूतन मराठा कॉलेज, जळगांव

२६) " एस्. डी. सुर्वे, —"— —"—

२७) " पी. बी. चव्हाण —"— —"—

२८) " ए. डी. खाचणे —"— —"—

२९) " एस्. एम्. पवार, एम्. एस्. जी. कॉलेज, मालेगाव.

३०) " बी. व्ही. सोनवणे " —"—

३१) " डी. एन्. पाटील, नूतन मराठा कॉलेज, जळगांव

३२) " एम्. आर्. गिते, —"— —"—

३३) " डॉ. दि. र. राणे, शिरपूर कॉलेज, शिरपुर

३४) " एस्. बी. पाटील, किसान कॉलेज, पाटोदा.

३५) " ए. एस्. पाटील, एरंडोल कॉलेज, एरंडोल

३६) " एम्. ए. बारगजे, अकोला कॉलेज, अकोला

३७) " जी. जी. वर्पे, के. जे. सोमय्या कॉलेज, कोपरगांव

३८) " चौधरी, शहादा कॉलेज, शहादा.

३९) " सी. जी. आगरकर, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर

दिनांक २६-४-१९८८

# निवेदन

मा. कुलगुरु,
पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ७

## विषय : अर्थशास्त्र या विषयाच्या सुट्टीतील एम. फिल.च्या (क्रॅश) कार्यक्रमाबाबत

**अर्जदार : अर्थशास्त्र विषयाचे खालील सह्या करणारे सर्व विद्यार्थी.**

महोदय,

दिनांक १३ मे १९८७ पासून एम. फिल व्हेकेशनल हा कोर्स आपल्या विद्यापीठाने सुरु केला. या कोर्सची एक टर्म मे/जून १९८७ मध्ये पूर्ण झाली. व दुसरी टर्म २० एप्रिल १९८८ पासून सुरु होणार असे पुणे विद्यापीठाने आम्हा सर्व विद्यार्थ्यांना पत्राद्वारे कळविले. त्याप्रमाणे आम्ही सर्व विद्यार्थी-प्राध्यापक २१ एप्रिलपासून हजर झालो. ही टर्म पुणे विद्यापीठात मानव्यशास्त्र इमारतीत वर्ग क्र. २ मध्ये सुरु झाली परंतू या विभागातील काम करणारे विभागप्रमुख दिनांक २८ एप्रिल १९८८ पासून काम पाहणार नाही असे प्रत्यक्ष त्यांनी सांगितले. याचे कारण आपल्या पुणे विद्यापीठाने नकतीच अर्थशास्त्र विभागामध्ये विभागप्रमुख, रिडर व प्राध्यापकाच्या नेमणूका करण्यासंबंधी जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे. जाहिरात देण्यापूर्वी विद्यापीठाने व प्रशासनाने अर्थशास्त्र विभाग प्रमुखाशी कोणत्याही प्रकारचा सुसंवाद साधलेला नाही तसेच सल्लामसलत केलेली नाही. याबाबत पुणे विद्यापीठातील एम. ए. व रेग्युलर एम. फिल. च्या विद्यार्थ्यांनी, तसेच अर्थशास्त्र अभ्यास मंडळाने व पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक संघटनेने अर्थशास्त्र विभागाचे कामकाज आहे त्याच विभागप्रमुखाच्या नेतृत्वाखाली पूर्ववत चालू राहवे यासाठी निवेदन दिलेले आहे. परन्तू या निवेदनाची कोणत्याही प्रकारे दखल घेतलेली नसल्यामुळे विभागप्रमुखांना जी अपमानास्पद वागणूक विद्यापीठाकडून देण्यात आलेली आहे तिचा आम्ही सर्वजण निषेध करतो.

या विभागप्रमुखानी पहिल्या टर्ममध्ये अतिशय व्यवस्थित काम पाहिले असून बाहेरुन आलेल्या सर्व विद्यार्थी प्राध्यापकांना उत्तम मार्गदर्शन केलेले आहे. ही घडी यापुढेही अशीच निरंतर चालू राहवी अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संपामुळे दिवाळी सुट्टीतील दुसरे सत्र होऊ शकले नाही त्यातच आता निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे दुसरे सत्र व परीक्षा आणखीनच लांबण्याची शक्यता निर्माण झालेली आहे त्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण पडणार असून वेळेचाही अपव्यय होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून हे सर्व टाळण्यासाठी पुणे विद्यापीठाने आहे तीच व्यवस्था पूर्ववत चालू ठेवावी असे आम्ही या अर्जाद्वारे एकमुखाने मागणी करीत आहोत याबाबतचा निर्णय २८ एप्रिल १९८८ पर्यंत द्यावा ही नम्र विनंति, कळावे.

## व्हेकेशनल एम्. फिल.

| अ. नं | प्राध्यापकाचे नाव | अ. नं. | प्राध्यापकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | रमेश कटके | २ | आर्. आर, पवार |
| ३ | सुरेंद्र दरेकर | ४ | बडवे |
| ५ | एम. के. पाटील | ६ | यू. एम्. राजदेरकर |
| ७ | मिसेस जी. गौरी | ८ | एस्. एस्. जोशी |
| ९ | एस्. एम्. चापडगावकर | १० | डी. एल्. लिमये |
| ११ | बी. ए. भगत | १२ | के. जी. जोशी |
| १३ | व्ही. एम्. चौधरी | १४ | सौ. व्ही. आर्. देशपांडे |
| १५ | ए. वाय्. बच्छाव | १६ | व्ही. व्ही. भडके |
| १७ | के. एम्. चिंतामणी | १८ | टी. बी. वाघ |
| १९ | जी. के. कांबळे | २० | व्ही. के. भामरे |
| २१ | जी. के. शिन्दे | २२ | डी. डी. पठारे |
| २३ | डी. बी. कदम | २४ | एम्. सी. पवार |
| २५ | बी. ए. पाटील | | |

---

## मा. कुलगुरु डॉ. भिडे यांचे अभिनंदन!

दोन वर्षापूर्वी पुणे विद्यापीठाच्या आवारात सुरु करण्यात आलेल्या अर्थशास्त्र विभागाच्या अनेक मागण्या व त्याच्या व्यवस्थापनविषयक अनेक अडचणी एम्. फिल्. व एम्. ए. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापक परिवाराने निवेदनाद्वारे आदरणीय कुलगुरु डॉ. वि. ग. भिडे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी मोठ्या मनाने त्या समजावून घेतल्या आणि त्यांची त्वरित पूर्तता करण्याचे आश्वासन दिले. पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे को–ऑर्डिनेटर म्हणून काम पाहणेबाबत प्रा. कमलाकर परचुरे यांना मा. कुलगुरुंनी लेखी आदेश दिला आहे. विभागाकरिता प्रशासकीय सेवकवर्ग, कार्यालय आणि वर्गांची व्यवस्थाही कुलगुरु येत्या ८ ते १० दिवसात करणार आहेत.

मा. कुलगुरु डॉ. भिडे हे त्यांच्या या दक्षतापूर्ण कारवाईबाबत खरोखरच, अभिनंदनास पात्र आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली पुणे विद्यापीठ निश्चितच उत्तम प्रगती करील आणि जगभर एक नामवंत विद्यापीठ म्हणून लौकिक प्राप्त करील यात आम्हास शंका नाही.

पुनश्च मा. कुलगुरु डॉ. भिडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

–संपादक 'अर्थ'

# अर्थशास्त्र अभ्यासमंडळ

## त्रैवार्षिक अहवाल

पुणे विद्यापिठाच्या अर्थशास्त्र अभ्यासमंडळाने गेल्या तीन वर्षात अर्थशास्त्र हा विषय, त्यांचे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या एकूण विकासाच्या दृष्टीचे जे जे प्रयत्न केले त्याची माहिती येथे देत आहोत. अर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे सदस्य सर्व महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे विभागप्रमुख निवडून देतात. अशा परिस्थितीत हे सर्व निर्वाचित सदस्य आपल्या अभ्यासमंडळाच्या कार्याबाबत आपल्या मतदार प्राध्यापकांना व अर्थशास्त्राच्या इतर सर्वच प्राध्यापकांना जबाबदार असतात. सार्वजनिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून मी आपणासमोर अभ्यासमंडळाच्या कार्याचा ताळेबंद मांडीत आहे.

अर्थशास्त्र विभागाची निर्मिती— प्रथमतः अभ्यासमंडळानेच तीन वर्षांपूर्वी पुणे विद्यापिठात अर्थशास्त्र विभाग सुरु करण्यात यावा असा ठराव केला. प्रा. कमलाकर परचुरे यांनी असा ठराव मांडला आणि तो मंजूर करण्यात आला. त्यानंतर मानसनीती व समाजविज्ञान विद्याशाखा, विद्यासभा आणि कार्यकारिणी व विद्वतसभा या सर्वांनी ठराव केले. त्याचा पाठपुरावा केला आणि जुलै १९८६ मध्ये अर्थशास्त्र विभाग प्रत्यक्षात अस्तित्वात आला. यापूर्वी विद्यापिठाचा अर्थशास्त्र विभाग गोखले अर्थशास्त्र राज्यशास्त्र संस्था पुणे येथे होता. परंतु अनेक कारणांनी पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व अर्थशास्त्राचे प्राध्यापक व पदव्युत्तर अभ्यासकेंद्रे यांना खऱ्या अर्थाने योग्य असे नेतृत्व हा विभाग देऊ शकला नव्हता. त्यामुळेच अनेक वर्षापासूनची विद्यार्थी व प्राध्यापक यांची ही मागणी विद्यापिठाने खूप आग्रह धरल्यानंतर पूर्ण केली. सध्या या विभागाचे विभागप्रमुख म्हणून प्रा. वि. म. दांडेकर काम पहातात. त्यांनी स्वतः कार्यबाहुल्यामुळे हया विभागाचे दैनंदिन काम काज पाहता येणे अशक्य आहे म्हणून प्रा. कमलाकर परचुरे यांना या विभागाचे कार्यकारी प्रमुख म्हणून काम पहावयास सांगितले आहे. गेली दोन वर्षाहून अधिक काळ प्रा. परचुरे हे काम अतिशय जबाबदारीने व उत्तम प्रकारे करीत आहेत. या विभागासाठी गेल्या दोन वर्षात एकही पूर्णवेळ प्राध्यापक नाही. कार्यालयीन कर्मचारी नाहीत. स्वतंत्र जागा नाही. असे असूनही प्रा. कमलाकर परचुरे यांनी अभ्यागत प्राध्यापकांच्या मदतीने 'मानव्यशास्त्र इमारतीत' या विभागाचे शिकविण्याचे काम चालू ठेवले या विभागात एम्. ए. भाग १ करिता व भाग २ करिता ५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

एम्. फिल. अभ्यासक्रम— अभ्यास मंडळाने एम्. फिल क्रॅश प्रोग्रॅमकरिता अभ्यासक्रम तयार केला आणि त्यासाठी ३० विद्यार्थ्यांना एम्. फिल. कोर्सला प्रवेश देऊन त्यांचे अध्यापन कार्य विद्यापीठ अर्थशास्त्र विभागाने उत्तम प्रकारे पार पाडले आहे.

त्याचप्रमाणे एम्. फिल. रेग्युलर कोर्सकरिता १९८७ मध्ये ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यासाठीही आवश्यक तो सुधारित अभ्यासक्रम अभ्यास मंडळाने तयार करुन दिला. याही वर्गाचे अध्यापनकार्य प्रा. परचुरे यांनी अभ्यागत प्राध्यापकांच्या सहकार्याने उत्तमप्रकारे पूर्ण केले आहे. दि. १५मे १९८८ रोजी वरील दोन्ही वर्गाच्या विद्यार्थ्यांना मा. कुलगुरु डॉ. वि. ग. भिडे यांच्या शुभहस्ते निरोप व शुभाशिर्वाद देण्यात आले.

याशिवाय चालू वर्षी महाविद्यालयीन प्राध्यापकांचे करिता सुटीतील एम्. फिल. वर्ग पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र विभागाचे वतीने चालू करण्यात येत

आहे. त्यासाठी २० ते ३० प्राध्यापकांना प्रवेश देण्यात येणार आहे. याही वर्षाचे अध्यापन कार्य प्रा. परचुरे हेच अभ्यागत प्राध्यापकांच्या सहकार्याने पार पाडणार आहेत.

अभ्यासक्रमातील बदल अभ्यास मंडळाने विद्यापिठास आपटे प्रशालेमध्ये विद्यामहामंडळाने आयोजिलेल्या पदव्युत्तर अध्यापकांच्या चर्चासत्रात एम्. ए. च्या अभ्यासक्रमासाठी एक स्वतंत्र ८ ते १५ दिवसांचे वर्कशॉप आयोजित करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार जून ९ ते जून १५, १९८६ या काळात विद्यापिठाचा अर्थशास्त्र विभाग प्रत्यक्षात अस्तित्वात येण्यापूर्वीच मानव्यशास्त्र इमारतीत अर्थशास्त्राच्या पदव्युत्तर अध्यापकांकरिता अशी कार्यशाला आयोजित केली. त्यात एम्. ए, अर्थशास्त्र विषयाचे सर्व अभ्यासक्रम मॉडरेट करण्यात आले. त्यात पदव्युत्तर अध्यापकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला आणि प्रत्यक्ष अभ्यासक्रम तयार करण्यात आपले योगदान दिले. अभ्यासक्रम तयार करण्याच्या प्रक्रियेत प्रथमच तो शिकविणाऱ्या प्राध्यापकांना सहभागी करुन घेण्यात आले.

त्याचप्रमाणे अभ्यास मंडळाने एफ्. वाय्. बी. ए. एस्. वाय्. बी. ए. आणि टी. वाय्. बी. ए. व एम्. ए. भाग १ व भाग २ या वर्गाच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात बदल केले. असे बदल करतांना विशेषीकरण व व्यावहारिक दृष्टीकोन (Applied view) यावर विशेष भर दिला आहे. हे अभ्यासक्रम तयार करतांना प्रथम त्याचा मसुदा तयार करुन तो सर्व महाविद्यालयांना पाठवून त्यावर प्राध्यापकांची मते मागविण्यात येत आणि नंतर अभ्यास मंडळ त्याला अंतिम रुप देत असे. त्यामुळे अभ्यासक्रम तयार करण्यात प्राध्यापकांचा सहभाग व सहकार्य यांना चांगली संधी मिळत असे. अभ्यासक्रमातील प्रत्येक टॉपिकला किती तासिका द्याव्यात याचाही उल्लेख करण्यात आलेला आहे. गेल्या १५ वर्षात एफ्. वाय्. ते एम्. ए. या अभ्यास क्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता. त्या पार्श्वभूमीवर या बदलाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

एफ्. वाय्. व टी. वाय्. या वर्गांना ऐच्छिक पेपर्स ठेवलेले आहेत. एफ्. वाय्. बी. ए. दोन वैकल्पिक अभ्यासक्रम तर टी. वाय्. बी. ए. स्पेशलला दोन पेपर्सचा एक असे चार गट वैकल्पिक स्वरुपात ठेवले आहेत. त्यामुळे कार्यभारातही वाढ होणार आहे. विशेषीकरणाला अधिक वाव मिळेल. प्राध्यापकांच्या बेकारीला तोंड देता येईल.

चर्चासत्रे— अर्थशास्त्र अभ्यासमंडळाने पुणे विद्यापीठ, विद्यामहामंडळ, पुणे, न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड् सायन्स कॉलेज, पेमराज सारडा कॉलेज, व अहमदनगर कॉलेज, नगर, के. जे. सोमय्या कॉलेज व एस्. एस्. जी. एम्. कॉलेज, कोपरगांव, नूतन मराठा कॉलेज, जळगांव व टी. सी. कॉलेज, बारामती यांच्या सहकार्याने अनुक्रमे पुणे विद्यापीठ, पुणे, आपटे प्रशाला पुणे, अहमदनगर, कोपरगांव, जळगांव व बारामती येथे अभ्यासक्रमावरील चर्चासत्रे आयोजित केली. त्या प्रत्येक चर्चासत्रात प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. उपयुक्त सूचना केल्या. या सर्व चर्चासत्रासाठी येथील स्थानिक महाविद्यालयांनी खर्चाचा भार उचलला आहे. या सर्व चर्चासत्रातून अर्थशास्त्राच्या प्राध्यापकात स्नेहाचे व सौहार्दाचे संबंध निर्माण झाले.

अभ्यासक्रम तयार करतांना दर्जाबाबत कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. उलट पूर्वीपेक्षा या सर्वच अभ्यासक्रमांचा दर्जा अधिक उंचावला आहे.

पुस्तक लेखनासाठी प्रोत्साहन—अभ्यास मंडळाने नवीन अभ्यासक्रमानुसार ग्रंथलेखनाला प्रोत्साहन दिले. तसेच ठराव रुपाने याबाबत विद्यापीठाच्या अधिकार मंडळाना एक निश्चित अशी योजनाही सुचविली आहे.

एम. ए. च्या विद्यार्थ्यांपैकी फार मोठ्या संख्येने विद्यार्थी मराठीतूनच उत्तरपत्रिका लिहितात. त्यांची गैरसोय लक्षात घेऊन गेली दोन वर्षे एम. ए. अर्थशास्त्राच्या सर्व प्रश्नपत्रिकांचे मराठी रुपांतर देण्याची व्यवस्था ठराव करुनच अभ्यासमंडळाने प्रत्य-

क्षात आणली आहे. त्याचा विद्यार्थ्यांना फारच चांगला लाभ होत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

एम. फिल. करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांची संख्या फारच मर्यादित आहे. त्यामुळेच अभ्यास मंडळ व विद्याशाखा यांनी सतत १० वर्षे एम. ए. च्या वर्गांना अर्थशास्त्र शिकविणाऱ्या प्राध्यापकांना एम. फिल. वर्गांना शिकविण्यास मान्यता द्यावी असा ठराव केला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याचे गावी एक एम. फिल्. केंद्र स्थापन करावे अशी विनंती करणारा ठरावही मंजूर केला आहे.

पीएच. डी. करिता नवीन २०–२५ प्राध्यापकांना उत्तेजन देऊन नावे नोंदविण्यासाठी व संशोधनासाठी प्रवृत्त केले आहे. दुर्दैवाने गेल्या २–२॥ वर्षात विद्यापीठात पीएच. डी. कमिटीच अस्तित्वात न आल्याने अनेकांचे पीएच. डी. साठी रजिस्ट्रेशनच होऊ शकलेले नाही परिणामी गुणवत्ता वाढविण्याची इच्छा असूनही त्यासाठी सोय नाही अशी परिस्थिती आज तरी आपल्या विद्यापीठात दिसून येत आहे. ही गैरसोय दूर व्हावी यासाठी मी दिनांक ६–५–१९८८ रोजी मा. कुलगुरुंची समक्ष भेट घेऊन पत्रही दिले आहे.

अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण, व्यावसायिकीकरण व नव्या शैक्षणिक धोरणास अनुरुप असे नवे स्वरुप निश्चित करतांना आम्ही सतत प्राध्यापकांशी संपर्क साधला.

प्राध्यापक परिवाराची स्थापना– जळगाव येथील चर्चासत्राचे वेळी या स्नेहाचे व जवळीकेचे आम्ही पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार या संघटनेत रुपांतर केले. ही संघटना अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाच्या विषयाबाबतच्या, संशोधन, लेखन, इत्यादी बाबतच्या समस्या सोडविण्यासाठीच कार्य करणार आहे. या संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची यादी अंकात अन्यत्र दिली आहे. या संघटनेचे सभासद होऊन आपणही या परिवाराचे घटक व्हावे अशी आपणास माझी आग्रहाची विनंती आहे.

श्री अर्थविद समाज– अर्थशास्त्र शिकविणाऱ्या प्राध्यापकांनाच एकत्र करुन आम्ही अर्थविद समाज ही संस्था स्थापन केली आहे. या संस्थेमार्फतच 'अर्थ' हे अत्यंत थोर परंपरा लाभलेले अर्थशास्त्रीय विषयावरील त्रैमासिक चालविण्यात येणार आहे. त्यातून अभ्यासक्रम विषयक माहिती, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या शंकांना उत्तरे, संदर्भ साहित्य व समाजाचे प्रबोधन याबाबत लिखाण उपलब्ध करुन दिले जाणार आहे. श्री अर्थविद समाज ही संस्था केवळ 'अर्थ' चालविण्याचेच काम करणार नसून अर्थशास्त्रीय विषयावरील संशोधन व लेखन तसेच ग्रंथ प्रकाशित करणार आहे. त्याचरोबर स्वतःही संशोधन संस्था सुरु करण्याचा आमचा मानस आहे. हे सर्व अभ्यास मंडळाचे विस्तार कार्यच होय.

अभ्यास मंडळाने आपल्या शेवटच्या सभेत पुणे विद्यापिठाच्या अर्थशास्त्र विभागाचे मानद प्रमुख व सन्मानित प्राध्यापक, सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व विचारवंत प्रा. वि. म. दांडेकर यांना त्यांच्या आजवरच्या प्रदीर्घ अशा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याचा गौरव करण्यासाठी सन्माननीय डॉक्टरेट पदवी देण्यात यावी. त्यात विद्यापिठाचाच खऱ्या अर्थाने गौरव होईल असा ठराव एकमताने संमत केला आहे.

आम्हाला आशा आहे की, आमचे हे उपक्रम आपल्या सारख्या जाणत्या मंडळींना खचितच लक्षणीय व अर्थशास्त्र विषयाच्या हिताचे आहेत याची खात्री पटेल. मला अभ्यास मंडळाचे काम चांगल्या प्रकारे करण्यासाठी–

१. प्राचार्य ए. एस्. पाटील, एरंडोल
२. „ डॉ. एन्. बी. सप्रे, नेस वाडिया कॉलेज, पुणे.
३. „ जे. जी. जोशी, जामनेर

४. प्रा. आर. एम्. सोनवणे एम्. एम्. व्ही. पी. कॉलेज, धुळे
५. " के. एम्. परचुरे, फर्गसन कॉलेज, पुणे
६. " पी. के. पाटील, ओतूर
७. " व्ही. एस्. गोडबोले, शिरुर
८. " टी. इ. शेळके, श्रीरामपूर
९. " बी. डी. भदाने, सिन्नर
१०. " व्ही. पी. कुलकर्णी, मनमाड
११. " एन्. टी. पाटील, तळोदा
१२. " व्ही. व्ही. एकबोटे, पुणे
१३. " जी. के. पाटील, अहमदनगर
१४. " जे. आर. जोशी, पुणे
१५. " वि. म. दांडेकर, मानद प्रमुख, पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग, पुणे

या सहकारी सभासदांनी उत्तम सहकार्य दिले त्या सर्वांचे ऋणातच राहणे मी अधिक पसंत करतो.

प्रा. खासेराव शितोळे
अध्यक्ष

— — —

# पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार, अहमदनगर

जळगांव येथे नूतन मराठा कॉलेजमध्ये ३ एप्रिल १९८८ रोजी अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांचे अभ्यासक्रमावरील चर्चासत्र आयोजित केले होते. त्यावेळी पुणे विद्यापिठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांची संघटना स्थापन करण्यात आली. अर्थशास्त्राचे अध्ययन व अध्यापन यातील अडीअडचणी सोडविणे, विषयाची आवड निर्माण करणे, प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, त्यातील अडचणींचे निराकरण करणे, लेखन व संशोधनास प्रोत्साहन देणे हे या संघटनेचे उद्देश आहेत. या सभेत "पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र प्राध्यापक परिवार" या संघटनेची रीतसर स्थापना करुन तिची अस्थायी कार्यकारिणी निवडण्यात आली. कार्यकारिणीला परिवाराची घटना तयार करून ती पुढील सभेत मंजुरीसाठी सादर करण्यास सांगण्यात आले. सभासद वर्गणी वार्षिक रु. १०।– फक्त आहे. अर्थशास्त्राच्या प्रत्येक प्राध्यापकाने रु. १०।– संघटनेचे सेक्रेटरी प्रा. जी. जी. वर्पे, के. जे. सोमय्या कॉलेज कोपरगांव, जि. नगर यांचेकडे पाठवावेत व परिवाराचे सभासद व्हावे.

– अस्थायी कार्यकारिणी –

अध्यक्ष - प्राचार्य, खा. ह. शितोळे, न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर.
सेक्रेटरी– प्रा. जी. जी. वर्पे, के. जे. सोमय्या कॉलेज, कोपरगांव
सभासद – १) प्रा. एम्. ए. बारगजे, अकोले कॉलेज, अकोले, जि. अहमदपगर.
२) " व्ही. जे. गोडबोले, सी. टी. बोरा कॉलेज, शिरुर जि. पुणे
३) " बी. आर्. आदिक, आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, जि. पुणे
४) " आप्पासाहेब देसाई, टी. सी. कॉलेज, बारामती, जि. पुणे
५) " बी. एम्. ढोळे, एम्. एस्. जी. कॉलेज, मालेगाव, जि. नासिक

६) बी. डी. भदाणे, सिन्नर कॉलेज, सिन्नर, जि. नासिक
७) एस्. एन्. कुलकर्णी, सटाणा कॉलेज, सटाणा, जि. नासिक
८) सावंत, एस्. एस्. व्ही. पी. कॉलेज, धुळे
९) डॉ. आर्. डी. राणे, शिरपूर कॉलेज, शिरपूर, जि. धुळे
१०) निकम, साक्री कॉलेज, साक्री, जि. धुळे
११) के. एम्. परचुरे, फर्गसन कॉलेज, पुणे
१२) ढमाळ, श्री. शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे
१३) गोखले, गरवारे कॉलेज, पुणे
१४) पी. बी. बव्हाण, नूतन मराठा कॉलेज, जळगांव
१५) डी. आर्. आठवले, चाळीसगांव कॉलेज, चाळीसगांव, जि. जळगांव
१६) भालेराव, प्रताप कॉलेज, अमळनेर, जि. जळगांव

—०—

# श्री अर्थविद् समाज, अहमदनगर


## द्वारा न्यू आर्ट्स्, कॉमर्स अँण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर

२७ फेब्रुवारी १९६८ रोजी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर येथे झालेल्या सभेत श्री अर्थविद समाज, अहमदनगर या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेमार्फत 'अर्थ' हे थोर परंपरा लाभलेले त्रैमासिक चालविण्यात येत आहे. ही संस्था अर्थशास्त्रीय विषयावरील ग्रंथ, संशोधनपर लेख, प्रबंध व इतर साहित्य प्रकाशित करणार आहे. तसेच संशोधन प्रकल्प हाती घेण्यात येतील. संशोधन संस्था चालविण्यात येईल. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी आमच्या संस्थेला उदार हस्ते सहाय्य करुन सामाजिक प्रबोधनाच्या उच्चतर कार्यात सहकार्य करावे असे आम्ही आवाहन करीत आहोत.

### श्री अर्थविद समाजाचे संस्थापक सदस्य

१ प्रा. कमलाकर परचुरे, अध्यक्ष, फर्गुसन कॉलेज, पुणे
२ भाऊसाहेब सितोळे, कार्यकारी संचालक, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर
३ बी. बी. मारकड, एस्. एस्. जी. एम्. कॉलेज, कोपरगाव
४ जी. जी. थर्ये, के. जे. सोमय्या कॉलेज, कोपरगाव
५ सी. जी. आगरकर, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर
६ एस्. जे. फुलारे, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँण्ड् सायन्स कॉलेज, अहमदनगर
७ आर्. आर्. पवार,
८ टी. इ. सेळके, रा. ब. ना. बो. कॉलेज, श्रीरामपूर
९ प्रकाश करडिले, नासिक रोड कॉलेज, नासिक रोड
१० डॉ. मुलाणी, एस्. एस्. जी. एम्. कॉलेज, कोपरगाव
११ के. पी. घोंगडे, पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर
१२ एस्. एन्. कुलकर्णी, सटाणा कॉलेज, सटाणा, जिल्हा नासिक
१३ अशोक पोफळे, लासलगाव, जिल्हा नासिक
१४ बी. डी. भदाणे, सिन्नर, जिल्हा नासिक
१५ डॉ. आर. डी. राणे, शिरपूर कॉलेज, शिरपूर, जिल्हा धुळे
१६ सावंत, एस्. एस्. व्ही. पी. कॉलेज, धुळे

१७ बी. एम्. डोळे, एम्. सी. कॉलेज, मालेगाव, जिल्हा नासिक
१८ " डी. आर. आठवले, चाळीसगाव कॉलेज, चाळीसगाव, जिल्हा जळगाव
१९ " टी. बी. वाघ, नवापूर कॉलेज, नवापूर, जिल्हा धुळे
२० " एस्. जे. पाटील, पारोळा कॉलेज, पारोळा, जिल्हा जळगाव
२१ " पी. बी. चव्हाण, नूतन मराठा कॉलेज, जळगाव
२२ " गोखले, एम्. जे. कॉलेज, जळगाव
२३ " पी. के. पाटील, ओतूर कॉलेज, ओतूर, जिल्हा पुणे
२४ " डॉ. एन्. बी. सप्रे, वाडिया कॉलेज, पुणे
२५ " एल्. जी. जाधव, श्री शाहूमंदीर महाविद्यालय, पुणे
२६ " जे. झेड्. पाटील, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, जिल्हा पुणे
२७ " साबळे, वणी कॉलेज, वणी, जिल्हा नासिक
२८ " ए. टी. पाटील, मनमाड कॉलेज, मनमाड, जिल्हा नासिक
२९ " चांडे, पी. व्ही. पी. कॉलेज, लोणी, तालुका श्रीरामपूर
३० " एम. एल. अत्रे, संगमनेर कॉलेज, संगमनेर, जिल्हा अहमदनगर
३१ " डॉ. सातव, पी. व्ही. पी. कॉलेज, लोणी, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर
३२ " एम्. ओ. गेडाम, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा, जिल्हा अहमदनगर
३३ " डॉ. के. सी. देशपांडे, धुळे
३४ " व्ही. डी. बच्छाव, एम्. एस्. जी. कॉलेज, मालेगाव, जिल्हा नासिक



# 'अनंत'

सार्वजनिक क्षेत्राप्रमाणेच आज खाजगी क्षेत्रातही खर्च कमी कसा करावा आणि ग्राहकाला विविध वस्तू व सेवा वाजवी दरात कशा पुरवाव्यात याचा कोणीही फारसा विचार करतांना दिसत नाही. त्या दिशेने जाणीवपूर्वक प्रयत्नही कोणी करीत नाही. आकाशवाणी, दूरदर्शन, लघुपट, जाहिरातपट, प्रतिनिधी या माध्यमाद्वारे प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च करुन आपआपल्या उत्पादनांची जाहिरात केली जात आहे. आजच्या जाहिरात युगात प्रत्येक उत्पादक विक्रेता आपल्या उत्पादनांच्या जाहिरातीवर पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे. या सर्व पैशाचा भार अर्थातच गरीब बिचाऱ्या ग्राहकावर पडत आहे. तो मुळातच असंघटित. देशभर विखुरलेला. किंमतवाढीला संघटित विरोध करण्याचे सामर्थ्य गमावून बसलेला.

जाहिरातीपायी होणाऱ्या उधळपट्टीत अलिकडे सार्वजनिक क्षेत्रही मागे राहिलेले नाही. बेगोदरच बेर व्यवस्थापनामुळे व्यवस्थापकीय खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. त्यातच जीवनाच्या सर्वच पातळयावर चालू असलेला भ्रष्टाचार याही क्षेत्रात अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणे चौफेर उधळत आहे. भ्रष्टाचाराला आता तर राजमान्यता प्राप्त होऊ पहाते आहे. परिणाम? परिणाम एकच बेसुमार किंमतवाढ, बेजबाबदारपणा व बेफिकिरी.

उद्याच्या भारताचे काय होणार याचे कोणालाही सोयर नाही अन् सुतकही नाही. जी काय चिंता करायची असेल ती समाजातल्या जाणत्या मंडळींनी. राज्यकर्त्यांनी आणि विरोधीपक्षीयांनी त्याबाबत फक्त मतपेटीवर नजर ठेवून जमेल तेवढे व जमेल तेव्हा या सगळ्या परिस्थितीचे आपापल्यापरीने भांडवल करायचे एवढेच!

यातूनच समाजाच्या सर्व थरात बेजबाबदारपणाच तेवढा वाढीस लागला आहे. सार्वजनिक कर्जाचा बोजा इतका वाढत चाललाय की आज एकूण वार्षिक खर्च निधीपैकी १७% रक्कम केवळ जुन्या कर्जाच्या व्याजापोटीच द्यावी लागतेय. १५% रक्कम आम्हाला संरक्षणावर खर्च करावी लागतेय. शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी व त्याद्वारे जनसामान्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फारच थोडी रक्कम प्रत्यक्ष वापरात येतेय. खरे तर आज आमचे सरकार जवळ जवळ पूर्णतया नादार आहे. अर्थतज्ज्ञांनी आणि देशातल्या जाणत्या मंडळींनी या गोष्टीचा गंभीरपणे विचार करुन ही स्थिती बदलण्यासाठी पुनः एकवार नियोजन व आर्थिक आणि वित्तीय धोरणाचा मूलगामी दृष्टीने फेरविचार करुन ठोस पावले उचलण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ते करण्यात जर सरकारने कुचराई केली तर येणाऱ्या पिढ्या सरकारला कधीच माफ करणार नाहीत.

राजकीय क्षितिजावर तर कोणताच राजकीय पक्ष आपल्या तत्वप्रणालीबाबत फारसा आग्रही असलेला दिसत नाही. सारेच संधिसाधू. निर्माण होणाऱ्या प्रत्येक घटनेचा् आपल्यापरीने सोयीस्कर अर्थ लावून स्वार्थी राजकारणासाठी सारे गटतट वापरुन घ्यायचे याचीच स्पर्धा सर्वदूर दिसून येत आहे. त्यात कोणताच राजकीय पक्ष मागे नाही. पक्षीय स्वार्थासाठीच पंजाबात 'खलिस्तान' मागणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. आज तेथील मृत्युचे तांडव अखेरीस आम्हाला कोठे नेणार आहे ते परमेश्वरच जाणे. गुरखा भूमीची मागणी व त्यासाठीचे आंदोलन, स्वतंत्र झारखंड व्हावा म्हणून चाललेले आंदोलन, तमिळांचा लढा, नक्षलवाद्यांचा धुमाकूळ, विविध राज्यातील सीमावाद, राज्याराज्यातील पाणीतंटे या सर्वातून आम्ही एक एकसंध राष्ट्र आहोत व पुढे कधीकाळी तसे

राहूच याबाबत मनात सतत शंका निर्माण व्हावी अशीच स्थिती दिसते. आजतरी तत्वाधिष्ठित अशा पक्षीय राजकारणाला नैतिकतेची जोड देऊन समाजकारणाला प्राधान्य देणाऱ्या राजकीय पक्षा अभावी आमचे राजकीय भविष्य अंधःकारमयच आहे असे वाटते.

जातीय तेढ, धार्मिक अभिनिवेश, त्यातून उद्भवणारे ताणतणाव, जातीबद्दलचा अकारण असणारा वृथाभिमान यामुळेच आमच्या सामाजिक विघटनास गति प्राप्त झाली आहे. आर्थिक गुन्हेगारी पाठोपाठ सामाजिक गुन्हेगारीतही आता आम्ही आघाडीवर आहोत. तस्करी पाठोपाठच व्यसनाधिनता वाढावी यासाठी आमचे शत्रू सतत प्रयत्नशील आहेत. आम्ही मात्र त्याविरुद्ध काही ठोस पावले उचलण्याऐवजी चर्चेचे गुऱ्हाळ घालीत बसलो आहोत. व्यसनाधिनतेने आमच्या तरुणांना निष्क्रीय बनविले आहेच. त्यात भर पडली आहे ती दूरदर्शनची. लहान मुले–मुली रोज सायंकाळी फिरायला, खेळायला जाण्याऐवजी आता दूरदर्शन संचा समोरुन हलत नाहीत. आरोग्य कार्यतत्परता यावर दूरदर्शनचा नको इतका विपरीत परिणाम होऊ घातलाय. याबाबतही आमच्या प्रसार माध्यमांनी समाज प्रबोधनाची व भवितव्याची जाण ठेवूनच धोरण आखायला हवे.

शैक्षणिक क्षेत्रात तर सरकार मनुष्यबळाच्या विकासासाठी स्वतंत्र खाते निर्माण करुनही या प्रश्नाकडे खरोखर डोळसपणे पहात आहे याचे प्रत्यंतर येत नाही. राज्य सरकारे व केंद्रसरकारही शिक्षणाचा बहुतांश भार समाजातील धनिकांनी व जाणकारांनी उचलावा अशी भूमिका स्वीकारुन विना अनुदान तत्वावरच सर्व प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा असा विचार करीत आहे. परिणामी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही व्यापारी वृत्ती व भ्रष्टाचार दृढमूल होऊ पहात आहे. युवकांशी व मनुष्यबळ विकासाशी निकटचा संबंध असलेल्या क्रीडाक्षेत्रात राजकारण व भ्रष्टाचार इतका माजला आहे की त्यामुळे आम्हाला क्रीडाक्षेत्रात अनेक क्रीडा प्रकारात दारुण पराभवांना तोंड द्यावे लागते. आमच्या खंडप्राय देशाच्या तुलनेत अगदीच चिमुरड्या देशांनाही आशियाई व ऑलिंपिक खेळात अधिक सुवर्ण पदके मिळतात. वास्तविक शिक्षण व क्रीडा क्षेत्रावर अधिक खर्च करुन व त्यासाठी उत्तम नियोजन करुन या देशातील प्रत्येक तरुण–तरुणी ही देशासाठी सर्वस्व अर्पण करणारी व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. प्रत्येकाची बौद्धिक क्षमता, कल, प्रवृत्ती विचारात घेऊन त्याला शिक्षण देऊन राष्ट्रकार्याला लावणे अगत्याचे असतांना आज आम्ही मात्र काटकसरीच्या नावाखाली शिक्षणाचा व्यापार अन् खेळखंडोबा करीत आहोत. 'मुले ही राष्ट्राची संपत्ती" हे सुभाषित आळवित बसण्यापेक्षा ती खऱ्या अर्थाने राष्ट्रीय संपत्ती मानून तिचे उत्तम संगोपन व संवर्धन करण्यावर अधिक भर द्यायला हवा. प्रत्यक्षात कोणीही शिक्षण क्षेत्रातील गुंतवणुकीकडे राष्ट्र उभारणीसाठी करावी लागणारी अनिवार्य गुंतवणूक म्हणून पहात नाही हेच या देशातील युवापिढीचे सर्वात मोठे दुर्दैव आहे.

आजची युवापिढी तर वैफल्यग्रस्त बनू पहात आहे. त्याला खरे जबाबदार आहेत ते आमचे राज्यकर्ते, धोरण निश्चिती करणारे महाभाग आणि युवकावर सुसंस्कार करण्याची जबाबदारी असणारे शिक्षक. वस्तुतः युवकांना अन् विद्यार्थ्यांना मुळातच चांगल्या संस्काराची आवड आहे. परंतु आज तरुण–तरुणींची स्पंदने आणि त्यांच्या आशाआकांक्षा स्पष्टपणे जाणून घेऊन, त्यांना समजावून घेऊन त्यांना अनुरुप वळण व संधी देण्यासाठी हवा तेवढा मनाचा मोठेपणा आमच्याकडे राहिलेला नाही. आम्ही सारेच स्वतःच्या स्वार्थापलिकडचे पाहू न शकणारे आत्मकेंद्रीत होत्साते स्वतःतच रममाण होत आहोत. समाजाप्रती अन् भावीपिढीचे आम्ही काही देणे लागतो आहोत याची जाण अन् जाणीव अधीर झाली आहे.

समाजाच्या या अशा दयनीय व बुद्धिभ्रम झालेल्या अवस्थेत न्यायमूर्ति म. गो. रानडे, प्रा. वा. गो. काळे, प्रा. द. गो. कर्वे, डॉ. धनंजयराव

गाडगीळ, श्री. वा. काळे, प्रा. कमलाकर परचुरे यांच्या सारख्या समाजहितैषी पंडितांचा ज्या नियतकालिकाला वारसा लाभला आहे आणि ज्यांनी आपल्या वाणीने, लेखणीने अन् प्रतिभेने समाजमनाचे खऱ्या अर्थानं प्रबोधन करण्यासाठी आजीवन कष्ट केले, क्षणन्क्षण वेचला, वेचित आहेत त्या "अर्थ"च्या कार्यकारी संपादकत्वाची जबाबदारी स्वीकारतांना माझ्या मनावर विलक्षण दडपण येत आहे. याचवेळी ही जबाबदारी मजवर सोपवू इच्छिणाऱ्या सहकाऱ्यांच्या व समाजधुरीणांच्या अपेक्षांना अन् कसोटचांना आपण उतरलेच पाहिजे ही जिद्द स्वस्थ बसू देत नाही. आमच्या या सामूहिक प्रयत्नात आपले आशीर्वाद आणि सदिच्छा सदैव आमच्या पाठीशी असू द्याव्यात. त्या असल्यावर जीवनातल्या प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्याचे बळ आमच्या बाहूत येईल यात आम्हाला तीळमात्र शंका नाही.

आपला उदार आश्रय हेच आमचे सार सर्वस्व. या प्रयत्नातून समाजातील पाच युवामनं जरी ध्येयवादानं झपाटून निघाली तरीही आम्ही स्वतःला धन्य समजू. अधिक ते काय लिहावे !

खासेराव शितोळे


For quality and reasonabla rates

# M/s. S. MOTILAL

## PLYWOOD HOUSE

**Gunj Bazar, Ahmednagar.**

Dealers in – Rocket, Monarch, Novopan, Duratuff Commet Druck Board (Bhutan), Tower, Veneess, Neoluxe, Multiply, Aricitply and Laminates, Fevicol and Hardwares.

For Quality Goods Visit

**S. MOTILAL**

# RAM AGENCY

Gram : FRIDGEMAN

Phone : 3154

-: DEALERS IN :-

- REFRIGERATORS
- AIR-CONDITIONERS
- WATER COOLERS
- TELEVISIONS
- FANS
- AIR-COOLERS
- WASHING MACHINES
- WATER HEATERS
- FILTERS
- MIXERS
- VOLTAGE STABILISERS
- ELE. APPLIANCES, STEEL & WOODEN FURNITURE

**HEAD OFFICE & SHOW ROOM**

15, Kisan Kranti Bldg.
Market Yard, Station Road
AHMEDNAGAR-414001

**BRANCH**

4411, Juna Magalwar Bazar,
Shani Chowk, Behind Asha
Talkies, AHMEDNAGAR 414001

# ATRI SALES CORPORATION

**MANUFACTURER & SUPPLIERS FOR**

Precision Scientific Apparatus, Glasswares,
Pure Chemicals

For Schools, Colleges & Research Labs

**M. G. ROAD, AHMEDNAGAR (M.S.)**